57 भाषेंमध्ये 3 दशलक्ष प्रती छापल्या



# तुमचा देवाचा शोध

एक 'सिटी प्लॅनर' म्हणून डॉ. रिचर्ड बेन्नेट यांनी आपल्या जीवनास सुरुवात केली. प्रशिक्षणाच्या काळात त्यांना जीवन बदलून टाकणाऱ्या देवाच्या सामर्थ्याचा अनुभव आला. त्यामुळे त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला आणि अमरिकेत बायबल अभ्यासास सुरुवात केली.

1946 मध्ये एक नवशिक्या म्हणून सुरुवात करून ते आता मोठमोठ्या सभांमधून देवाचा संदेश देत आहेत. गेली 20 वर्षे ते युरोपमध्ये देवाच्या कार्यात मग्न आहेत. ट्रान्स वर्ल्ड रेडियो आणि 'फार ईस्ट ब्रॉडकास्टिंग' मधील त्यांचे कार्य गौरवास्पद आहे. त्याद्वारे त्यांनी युरोप, आफ्रिका, आशिया, मध्य व दक्षिण अमेरिकेत मोठी सेवा केली.

1958 मध्ये त्यांचा विवाह डॉरथीबरोबर झाला व दोघांनी मिळून देवाची सेवा संतोषाने केली आहे. डॉरथीने, रिचर्डच्या मदतीने स्त्रीयांसाठी भरीव कार्य केले आहे.

रिचर्ड आणि डॉरथीचे सेवा कार्य आता जगात सर्वत्र चालू आहे. त्यांच्या विविध देशातील भेटींमध्ये त्यांना आत्मिकदृष्ट्या भुकेजलेले अनेक लोक भेटले. भुकेने व दारिद्र्याने भरडून निघालेले मागासलेल्या राष्ट्रांतील लोक पाहून त्यांचे हृदय द्रवले. अशा लोकांसाठी त्या दोघांनी आत्मिक आणि वस्तुरूप मदतीद्वारे देवाची प्रीतीच दिली आहे.

पुढारलेल्या देशातही जेव्हा देवाच्या सहवासासाठी आसुसलेले लोक त्यांना भेटतात तेव्हा त्यांना अवर्णनीय आनंद वाटतो. अशा लोकांच्या मनात काही प्रश्न असतात.

जीवनातील प्रश्नासंबंधी काही नेमकी उत्तरे आहेत काय?रिचर्ड बेन्नेटची अशी खात्री आहे की देवानेच अशा प्रश्नांची उत्तरे दिली आहेत म्हणून त्यांनी 'तुमचा देवाचा शोध' हे पुस्तक लिहिले आहे

"या पुस्तकासाठी मी २० वर्षे प्रार्थना करीत होतो"
जॉर्ज वर्व्हर
'ऑपरेशन मोबिलायझेशन' चे संस्थापक, संचालक

Authentic

ISBN-13: 978-81-7362-000-0
ISBN-10: 81-7362-000-0

Your Quest for God *(Marati)*

तुमचा देवाचा शोध

रिचर्ड ए. बेन्नेट

# तुमचा देवाचा शोध



## रिचर्ड ए. बेन्नेट

# तुमचा
# देवाचा शोध

माझी प्रिय पत्नी डॉरथी हिचे प्रेम, त्याग, प्रोत्साहन आणि प्रार्थना याशिवाय हे पुस्तक कधीच लिहिले गेले नसते. फिबाबद्दल पौल म्हणतो तसेच मी माझ्या पत्नीबद्दल म्हणतो....ती अनेकांसाठी मदतनीस झाली आणि....माझ्यासाठी देखील.

# तुमचा देवाचा शोध


रिचर्ड ए. बेन्नेट

भाषांतर : सुभाष शिंदे



Authentic

HYDERABAD • COLORADO SPRINGS • LONDON

***Thumcha Devacha Shodh***
(Marathi)

Your Quest for God
by Richard A.Bennett

Copyright © 1985, 1988, 1997, 1998, 2003
Cross Currents Internatinal Ministries, Dallas, Texas, U.S.A.

First Marathi edition 2007
ISBN-13: 978-81-7362-804-7
ISBN-10: 81-7362-804-1

Published by Authentic India

India P. O. Box 2190, Secunderabad 500 003, Andhra Pradesh.
www.authenticindia.in

UK 9 Holdom Avenue, Bletchley, Milton Keynes, MK1 1QR, UK
www.authenticmedia.co.uk

USA 1820 Jet Stream Drive, Colorado Springs, CO 80921.
www.authenticbooks.com

All rights reserved.
No part of this publication may be reproduced in any form or by any means, electronic, or mechanical, including photocopying, recording, or any information storage and retrieval system, without permission in writing from the publisher.

Authentic Books is an imprint of Authentic Media, the publishing division of STL OM Books India.

Food for Faith Marathi fo’oklkdfjrk vUu by Richard A. Bennett
www.ccim-media.com

# अनुक्रमणिका

दोन शब्द 7
प्रस्तावना 9
प्रकरण १
खरोखर देव आहे काय? 15
प्रकरण २
तुमचा आध्यात्मिक गुरू विश्वसनीय आहे काय? 25
प्रकरण ३
देव कसा आहे? 41
प्रकरण ४
लोकांचे विभाजन नेमके कशामुळे होते? 51
प्रकरण ५
खरी समस्या कोणती आहे? 65
प्रकरण ६
लोकांची एवढी दिशाभूल का होते? 75
प्रकरण ७
देव खरोखर माझ्यावर प्रीती करतो काय? 87
प्रकरण ८
मला जीवन कोठे लाभेल? 113
प्रकरण ९
देवाच्या कुटुंबाचा घटक मी कसा बनेन? 127
प्रकरण १०
पुढे काय? 139
विश्वाससंबंधी माझी प्रतिज्ञा 149

# दोन शब्द

'तुमचा देवाचा शोध' या पुस्तकाची मी दोन कारणास्तव शिफारस करतो. पहिले म्हणजे मी लेखकाला व्यक्तिशः चांगला ओळखतो! तो विश्वासाचा पुत्र आहे. 'माझी मुले सत्यात चालतात हे ऐकल्याने मला आनंद होतो तितका दुसरा कशानेही होत नाही' (३ योहान ४).

दुसरे कारण अधिक वस्तुनिष्ठ आहे. मनुष्याचा देवाशी नातेसंबंध कसा असावा हे डॉ. रिचर्ड बेन्नेट यांनी अत्यंत समर्पक रीतीने आणि प्रभावीपणे या पुस्तकात विषद केले आहे.

पवित्र शास्त्र आपणास सांगते की, 'देवाने मनुष्याच्या मनात अनंत कालाविषयीची कल्पना उत्पन्न केली आहे' (उपदेशक ३:११). त्यामुळे, मनुष्ये अनंतकालासाठी निर्माण केली आहेत म्हणून काळ मनुष्याला पूर्णपणे व कायमस्वरूपी समाधान कधीच देऊ शकत नाही हे ओघाने लक्षात येईल. मनुष्याच्या मनात अनंतकालिक पोकळी असते आणि देवच ती भरून काढू शकतो. सेंट ऑगस्टीन म्हणतो - ''हे देवा, तूं आम्हाला तुझ्यासाठी निर्माण केले आहे. तुझ्यामध्ये आमचे आत्मे विसावल्याखेरीज आम्हाला कधीच शांती मिळणार नाही. त्या अनादी-अनंत परमेश्वरामध्ये विसावल्याखेरीज आम्हाला देवाचा - शोध कधीच लागू शकत नाही.

या पुस्तकामधील संदेश वाचून, देवाचे गौरव करीत अनेकजण स्वतःचे हीत निश्‍चित साधतील अशी माझी कळकळीची प्रार्थना आहे.

डॉ. स्टीफन एफ. ओल्‌फोर्ड

# प्रस्तावना

मी आणि माझी पत्नी डॉरथी, आमच्या प्रदीर्घ प्रवासाच्या दरम्यान आम्हाला जीवनाच्या वाटेवर अनेक मित्र भेटले हे सगळे मित्र भिन्न संस्कृतिचे आणि शैक्षणिक व आर्थिक पातळीवरही भिन्न होते.

हे सगळे मित्र योगायोगाने आम्हाला भेटले होते असे आम्हाला मुळीच वाटत नाही. तसेच हे छोटेसे पुस्तकदेखील योगायोगाने तुमच्या हातात पडलेले नाही.

अनेक वर्षांपासून 'देवाचा शोध' या विषयावर आमच्या मित्रमंडळीत आम्ही पुष्कळ बोललो होतो. या पुस्तकांमध्ये त्या चर्चेमधील काही विचारही मी मांडले आहेत.

''तुमचा देवाचा शोध'' या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीनंतर पुढे बऱ्याच सुधारीत आवृत्या निघाल्या. त्यामध्ये आभारप्रदर्शनाचा विशेष भाग आहे. माझ्या आणि डॉरथीच्या २५ व्या लग्नवाढदिवशी आम्ही खूप विचार केला व देवाने आम्हांवर जी कृपा केली त्याबद्दल त्याचे आभार कसे मानावेत हे ठरवले.

२५००० लोकांपर्यत शांती व आशेचा संदेश पोहंचविण्याकरिता आम्ही हे पुस्तक लिहिले, छापले व प्रकाशित केले. म्हणजे आमच्या

वैवाहिक जीवनातील प्रत्येक वर्षासाठी एक हजार लोकांकरिता हा संदेश आहे.

या छोट्याशा प्रीतीने भरलेल्या प्रयत्नाला देवाने आशीर्वादित केले व पुस्तकाच्या रूपात हे प्रेममय श्रम जगभर लोकांपर्यंत पोहंचले. त्या सगळ्या म्हणजे २५००० प्रती जगातील वेगवेगळ्या देशातील लोकांच्या हाती पोहंचल्या. ''तुमचा देवाचा शोध'' वाचल्यानंतर अनेक लोकांनी, त्यांना जीवनाचा हेतु कसा गवसला हे आम्हाला पत्राद्वारे कळविले आणि तोच आमच्या जीवनातील अत्यंत आनंदाचा भाग आहे.

या पुस्तकाचे अनेक भाषांमध्ये भाषांतर करावे यासंबंधी अनेकांनी विनंती केली. त्या दृष्टीने मग आम्ही या पुस्तकाची सुधारित आवृत्ती तयार केली. त्यामुळे अनेक देशामधील लोकांना हे पुस्तक उपयुक्त ठरेल. याचा परिणाम म्हणून पन्नास भाषांमध्ये सदर पुस्तकाच्या तीन दशलक्ष प्रती छापण्यात आल्या व त्या जगभर पोहंचल्या. आमची अशी प्रार्थना आहे की आता ही आवृत्ती देखील अनेक लोकांना लाभदायक ठरावी.

या पुस्तकातील पहिली दोन प्रकरणे प्रत्येक वाचकांसाठी समर्पक असतीलच असे नाही. ज्या लोकांच्या मनामध्ये देवाच्या अस्तित्वासंबंध ी शंका आहे त्यांच्यासाठी प्रायः पहिले प्रकरण आहे. दुसरे प्रकरण हे जे लोक देवासंबंधी अनेक प्रश्न उभे करतात त्यांच्यासाठी प्रामुख्याने लिहिले आहे. तरीही सर्व वाचकांसाठी ते महत्वाचे आहे. कारण त्याद्वारे तुम्हाला तुमचा विश्वास व वर्तणूक यांचे योग्य ते मूल्यमापन करण्याची प्रेरणा मिळेल.

या पुस्तकातील जो मुख्य संदेश तुम्हाला समजला पाहिजे त्यासाठी ही प्रकरणे तुमच्या तयारीसाठी उपयुक्त ठरतील. तसेच इतर प्रकरणातील सत्य तुम्हाला विश्वासार्ह वाटेल.

प्रकरण तीन ते दहामध्ये तुम्हाला मूलभूत सत्ये दिसून येतील, ज्यामुळे देवाचा शोध घेणे तुम्हाला सोपे जाईल. म्हणूनच देवाने त्याच्या इच्छेप्रमाणे आशीर्वाद द्यावा यासाठी ही आवृत्ती आम्ही प्रभुच्या हातात देत आहोत.

मी आणि डॉरथी प्रभुचे उपकार मानतो. अनेक प्रिय जनांच्या प्रीतीकरिता व प्रार्थनेकरिता त्याचप्रमाणे अनेकांनी देवाविषयीचा आपला व्यक्तिगत अनुभव आम्हाला सांगितला त्याबद्दल आम्ही देवाचे आभार मानतो. अशा असंख्य प्रिय जनांची यादी भली मोठी आहे. त्यांना आम्ही प्रीतीने व कृतज्ञतेने म्हणतो - ‘‘आम्ही आपले आभारी आहोत.’’

# तुमच्या देवाचा शोध

*भूगर्भशास्त्र हे पृथ्वीचे आत्मचरित्र आहे. इतर सर्व आत्मचरित्राप्रमाणें ते मात्र त्याच्या मुळाशी पोहचत नाही.*

*सर चार्ल्स लिल*

# प्रकरण १

# खरोखर देव आहे काय?

तुमच्या जीवनात असे काही कठीण प्रसंग आले असतील की त्यावेळी देव प्रीती आहे कां यासंबंधी तुम्ही बुचकाळ्यात पडला असाल. कदाचित देव खरोखर अस्तित्वात आहे काय असा प्रश्न तुम्हाला त्यावेळी पडला असेल.

पवित्र शास्त्रामध्ये देवाच्या अस्तित्वासंबंधी खुलासा दिलेला नाही किंवा कुठला पुरावाही सांगितलेला नाही. तेथे देवाचे अस्तित्व सरळ गृहीत धरलेले आहे. पवित्र शास्त्रातील अगदी पहिलेच वचन म्हणजे 'प्रारंभी देवाने आकाश पृथ्वी ही उत्पन्न केली' (उत्पत्ती १:१). हे वाक्य मोठे अर्थगर्भित आहे. ते म्हटले तर साधे आहे म्हटले तर महाकठीण. या वाक्यातून देव आहे हे स्पष्ट होते आणि तोच अखिल विश्वाचा निर्माणकर्ता आहे हे दिसते.

अनेक वर्षांपूर्वी माझी पत्नी मनोरुग्णांच्या दवाखान्यात नर्स म्हणून कार्य करीत होती. तेथे देवाचे अस्तित्व न मानणारे एक अत्यंत हुशार असे मानसोपचार तज्ञ डॉक्टर होते. त्यांनी डॉरथीच्या देवावरील विश्वासासंबंधी तिला छेडले. ती त्यांना म्हणाली, ''डॉक्टर, या क्षेत्रामध्ये तुमचा नावलौकिक दांडगा आहे हे मला माहीत आहे.

त्यामुळे एक निष्णांत डॉक्टर म्हणून मी तुमचा आदरही करते. विश्वविद्यालयात तुम्ही एक हुशार प्राध्यापक आहात. वैद्यकीय क्षेत्रात तुम्ही धुरंधर आहात. तरीपण मला तुम्हाला एक सुचवावेसे वाटते. देव नाही असे पुन्हा म्हणण्या अगोदर तुम्ही पवित्र शास्त्र वाचा. ज्या ईर्ष्येने तुम्ही तुमचे मनोविज्ञानात अलौकिक संशोधन केले त्याच ईर्ष्येने पुन्हा एकदा पवित्र शास्त्र वाचा.''

नंतर तिने डॉक्टरला आठवण करून दिली की देवाच्या सामर्थ्यामुळे त्यांचे कितीतरी रूग्ण बरे झाले होते. तिने त्यांना एक-दोन रूग्णांची नावेही सांगितली व आता ते कसे अगदी तंदुरुस्त झाले हे सांगितले. ते सगळे रूग्ण आता देवाला कसे वैयक्तिकरित्या जाणीवपूर्वक ओळखतात हे डॉरथीने त्या नामवंत मनोचिकित्सकाला सांगितले. डॉक्टरलाही कल्पना होती की ते सगळे मनोरूग्ण आज उपलब्ध असलेल्या उत्कृष्ठ सुविधांशिवाय बरे झाले होते. नास्तिक किंवा एक मनोवैद्यानिक म्हणूनही त्या रूग्णांचे आयुष्य कसे बदलले हे त्यांना सांगता येणे शक्य नव्हते.

या नास्तिक डॉक्टरने सरतेशेवटी डॉरथीला त्यांच्यासाठी प्रार्थना करावयास सांगितले! त्याने यापुढे पवित्र शास्त्र मनापासून वाचण्याचे वचनही दिले.

काही आठवडे पवित्र शास्त्र बारकाईने वाचल्यानंतर त्याने डॉरथीला सांगितले की आता तो नास्तिक राहिला नाही. तरीपण त्याच्यापुढे एक समस्या होती - देवाबरोबर परिपूर्ण सहभागिता साध ण्यासाठी जीवनपद्धतीत बदल घडला पाहिजे. त्याने म्हटले - ''माझी समस्या बौद्धिक स्वरुपाची नाही. पण एक पक्का विश्वासणारा

होण्यासाठी माझ्यामध्ये जे बदल हवेत ते मला स्वीकारता येतील कां''?

आम्ही त्या डॉक्टरसाठी दहा वर्षे प्रार्थना करीत होतो आणि एक दिवस त्यांचे पत्र आले. त्यात त्यांनी स्वतःला देवाला पूर्ण समर्पित केल्याचे आणि विश्वासात दृढ असल्याचे लिहिले होते. आम्हाला ते पत्र वाचून खूप आनंद वाटला, पण त्यात आश्चर्य मात्र वाटले नाही. कारण आम्हाला माहीत होते –'विश्वास वार्तेने व वार्ता ख्रिस्ताच्या वचनाने होते' (रोम १०:१७).

आपण देवाला नीट ओळखावे म्हणून त्याने आपल्या मनात खोल सद्सद्विवेक, त्याच्या अस्तित्वाची निशाणी म्हणून रोवला आहे.

काही लोक देवावर विश्वास ठेवत नाही ही त्यांची निवड असली तरीही या पृथ्वीवर अशी एकही व्यक्ती नाही की जी देवावर विश्वास ठेवू शकत नाही.

या सृष्टीमध्ये देखील देवाच्या अस्तित्वाचे अनेक पुरावे देवच देतो. आज एकवीसाव्या शतकामध्ये विज्ञानाने सृष्टीची आणि विश्वाची अनेक गुपिते उकळण्यासाठी मोठी झेप घेतली असली तरी मनुष्याला या अथांग विश्वाची निर्मिती करणारा कोणी तरी एक आहे याची जाणीव झाली आहे. अंतराळामध्ये अंतराळ–यान भरारी मारेल याची कुणाला कल्पना नव्हती. ते यान अवकाशात शिरून पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घालेल व नेमक्या वेळी ते पृथ्वीवर सुखरूप परत येईल आणि यासाठी कुशाग्र बुद्धीचे शास्त्रज्ञ, यंत्रज्ञ यांची गरज भासेल, याची कल्पना नव्हती. तसेच सूर्यास्त आणि ऋतु, आकाशगंगा आणि अणु, गुरुत्वाकर्षण आणि प्रीतीचे सामर्थ्य ह्या सगळ्या गोष्टी त्या एका विश्व

निर्माणकर्त्याशिवाय कदापि शक्य नाहीत. देवानेच त्या अत्यंत नियोजनपूर्वक अस्तित्वात आणल्या आहेत.

'बिग बँग' मुळे अगदी नियमित व सुव्यस्थित विश्वाची निर्मिती झाली यावर विश्वास ठेवणे, हे देवाने, त्या विश्वनियंत्याने विश्वाची निर्मिती केली हे लाखोपटींनी अवघड व अप्रस्तुत वाटते. कारण निर्माणकर्त्याशिवाय निर्मिती होऊच शकत नाही.

ज्या शासनव्यवस्थेने देवाचे अस्तित्व नाकारले, तेच शासन जेव्हा जेव्हा अंतराळवीर अंतराळात पाठविते त्यावेळी हे विश्व एका विशिष्ट नियमांवर आधारीत आहे यावर विश्वास ठेवते. या विश्वाच्या विशिष्ट नियमांचे पालन केल्यामुळेच ते अंतराळवीर पृथ्वीवर सुखरूप परत येऊ शकतात. ज्या नियंत्याने हे नियम केले त्या विश्वनियंत्याचे अस्तित्व नाकारणे हे किती गैर आहे; नाही कां?

जेव्हा एखाद्या अणुबॉम्बचा विस्फोट होतो तेव्हा तो किती भयकारक असतो. ५००० अब्ज अणुबॉम्बचा विस्फोट झाल्यावर जितकी उर्जा बाहेर पडते तितकी उर्जा आपल्या सूर्यामधून दर सेकंदाला बाहेर पडते. विश्वातील अनेक आकाशगंगेमधील ताऱ्यांपेक्षा आपला सूर्य किती तरी छोटा आहे. सूर्यापेक्षा अत्यंत तेजस्वी असे किती तारे विश्वात अस्तित्वात आहेत त्यांची संख्या अजून तरी कोणाला माहीत नाही. जरी अब्जो ताऱ्यांचा मनुष्याने वेध घेतला असला तरी ते नगण्यच आहेत. अजून किती अज्ञान तारे विश्वात आहेत कोण जाणे! आपल्या सूर्यापेक्षा लक्ष पटीने अधिक ऊर्जा निर्माण करणारे असंख्य तारे विश्वातील अकाशगंगेमध्ये अस्तित्वात आहेत याची कल्पना आपल्या शास्त्रज्ञांना आहे! अशी कल्पनातील शक्ती विश्वामध्यें एका निर्माणकर्त्याशिवाय कशी अस्वित्वात असू

शकेल? त्या निर्माणकर्त्याचे सामर्थ्य देखील मनुष्याच्या कल्पने पलिकडील आहे.

म्हणून विश्वाची निर्मिती त्या निर्माणकर्त्याकडेच निश्चितपणे निर्देष करते. तो निर्माणकर्ता म्हणजेच महासामर्थ्यशाली परमेश्वर होय. त्याच्या सामर्थ्याला सीमा नाही. पवित्र शास्त्र म्हणते :

*"आकाश देवाचा महिमा वर्णिते, अंतरिक्ष त्याची हस्तकृति दर्शविते. दिवस दिवसाशी संवाद करतो. रात्र रात्रीला ज्ञान प्रगट करिते, वाचा नाही शब्द नाही त्याची वाणी ऐकू येत नाही. तरी त्याचा स्वर सर्व पृथ्वी आक्रमितो, त्याचे शब्द दिगंतरी पोहंचतात, सूर्यासाठी आकाशात त्याने मंडप घातला आहे" (स्तोत्र १९:१-४)*

*"कारण सृष्टीच्या निर्मितीपासून त्याच्या अदृश्य गोष्टी म्हणजे त्याचे सनातन सामर्थ्य व देवपण ही निर्मिलेल्या पदार्थावरून ज्ञात होऊन स्पष्ट दिसत आहेत, अशासाठी की त्यांना कसलीही सबब राहू नये" (रोम १:२०).*

म्हणून देवाचे अस्तित्व नाकारण्याची सबब कोणापाशी कधीच नाही.

**विश्वाचा प्रचंड व अतर्क्य असा पसारा पाहून कोणालाही आपण किती क्षूद्र आहोत असे वाटणे सहाजिक आहे.**

इस्त्राएलाचा राजा दाविद याला देवाच्या अस्तित्वाची जाणीव होती म्हणूनच तो म्हणतो:

*"आकाश जे तुझे अंगुली कार्य व त्यात तूं नेमिलेले चंद्र व तारे याजकडे पाहावे तर मर्त्य मनुष्य तो काय की तूं*

*त्याची आठवण करावी? मानव तो काय की तू त्याला दर्शन द्यावे"* *(स्तोत्र ८:३-४)*

आज आकाशातील ताऱ्यांसंबंधी आपले ज्ञान वाढले आहे. अति सामर्थ्यशाली दुर्बीणीमधून दशलक्षपट एवढ्या मोठ्या प्रमाणात आपण दूरच्या ताऱ्यांच्या प्रतीमा पाहू शकतो. उपग्रहामध्ये त्या दुर्बीणी व्यवस्थित बसविल्या असून त्यामधून अति दूरच्या ताऱ्यांची छायाचित्रे पृथ्वीवर पाठविली जातात. हे सगळे पाहून दाविद राजाप्रमाणेंच आपल्यालाही म्हणावेसे वाटते 'ज्या महासामर्थ्यवान देवाने अशा अद्भुत गोष्टी निर्माण केल्या तो देव माझ्यासारख्या क्षूद्र मनुष्याची कशी काळजी घेतो?

सूक्ष्मदर्शक आणि दुर्बिण यांचा शोध सुदैवाने एकाच वेळी लागला. सूक्ष्मदर्शकातून आपण अगदी सूक्ष्म अशा जगाचा (जंतूंचा) शोध घेऊ शकतो. हे सूक्ष्म जगसुद्धा अंतरिक्षातील अफाट पसाऱ्याप्रमाणेच आश्चर्यकारक आहे. हे सूक्ष्म जग नेहमीच्या प्रकाशात न्याहाळणे व त्यातील गूढ धुंडाळणे दुरापास्त आहे. साध्या सूक्ष्मदर्शकातून शास्त्रज्ञांना जे दिसत नाही ते इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोपमधून त्यांना दिसते. त्याद्वारे देखील ह्या सूक्ष्म जगाचे सौंदर्य, नियम आणि सामर्थ्य यांचा बोध आपल्याला होतो.

तुमच्या सारख्या नगण्य मनुष्याला जर असा प्रश्न पडला असेल की देव आपल्याला एवढा सांभाळतोच कसा तर एखाद्या अणुशास्त्रज्ञानाला विचारा. तो सांगेल की अणू व त्याहीपेक्षा सूक्ष्म अशा कणांचा सुद्धा विश्वाच्या रचनेत अत्यंत महत्वाचा भाग आहे. एका अणुतील न्यूट्रॉन आणि प्रोटॉन

१/१२,०००,०००,०००,०००,०००,००० इंच दूर झाले तर त्या विघटनाद्वारे वस्तुमान एकसंघ न राहता अत्यंत प्रचंड अणुस्फोट होऊ शकतो. म्हणूनच सृष्टीचा निर्माणकर्ता देव याच्या दृष्टीने वस्तुंची प्रचंडता आणि सूक्ष्मता अशी दोन्ही सारखीच महत्वाची आहेत.

म्हणून जेव्हा आपण प्रश्न करतो की - मर्त्य मनुष्य तो काय की तूं त्याची आठवण करावी? तेव्हा आपण स्वतःला समजवावे की मनुष्याच्या आकारावर देवाच्या प्रीतीचे मोल अवलंबून नाही. याउलट देवाला आपले मोल इतर काही कारणास्तव वाटते. देवाच्या दृष्टीने आपण कसे मोलवान आहोत हे त्याने आपल्याला दाखवून दिले आहे.

अखील सृष्टी देवाचे गौरव करते, त्याचे सामर्थ्य प्रगट करते. तरी देव किती प्रेमळ व कृपाळू आहे हे त्याने दुसऱ्या मार्गाने प्रगट केले. त्याला आमची फार काळजी वाटते. अशा देवाचा जर तुम्हाला शोध घ्यावयाचा असेल तर तुमचा अध्यात्मिक गुरू अगदी विश्वासपात्र असला पाहिजे हे अगत्याचे आहे.

## *विचार करा*

१. मूठभर लोखंडाचा कीस तुम्ही हवेत उधळला तर तो कीस खाली आल्यावर तुम्हाला हातामध्ये एखादे सुंदर घड्याळ पकडता येईल अशी अपेक्षा तुम्ही करता काय?

२. विश्वामधील सगळ्या सुनियमित आणि अद्‍भूत क्रिया निर्माणकर्ता देव याच्याशिवाय कधीतरी शक्य आहेत काय?

३. सृष्टीच्या निर्मितीतून निर्माणकर्त्या देवाचे प्रगटीकरण होते की तो न्यायी, सर्वसामर्थी, महाशक्तीशाली व नियमबद्ध आहे परंतु केवळ निर्मितीद्वारे तुम्हाला देवाच्या प्रीतीची व कृपेची जाणीव होते का?

*ज्याच्यापाशी दिवा आहे त्याला अंधाऱ्या गुहेमधून सहजपणे चालता येते.*

प्लेटो

*सृष्टी म्हणजे गुहेच्या तोंडाशी असलेला अंधुक प्रकाश तर देवाचे वचन म्हणजे दिवा होय.*

ए.एच.स्ट्रॉंग

# प्रकरण २

# तुमचा आध्यात्मिक गुरु विश्‍वसनीय आहे काय?

काही दिवसांपूर्वी वर्तमानपत्रामध्ये रडारयंत्रेणमध्यें दोष निर्माण झाल्यामुळे काही लोक मरण पावले ही बातमी प्रसिद्ध झाली होती. परंतु जेव्हा आपली आध्यात्मिक रडार यंत्रणा बिघडते आणि आध यात्मिक संहार होतो तेव्हा तो किती तरी भयंकर स्वरुपाचा असतो.

आज जगभर अनेक विसंवाद आहेत. प्रत्येक गट आपणच कसे इतरांना देवाप्रत नेऊ शकतो याचा अट्टाहास धरीत आहेत. पण तुम्ही कोणावर विश्‍वास ठेवणार? परंतु तुमचा देवाविषयी शोध चालू असताना तुम्ही चुकीच्या मार्गाने जाता कामा नये कारण हा प्रश्‍न अनंतकालच्या जीवनाचा आहे.

इंग्लंडचे पंतप्रधान ग्लॅडस्टोन म्हणतात, ‘‘पवित्र शास्त्र म्हणजे उत्पत्तीचा उत्तम पुरावा आहे आणि पवित्र शास्त्राचे सर्व विरोधक आपोआप दूर सारले जातात.’’

अमेरिकेचे अध्यक्ष अब्राहाम लिंकन म्हणाले, ‘‘पवित्र शास्त्र ही देवाने मानवाला दिलेला सर्वोकृष्ठ देणगी आहे.’’

जगाच्या इतिहासातील अनेक श्रेष्ठ व्यक्तींनी पवित्र शास्त्राचे एकमेवपण कबूल केले आहे आणि त्यांनी कबूल केले आहे की पवित्र शास्त्राचे श्रेष्ठत्व कधीही नष्ट होऊ शकत नाही.

आपल्या आध्यात्मिक गुरूसंबंधी दावीदराजाची खात्री होती. तो म्हणतो, *'तुझे वचन माझ्या पावलांकरिता दिवा व माझ्या मार्गावर प्रकाश आहे' (स्तोत्र ११९:१०५).*

अनेक लोकांचा आजमितीला असा पूर्ण विश्वास आहे की पवित्र शास्त्राद्वारे ते देवापर्यंत पोहंचू शकतात. पवित्र शास्त्र नष्ट करण्याचा अनेकदा प्रयत्न करण्यात आला परंतु सर्व दुष्ट प्रयत्नामधून ते आजतागायत जिवंतच राहिले आहे. खरोखर जगामध्ये जितकी पुस्तके अस्तित्वात आहेत त्यामध्ये पवित्र शास्त्र एकमेव आहे.

पवित्र शास्त्र एकमेव आणि अस्सल आहे याची खात्री लोकांना हवी असते, देवाने त्यावर 'देवाचे वचन' म्हणून शिक्कामोर्तब केले आहे. इतिहासावरून आणि पवित्र शास्त्रातील वचनांवरून कोणाही सूज्ञ वाचकाला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवेल की *''प्रत्येक ईश्वर प्रेरित शास्त्रलेख सद्‌बोध, दोष दाखविणे, सुधारणूक, नीतिशिक्षण याकरिता उपयोगी आहे'' (२ तीमथ्य ३:१६)*

जर पवित्र शास्त्र कोणा एकानेच लिहिले असते तर ते अधिक क्रमवार व पद्धतशीरपणे लिहिले आहे ह्याचे आपल्याला नवल वाटले नसते. हे पवित्र शास्त्र कोणा एकाने लिहिले नाही. ते अनेक व्यक्तींद्वारे वेगवेगळ्या स्वरुपाच्या समाज, संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर अनेक शतकांमध्ये लिहिले गेले. तरीही त्या संपूर्ण पवित्र शास्त्रामध्ये एकवाक्यता वाढळते. देवासंबंधीचे सत्य अगदी सहजपणे आणि

तेवढ्याच अनन्यसाधारणरित्या पवित्र शास्त्रात दिसून येते आणि हे सगळेच मोठे लक्षणीयच नव्हे तर अलौकिक असे आहे!

याबरोबर अनेक पुरातत्व संशोधकांनी पवित्र शास्त्राची सत्यता अनेक पुराव्यांनिशी सिद्ध केली आहे. ज्या घटनांची पूर्वी कपोलकल्पित म्हणून हेटाळणी केली गेली त्याच घटनांची सत्यता पुरातत्व संशोधकांच्या कुदळ-खोऱ्यांनी * आज सत्य म्हणून जगासमोर नोंद केली.

**खरेच पवित्र शास्त्र हे देवाचे पुस्तक आहे आणि जगातील सर्व मानवांकरिता त्यामध्ये देवाचा संदेश आहे.**

पवित्र शास्त्र हे देवाचे पुस्तक आहे हे सत्य असले तरी अनेकजण त्यापासून तोंड फिरवतात. जग दोन लोक गटांमध्ये विभागले आहे. एक शास्त्रज्ञांचा की जे वैज्ञानिक पुराव्याचाच पाठपुरावा करतात आणि दुसरा गट विश्वासणाऱ्यांचा की जे डोळे झाकून वैज्ञानिक पुराव्यावाचून देवाचे वचन विश्वासाने स्वीकारतात. खरे शास्त्रज्ञ हे खरे विश्वासणारे असूच शकत नाहीत. तरीही आज अनेक शास्त्रज्ञ असे आहेत की ते असा विचार करीत नाहीत. पवित्र शास्त्र हे एक विज्ञान संशोधनाचे पुस्तक नाही. जेथे जेथे पवित्र शास्त्रात काही वैज्ञानिक

---

* उदाहरणार्थ, १८६८ मध्ये जर्मन यात्रेकरू क्लीन ने आधुनिक मवाब राजाच्या प्रांताला भेट दिली. आज त्याला यार्देन म्हणतात. त्याठिकाणी त्याला दगडी पाटीवर ३४ ओळी लिहिलेल्या दिसल्या. त्या ओळी मवाबचा राजा मेशाने लिहिल्या होत्या. तो इस्राएलावर उलटला होता; या स्मरणार्थ त्या संग्रहीत होत्या. अम्री व अहाबचा उल्लेख २ राजे १ ल्या अध्यायात आढळतो व दगडी पाट्यांवर देखील आढळतो. दोन्ही ठिकाणी आपल्याला सांगण्यात आले आहे की हे इस्राएली राजे मवाबाच्या विरोधात होते. आज जे शोध लागत आहेत ते शोध आपल्याला बायबलच्या लिखाणाच्या सत्यतेविषयी पुरावा देतात की बायबलमध्ये लिहिलेल्या गोष्टी ऐतिहासिक सत्य आहेत.

बाबींचा उल्लेख आला आहे तेथे, वैज्ञानिक सत्य नाकारले गेले नाही हे महत्वाचे आहे. वास्तविक पाहाता, पवित्र शास्त्राचा हेतु व त्याची मांडणी ही विज्ञानाच्या तत्वांच्या सीमेपलीकडील आहे.

उदाहरणार्थ, आपण या पृथ्वीतलावर कशासाठी आहोत हे विज्ञानाला स्पष्ट करता येत नाही. तसेच या इहलोकानंतर आपले पुढे काय होणार हे विज्ञान स्पष्ट करू शकत नाही. जीवनाचा नेमका हेतू काय आहे हे विज्ञान स्पष्ट करू शकत नाही. तसेच एखाद्या व्यक्तीच्या जीवनाचे मोल किती आहे हे विज्ञान सांगू शकत नाही. एखादा मनुष्य कितीही हुशार असला किंवा सर्वसाधारण असला तरी प्रत्येक मनुष्याला देवासंबंधी सत्य शोधण्यासाठी दैवी मदतीची गरज भासते. म्हणूनच जगप्रसिद्ध फ्रेंच गणिती व तत्वज्ञानी ब्लेस पास्कल म्हणतो, ‘‘बुद्धिमत्तेची परमोच्यता म्हणजे आपण बुद्धीवान नाही असे समजणे होय’’, जीवनासंबंधी महत्वाचे प्रश्न आपल्याला पवित्र शास्त्राशिवाय सोडविता येणे केवळ अशक्य आहे.

**पवित्र शास्त्र हे देवाचे पुस्तक आहे, यासाठी आपण दोन गोष्टी ध्यानात घेऊ या.**

पहिली गोष्ट म्हणजे पवित्र शास्त्रात दिलेल्या अचूक भविष्यवाण्या. दुसरी गोष्ट म्हणजे ज्या लोकांनी पवित्र शास्त्रातील संदेश गंभीरपणे स्वीकारला त्यांच्या जीवनात दिसून येणारा देवाच्या वचनाचा सामर्थ्यशाली प्रभाव.

## पवित्र शास्त्रातील भविष्यवाण्यांची अचूकता –

आपल्या भविष्यांत पुढे काय घडणार आहे याची उत्सुकता प्रत्येकालाच असते. पवित्र शास्त्रामध्ये भविष्यात पुढे काय घडणार

आहे अशी महत्वाची भाकिते सांगितली आहेत. काही घटनांचा बारीक तपशीलसुद्धा दिलेला आढळतो. तुम्ही कदाचित प्रश्न कराल, ‘तुम्हाला त्यासंबंधी एवढी खात्री कशी वाटते?’’

या प्रश्नाचे उत्तर समजून घेण्यासाठी अशी कल्पना करा की तुम्ही एका अनोळख्या देशात सुट्टीसाठी गेला आहात. तुमच्या हातामध्ये त्या देशाचा नकाशा तुमच्या मार्गदर्शनासाठी आहे. कालपर्यंत तुमचा त्या नकाशावर पूर्ण विश्वास होता कारण त्यात दर्शविलेल्या नदीकाठच्या गावात तुम्ही रात्री मुक्कामही केला होता. आज तुम्हाला दुसऱ्या मार्गाने पुढे जावयाचे आहे. तुमच्या समोर सगळा अनोळखी प्रदेश आहे; परंतु तुमच्या हातातील नकाशाप्रमाणे तुम्ही आता डावीकडे वळला म्हणजो पुढे तुम्हाला जंगलात एक तलाव लागेल. आता तुम्हाला तो तलाव पाहावासा वाटेल, मग तुम्ही काय कराल? नकाशातील मार्गदर्शनानुसार तुम्ही डावीकडे वळला, होय ना? असे करण्याचे तुम्ही निश्चितपणे ठरवाल कारण कालच तुम्हाला त्या नकाशातील सत्यतेचा पडताळा आला होता. तुम्हाला काय हवे ते त्या नकाशामुळे सापडले होते.

पवित्र शास्त्र हे देवाचे पुस्तक आहे याचा खात्रीशीर पुरावा म्हणजे त्यामधील दिलेल्या भविष्यवाण्यांची अचूकता. पवित्र शास्त्रातील प्रत्येक पानावर अशी भविष्यवाणी दिली आहे आणि आज आपण पाहातो की ती प्रत्येक भविष्यवाणी पूर्ण झाली आहे व होत आहेत. शेकडो वर्षापूर्वी भाकितें केली ती भविष्यात पूर्ण झालेली आपण पाहातो.

ही भविष्यवाणी पृथ्वीवरील सर्व लोकांसाठी आहे. त्यात इस्त्राएल आणि मध्यपूर्वेसंबंधी विशिष्ट भविष्यवाणी आहे. मसीहाच्या येण्यासंबंधी

तर अगदी अचूक भविष्यवाणी अनेकवेळा केलेली आढळते. मसीहाच्या येण्यासंबंधी त्या काळी केलेली भविष्यवाणी आता इतिहास झाला आहे. मसीहाचा जन्म, त्याचे जीवन व मरण यासंबंधी केलेली शेकडो वर्षापूर्वीची भविष्यवाणी किती तंतोतंत खरी झाली हे आता आपल्या लक्षात येते.

या घटनांवरून आपण निश्चितपणे असा तर्क सत्यार्थाने लावू शकतो की पवित्र शास्त्रात भविष्यकाळासंबंधी जी जी भाकिते केली आहेत ती सर्व यथविकास पूर्ण होतीलच. त्यामधील अनेक भाकिते आज तुमच्या डोळांदेखत पूर्ण होत आहेत हे तुम्ही स्वतःच्या डोळ्यांनी पाहातच आहात. पवित्र शास्त्र वाचणे म्हणजे उद्याचे वर्तमानपत्र वाचणे असेच आहे खरे!

विल्बर स्मीथ हे पवित्र शास्त्राचे आयुष्यभर अभ्यासक होते. पवित्र शास्त्रामधील भाकितांची अचूकता अभ्यासण्यात त्यांना खूप आनंद वाटे. जुन्या करारातील काही विरोधाभास दर्शविणारी मसीहासंबंधीची भाकिते पाहून इतर धर्मीय स्वतःचे सत्य इतर धर्मीयांवर लादू पाहात होते. तेव्हा विल्बर स्मीथ म्हणाले, ‘‘इस्लामध्ये महंमद पैगंबरासंबंधी त्याच्या जन्मापूर्वी, तो येणार यासंबंधी शेकडो वर्षे अगोदर भविष्यवाणी करण्यात आली नाही. तसेच इतर कोणत्याही धर्मात त्यांच्या धर्मसंस्थापकांच्या जन्मासंबंधी त्यांच्या जन्मापूर्वी कधीही भविष्यवाणी झालेली नाही.’’

आपण तशा ‘तथाकथित’ भविष्यवाणीची, जी समजण्यासाठी फार अंतःप्रेरणेची गरज नाही तीही नीट ध्यानात घेतली पाहिजे.

आज संगणकाच्या सहाय्याने, निवडणूकांच्या दरम्यान घेतलेल्या मुलाखती व गतइतिहास, विविध माध्यमांनी वर्तविलेल्या तर्कानुसार व

पाहाणीनुसार निवडणूकीपूर्वीच कोणता उमेदवार निवडणूक जिंकेल याची भाकिते केली जातात. जवळ असलेल्या सर्व आकडेवारीनुसार कोण जिंकेल हे सांगणे माध्यमांना फारसे कठीण नाही तरीही अनेकदा त्यांचे अंदाज चुकतातही!

परंतु पन्नास वर्षानंतर निवडणूकीच्या रिंगणामध्ये कोण असेल हे प्रसार माध्यमांना विचारा. त्या निवडणूकीत कोण जिंकेल, तो जिंकून येणारा उमेदवार कोठे जन्मेल, त्याची भावी जीवनशैली कशी असेल आणि कोणत्या परिस्थितीत व कसा त्याचा मृत्यु होईल हे ही विचारा. त्याच्याही पलिकडे जाऊन माध्यमांना विचारा की आजपासून १००० वर्षानंतर मध्यपूर्वेची स्थिती कशी असेल. कोणती शहरे मनुष्य वस्तीविरहीत असतील हे विचारा. त्यांना वरील कोणतीच गोष्ट सांगता येणार नाही.

त्या पत्रकारांना अधिकचे भविष्य सूचित करण्याचे भाग पडेल आणि त्यावेळी अगदी अचूक काय घडेल हे त्याला सांगता येणार नाही. अर्थात अनादिअनंत देवाने त्याला दाखवून दिल्याशिवाय तो काही सांगू शकणार नाही. तसे झाले तरच तो पत्रकार सुरुवातीपासून शेवटपर्यंतचे भविष्य अचूक सांगू शकेल. त्या पत्रकाराप्रमाणे, पवित्र शास्त्रामध्ये अचूक अशी भविष्यवाणी देवाने केली आहे.

सोरचा इतिहास पाहा. त्या शहरासंबंधी देवाने वर्तविलेली भविष्यवाणी अक्षरशः पूर्ण झाली.

तुम्हाला वाटले तर यहज्केल २६:३-२१ मधील भविष्यवाणी जरूर वाचा, व नंतर इतिहास वाचा. दोन्ही ठिकाणी तुम्ही तेच वाचाल. पहिली आहे ती भविष्यवाणी तर दुसरा आहे तो इतिहास.

भाकित:सोरमध्ये अतिशय कठीण परिस्थिती येईल यासंबधी

देवाने फार पूर्वीच भाकित केले होते. तो म्हणाला,

*“यास्तव प्रभु परमेश्वर म्हणतो....मी तुजविरुद्ध आहे. ...मी तुजवर बहुत राष्ट्रे लोटीन. ते सोरेच्या तटांचा विध्वंस करतील व तिचे बुरूज पाडून टाकितील. मी तिजवरील माती खरडून काढून तिचा उघडा खडक करीन...मी समुद्रात जाळी पसरण्याचे ठिकाण होईल. ....तुझे रंगमहाल पाडून टाकितील, तुझे पाषाण, लाकूड, माती वगैरे सर्व काही पाण्यात बुडवून टाकतील.” परंतु एवढे सांगून भविष्यवाणी स्पष्ट होत नाही. देवाने पुरातन सोरला म्हटले, “मी तुझा उघडा खडक करून तुला जाळे पसरण्याचे ठिकाण करीन” (यहज्केल २६:३, ४,१२,१४).*

**इतिहास :** इतिहास वाचल्यावर तुमच्या लक्षात येईल की नबुखद्नेस्सर राजाने जुन्या सोर शहराचा विध्वंस केला. अगोदरच भविष्य केल्याप्रमाणे त्याने शहराचे तट व बुरूज जमीनदोस्त केले. नंतर सिकंदरच्या लोकांनी त्या शहराच्या जमीनीवरील सर्व माती खरडून काढली व केवळ खडक तेथे राहिले.

नंतर ती सगळी माती व खडक, दगड इ. त्यांनी समुद्रात भर टाकून रस्ता बनविला. भविष्य वर्तविल्याप्रमाणे सगळे घडले. लाकूड, पाषाण, माती इत्यादी समुद्राच्या पाण्यात बुडवून टाकण्यात आले. आज देखील जुन्या सोर नगराचे हे अवशेष समुद्रात बुडालेले दिसतात. देव बोलला तसे सगळे घडले.

आज मध्यपूर्वेत नवीन सोर शहर वास्तविण्यात आले आहे. परंतु ते म्हणजे प्राचीन सोर नगर नव्हे, ते तर १२९१ मध्ये पूर्ण उध्वस्त झाले होते.

जर तुम्ही प्राचीन सोर नगरीचा परिसर आज पाहिलात तर त्या सर्व भविष्यवाण्या पूर्ण झाल्याचे तुम्हाला दिसेल. मासे पकडणाऱ्या मच्छीमारांची घरे तुम्हाला तेथे दिसतील. मच्छीमारांच्या नौका समुद्रावर तरंगतांना दिसतील. विशेष म्हणजे त्यांची जाळी खडकावर पसरलेली दिसतील! मनुष्याच्या बुद्धीसामर्थ्याने असे भविष्य कधीच वर्तविता आले नसते. जुन्या सोर शहराचा विध्वंस अशाप्रकारे होईल हे मनुष्याच्या बुद्धीद्वारे कधी सांगता आले असते काय?

पीटर स्टोनर यांनी सोर नगराचा इतिहास व त्यासंबंधी वर्तविण्यात आलेली भविष्यवाणी याचा तुलनात्मक अभ्यास केला. यहज्केलाच्या भाकीतांचा अगदी शास्त्रोक्त अभ्यास केल्यानंतर स्टोनर म्हणतो :

‘जर यहज्केलने सोर नगर त्याच्या काळात पाहिले असते व ही सात भविष्ये मानवी बुद्धीने कथन केली असती तर त्यापैकी ७५,०००,००० पैकी एक भविष्यवाणी खरी ठरली असती. परंतु सर्व भविष्यवाणी अगदी तंतोतंत पूर्ण झाली आहे.”

आता एखाद्या बालकाच्या जन्मासंबंधीची भविष्यवाणी कशी पूर्ण होते ते पाहा.

एक निवृत्त जकातदार मत्तय याने येशू जन्मला तेव्हा चार भविष्यवाण्या कशा पूर्ण झाल्या याची नोंद केली आहे. त्यापैकी एका भविष्यवाणीत त्याने मीखाचा संदर्भ दिला. मीखाने त्याच्या काळातील राजांवर कडाडून हल्ला केला. त्याच्या काळात कोणताही मातब्बर पुढारी नव्हता म्हणून मीखा दुःखी होता. परंतु देवाने त्याला दाखवून दिले की एक तेजस्वी ‘पुढारी’ निर्माण होईल. त्या पुढाऱ्याचा जन्म कोठे होईल हे ही त्याने सांगितले,

*'हे बेथलहेम एफ्राथा, यहूदाच्या हजारांमध्ये तुझी गणना अल्प आहे, तरी तुजमधून एक जण निघेल, तो मजसाठी, इस्त्राएलाचा शास्ता होईल त्याचा उद्भव प्राचीन काळापासून अनादिकाळापासून आहे' (मीखा ५:२)*

इस्त्राएलचा शास्ता बेथलहेम एफ्राथामध्ये येशू जन्मेल हे देवाने दाखवून दिले.

मीखाच्या भविष्याप्रमाणे येशूचा जन्म झाला. तो त्याच्या कुळाच्या नासरेथ येथे जन्मला नाही तर बेथलेहेमात जन्मला. रोमी बादशहाच्या दवंडीप्रमाणे तो बेथलहेम नगरात जन्मला. नावनिशी नोंदवण्याचे फर्मान होते व येशूच्या माता-पित्याने त्या शाही फर्मानाचे पालन केले. त्यासाठीच त्यांनी आपले गाव सोडले व ते बेथलहेमास गेले. बेथलहेम म्हणजे यहूदा प्रांतातील एक छोटे गाव होते. तेथे राजा जन्मास येईल असे कोणालाही वाटले नसते. त्याच्या जन्माच्यावेळी जे अडथळे आले ते फार अवघड होते. तरीही मीखाच्या भविष्यवाणीप्रमाणे सर्व घडले. येशूसंबंधी अनेक भविष्यवाण्या आहेत, ही त्यापैकीच एक आहे.

देव म्हणतो ते आपण वाचतो :

*'मी आरंभीच शेवट कळवितो, होणाऱ्या गोष्टी घडण्यापूर्वी त्या मी प्राचीन काळापासून सांगत आलो आहे, माझा संकल्प सिद्धीस जाईल, माझा मनोरथ मी पूर्ण करीन' (यशया ४६:१०).*

*'मी मागेच पूर्वीच्या गोष्टी सांगितल्या, माझ्या मुखातून त्या निघाल्या, मी त्या कळविल्या, मी त्या अकस्मात करू लागलो आणि त्या घडून आल्या'.....*

*म्हणून हे बहुतकाळापूर्वीच तुला कळविले ते घडावयापूर्वीच*

*तुला विदित केले. नाही तर तू म्हणाला असतास की माझ्या मूर्तीने ते केले. माझ्या कोरीव मूर्तीच्या आज्ञेने व माझ्या ओतीव मूर्तीच्या आज्ञेने ते झाले" (यशया ४८:३,५)*

देवाने दिलेली प्रत्येक भविष्यवाणी १०० टक्के तंतोतंत पूर्ण झाली आहे याला इतिहास साक्ष आहे.

## पवित्र शास्त्राचा सामर्थ्यवान प्रभाव

पवित्र शास्त्र हे देवाचे वचन आहे याचा दुसरा पुरावा म्हणजे त्याचा सामर्थ्यवान असा प्रभाव. मानवी वंश हे सामाजिक, सांस्कृतिक आणि वैयक्तिक दृष्ट्या देवाच्या संदेशामुळे मान्यता पावले. जेथे जेथे देवाचे वचन पोहंचले तेथे त्याचा अत्यंत मोठा प्रभाव तेथील मनुष्यांवर पडला.

या पुस्तकाची पहिली आवृत्ती छापण्यापूर्वी आमचा एक नवीनच मित्र आमच्या भेटीसाठी घरी आला. आम्ही त्या आवृत्तीची छाननी केली. जेव्हा आम्ही सातव्या प्रकरणाची छाननी करू लागलो तेव्हा तो अचानकपणे सद्‌गतीत झाला व अनाहुतपणे त्याच्या डोळ्यात पाणी आले. तेव्हा आम्ही दोन वेळा वाकून प्रार्थना केली. प्रीतीपूर्ण देवाची स्तुती केली. आम्ही मनापासून त्याचे आभार मानले. देवाची जी प्रीती आम्ही त्या प्रकरणात वाचत होतो, त्यामुळे आमचे अंतःकरण भरून आले. आमच्या अपात्र अशा जीवनात देवाची करूणा, प्रीती आणि त्याची सहनशीलता किती अमर्याद आहे या जाणीवेने आम्ही मिळून त्याचे आभार मानले. देवाच्या थरारक अस्तित्वाच्या जाणीवेने आमचे ऊर आनंदाने भरून आले.

तो दिवस आमच्या मित्रासाठी फार महत्वाचा होता. बरोबर

एक वर्षापूर्वी याच दिवशी तो एका अलिशान घरात एकटाच उदास असा बसला होता पण आज तो आमच्याबरोबर या साध्या घरात आनंदाने ओतप्रोत भरला होता.

परंतु ज्या सुंदर वातावरणात तो पूर्वी होता त्यामुळे त्याला त्यावेळी आनंद वाटला नाही. वास्तविक त्याचे अंतःकरण एवढे उदास झाले होते की त्याला जगण्याची देखील इच्छा नव्हती. सुखाच्या शोधात त्याच्यामधील पशूवृत्तीच उफाळून येत होती. कोकेनच्या व्यसनापायी त्याचे जीवन संपुष्टात येत होते. ब्रॅन्डी, व्हिस्की अशा मादक पेयांमुळे तो रोजचे जीवन कसेतरी ढकलत होता. युरोपात आणि सगळ्या जगातच अत्यंत धनाढ्य लोकांबरोबर तो मेजवान्या झोडीत होता. पण त्या रात्री तो अगदीच एकाकी होता. त्या एकाकीपणात त्याला सभोवारच्या भीतीदायक जगाची जाणीव झाली. आता यातून सुटण्याचा एकही मार्ग नाही असे त्याला वाटू लागले.

गोळ्यांनी भरलेले पिस्तुल त्याने आपल्या कानशीलावर रोखून धारले. ‘आता १/८ इंच अंतरावरून मी हा पिस्तुलाचा चाप ओढला की सगळे दुःख कायमचेच नाहीसे होईल’ असा विचार त्याच्या मनात होता. आणि नेमक्या त्याच क्षणी दूरदर्शनवर दुसराच कार्यक्रम सुरू झाला (तो कसा सुरू झाला हे माझ्या त्या मित्राला समजले नाही). आता त्या कार्यक्रमातून त्याला पवित्र शास्त्रामधील संदेश ऐकू येऊ लागला. त्यातून पुढील महान आशेसंबंधी संदेश होता. त्या एकाकी मध्यरात्री, तो जमिनीवर उपडा पडला. जिवंत देवाची करूणा भाकू लागला. क्षमेची याचना करू लागला, दयेची भीक त्या जगनियंत्याकडे मागू लागला.

देवाच्या सामर्थ्याने माझ्या मित्राचे जीवन आमुलाग्र बदलून गेले. पूर्वीचा तो आणि आता नवीन झालेला तो यामध्ये जमीन

अस्मानचा फरक पडला होता. त्याच्या जन्मापूर्वी त्याचे आईबाप त्याच्यासाठी प्रार्थना करीत होते. तरुणपणी त्याने जरी पवित्र शास्त्र वाचले होते तरी त्यातील संदेश त्याने कधीच मनावर घेतला नव्हता. त्याच्या जीवनातील मौजमजेपुढे त्याला देवाचे काहीच महत्व वाटले नव्हते. मनाला येईल तो स्वैराचार तो करीत राहिला.

सतरा वर्षानंतर, त्या अविस्मरणीय रात्री त्याला देवाचा शोध लागला, तेव्हा त्याने एक छान वही विकत आणली. त्या वहीमध्ये त्या रात्रीनंतर जीवनात घडणाऱ्या प्रत्येक घटनेची नोंद करण्याचा त्याचा उद्देश होता. मागील सतरा वर्षामधील स्वैराचारासंबंधी मात्र एकही नोंद करण्यात आली नाही.

त्या सतरा वर्षांमध्ये माझ्या मित्राने जिवंत देवापासून आपले तोंड फिरविले होते व तो खोट्या व न तृप्त करणाऱ्या आत्मिक मार्गावर चालू लागला होता. रोज रोज तो स्वतःच्या राशी भविष्याचा इशारा पाहत होता. तो रॉक संगीत ऐकत होता व रॉकच्या कार्यक्रमांना जात होता. बघता बघता तो खोट्या शिकवणीच्या पंथाचा झाला. पुढे त्याला जडलेल्या योगाच्या वेडाने त्याला हिंदू धर्माच्या तत्वज्ञानाच्या अभ्यासाकडे वळविले. कालांतराने तो पौवार्त्य गूढविद्येमध्येही तो गढून गेला. त्या संपूर्ण कालावधीमध्ये घडलेल्या अनेक घटनांपैकी एकीची सुद्धा नोंद त्याच्या वहीत त्याने केली नाही. ज्या अस्मरणीय रात्री त्याला जिवंत देवाची ओळख झाली त्या रात्रीपर्यंत त्या वहीतील पाने कोरेच राहिले.

परंतु त्या रात्री त्याने त्या वहीत पहिली नोंद केली. त्याने जे लिहिले होते ते वाचून मला आनंद वाटला. देवाच्या प्रीतीने व कृपेने तारलेल्या एका माणसाची ती एक सच्ची नोंद होती. त्याच्या आत्मिक

सौंदर्याचा तो एक सहज सुंदर अविष्कार होता. देवाने त्याच्यावर विपुल कृपा केली होती आणि त्याचे आत्मिक आंधळेपण दूर केले होते. खोल निराशा आणि मृत्युपासून त्याला सावरले होते. देवाची अवर्णनीय प्रीती आणि त्याचे सत्य त्याला समजले होते.

माझ्या त्या मित्राप्रमाणे अनेक जण आत्मिक संभ्रमात असतात. तो दूर व्हावा म्हणूनच देवाने स्वतःला एका पुस्तकामधून प्रगट केले. ते पुस्तक म्हणजेच पवित्र शास्त्र होय. या पवित्र शास्त्रापासून तुम्ही पाठ फिरविली. त्या एकाच आत्मिक मार्गदर्शकाला झुगारले तर तुम्ही जरूर संभ्रमात पडाल व चुकीच्या मार्गावर चालाल; परंतु तुम्हाला खरोखर देवाचा शोध हवा असेल तर पवित्र शास्त्राकडे वळा. त्यातून तुम्हाला निश्चित आध्यात्मिक प्रकाश आणि योग्य ते मार्गदर्शन मिळेल.

देवाच्या वचनामधूनच तुम्हाला देवाची खरी ओळख पटेल. पवित्र शास्त्रामधून तुम्हाला सत्य काय आहे हे समजेल. देवाचे वचन आणि जगाचा प्रकाश याची खरी जाण तुम्हाला पवित्र शास्त्रातूनच येईल.

प्रभु, तुझा शब्द पुरे आम्हा,
आमच्या पावलासाठी प्रकाश
जो ठेवी विश्वास सत्यवचनावर
प्रकाश आणि आनंद मिळे त्यांसी

### विचार करा

१. पवित्र शास्त्रात दिलेल्या भविष्यवाणीप्रमाणे अगदी अचूक अशी भविष्यवाणी इतर कोणत्या तरी ग्रंथात सापडेल काय?

२. पवित्र शास्त्रामधील संदेशाकडे लक्ष देऊन ते स्वीकारल्यामुळे ज्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला आहे. अशा लोकांशी तुमची वैयक्तिक ओळख आहे काय?

३. पवित्र शास्त्रातील संदेशाकडे तुम्ही काना-डोळा केला काय? त्यातील वचने लक्षपूर्वक वाचण्याचे तुम्ही टाळता काय?

*देवासंबंधीच्या प्रश्नांपुढे, पृथ्वी व स्वर्गामधील प्रश्न काहीच नाहीतः म्हणजे देव आहे, तो कसा आहे आणि आम्ही नीतिमान मनुष्य म्हणून त्याच्यासाठी काय केले पाहिजे.*

*ए.डब्ल्यू.टोझर*

# प्रकरण ३

# देव कसा आहे?

जीवनामध्ये प्रत्येकाने एक प्रश्न विचारला आहे - 'देव कसा आहे?' वास्तविक देवानेच या प्रश्नाचे उत्तर दिले आहे; तरी अनेक जण उगाच वेगवेगळ्या कल्पना लढवीत असतात. पवित्र शास्त्रात देव स्वतःबद्दल काय म्हणतो हे ते नीट वाचतच नाहीत.

असे लोक पवित्र शास्त्रातील एका महत्वाच्या वचनाची अगदी उलटापालट करतात. देव म्हणाला, "आपल्या प्रतिरुपाचा व आपल्याशी सदृश असा मानव आपण करू" (उत्पत्ती १:२६). तर हे लोक म्हणतात, "आपल्या प्रतिरुपाचा देव आपण करू." आणि त्या मनुष्यांनी 'अविनाशी देवाच्या गौरवाचा, नाशवंत मनुष्य, पक्षी, चतुष्पाद प्राणी व सरपटणारे प्राणी यांचा आकाराच्या मूर्तीशी मोबदला केला' (रोम १:२३). मनुष्यांनी कल्पिलेला प्रत्येक 'देव' अगदी सामर्थ्यहीन आणि हिडीसही आहे.

कोणी मनुष्य कितीही बुद्धिमान असला तरी जिवंत देवाचा शोध स्वतःच्या विद्वत्तेने करू शकत नाही, 'जगाला आपल्या ज्ञानाच्या योगाने देवाला ओळखता आले नाही' (१ करिंथ १:२१). जर मनुष्याच्या अल्पबुद्धीला देव ओळखता आला असता तर तो देव अगदीच छोटा असता. जर काही बुद्धीवान माणसांनाच देवाचा शोध करता आला

असता तर जे लोक बुद्धिवान नाहीत त्यांना देवाचा शोध कधी करताच आला नसता. परंतु सुदैवाने तसे काहीच नाही.

उलट पक्षी आत्मिक बुद्धी सर्वांनाच देण्यात आली आहे. आफ्रिकेमधील जंगली टोळीतील मनुष्य असो किंवा एखाद्या विश्वविद्यालयातील प्राध्यापक असो दोघांनाही ती सारखीच शक्य आहे. कारण आत्मिक बुद्धी ही कसल्या शिक्षण प्रक्रियेवर अवलंबून नाही. जे लोक देवाचा नम्रपणे शोध घेण्यास, त्याला मनापासून ओळखण्यास उत्सुक आहेत त्यांनाच देवाची ओळख पटू शकते.

*तुम्हापैकी जो कोणी ज्ञानाने उणा असेल त्याने ते देवाजवळ मागावे म्हणजे ते त्याला मिळेल कारण तो कोणास दोष न लावता सर्वांस उदारपणे देतो" (याकोब १:५). अशा प्रकारचे ज्ञान हे जगिक नसून स्वर्गीय असते. जगातील कोणत्याही राजाला जगिक कारणातून ते प्राप्त होत नाही. " ते ह्या युगातल्या अधिकाऱ्यांतील कोणालाही कळत नव्हते. कारण त्यांना ते कळले असते तर त्यांनी गौरवाच्या प्रभुला वधस्तंभावर खिळले नसते....आपल्याला जगाचा आत्मा नव्हे तर देवापासून निघणारा आत्मा मिळाला आहे ह्यासाठी की जे देवाने आपल्याला कृपेने दिले ते आपण ओळखून घ्यावे" (१ करिंथ २:८,१२).*

पवित्र शास्त्र म्हणजे केवळ धार्मिक तत्वज्ञान किंवा प्रबंध नव्हे. प्रामुख्याने देवाने स्वतःस मनुष्यांना कसे प्रगट केले हे पवित्र शास्त्र सांगते. देवापासूनच तुम्हाला आत्मिक ज्ञान मिळू शकते. त्यामुळे तो कसा आहे व त्याची तुमच्याकडून काय अपेक्षा आहे हे समजू शकते.

**जर तुम्ही कळकळीने देव कसा आहे हे त्याला विचारले तर पवित्र वचनातून तो स्वतःला प्रगट करील.**

काही अनोळख्या आणि भिन्न प्रकारच्या लोकांना जेव्हा आम्ही आमच्या प्रवासाच्या दरम्यान भेटलो तेव्हा त्यांच्याबरोबर आत्मिक बाबींवर आमची चांगली चर्चा झाली. एकदा, आमची भेट काही आफ्रिकन तरुणांशी झाली. देवाबद्दल खूप काही ऐकण्याची त्यांची इच्छा होती.

सूर्य मावळला आणि एका खूप व्यस्त दिवसाची समाप्ती झाली. केनीयामधील एका धुळीतील बोळात मी बसलो. जवळच एक झुडूप होते आणि त्यात हालचाल झाल्याचे मला जाणवले. चंद्राची किरणे त्या झुडुपात आरपार शिरली होती. त्या प्रकाशात मला एका आफ्रिकन मुलाचे काळे डोळे दिसले. दहा वर्षांचा तो मुलगा लगेच माझ्या शेजारी खडकावर येऊन बसला. आम्ही एकमेकांचे चांगले दोस्त झालो. बाकीच्या काही मुलांना आमचे बोलणे ऐकू गेले आणि आम्ही काय बोलत आहोत हे पाहण्यासाठी ते जवळ आले. पवित्र शास्त्रासंबंधी त्यांचे ज्ञान पाहून मला खूप आश्चर्य वाटले.

माझ्या त्या लहान मित्राने मला प्रश्न विचारला ‘‘देवाने मोशेला त्याचे तोंड का बरे पाहू दिले नाही?’’

त्याच्या त्या प्रश्नाचे मला नवल वाटले. मी त्याला म्हणालो, हे बघ योएल, मोशेने देवाला प्रार्थना केली तेव्हा देव त्याला बोलला – ‘‘मी तुला पाठमोरा दिसेन पण माझे मुख तुला दिसावयाचे नाही’’ हे तुला आठवते ना? (निर्गम ३३:२३).

देवाचे गौरवी तेज किती विस्मयकारक आहे हे मोशेला माहीत नव्हते. तरीही देव स्वतःला प्रगट करीत असतो व मनुष्याला स्वतःकडे बोलावत असतो. तेव्हा मोशेला सोसवेल एवढेच तेज देवाने त्याला दिसू दिले. देवाने मोशेला स्वतःचे पूर्ण तेज दाखवले असते तर

मोशे जगूच शकला नसता. देवाने मोशेपासून त्याचे तेज राखून ठेवले तरी जेव्हा देव त्याच्या जवळून गेला तेव्हा त्याने मोशेला एका खडकात सुरक्षित ठवेले" (निर्गम ३३:२२)

विषववृत्तावर भर दुपारी सूर्य किती भयंकर तेजस्वी असतो याची जाण माझ्या त्या छोट्या मित्रांना होती. सूर्याकडे पाहणे अशक्यच असते. अंधाऱ्या रात्री किडे दिव्याभोवती जमतात हे ही त्याला माहीत होते. मी त्यांना विचारले की 'हे किडे जर दिव्याच्या अगदी जवळ गेले तर काय होईल"? सगळे जण एक सुरात म्हणाले "ते मरतील." प्रखर तेजाचा परिणाम काय होईल हे त्यांना माहीत होते.

त्याच रात्री मी त्यांना आणखी एक उदाहरण दिले. त्यामुळे त्यांना त्यांच्या प्रश्नाचे उत्तर मिळणार होते. त्या मुलांच्या नुकत्याच जन्मलेल्या भावडांना त्यांची आई बाळंत्यात गुंडाळते व स्वतःच्या छातीशी कवटाळते हे माहीत होते. त्यातून आईची माया व काळजी दिसून येते. मग मी त्यांना सांगितले की देवाने देखील 'त्यास मेघवस्त्राचे पांघरून घातले व दाट अभ्रांचे त्यास बाळंते केले' (ईयोब ३८:९).

(याला शास्त्रज्ञ 'ओझोन थर' म्हणतात. या नाजूक थरातून अतीनील किरण की जे जीवाला फार घातक असतात, गाळले जातात. सूर्याशिवाय पृथ्वीवर जीवसृष्टी राहूच शकत नाही. परंतु सूर्याच्या मारक शक्तीपासून देव आपले रक्षण करतो).

माझ्या त्या लहान मित्रांना, देव आपली भयंकर उष्णतेपासून, अशा पांघरुणाद्वारे कशी काळजी घेतो हे ऐकून मोठी गंमत वाटली, मी जे सगळे त्यांना सांगितले ते त्यांना किती कळले हे मला माहीत नाही; परंतु त्यांची छोटी अंतःकरणे मात्र देवाच्या गौरवी प्रीतीमुळे आनंदली हे खरे, नंतर आम्ही एकत्र प्रार्थना केली. देवाचा शोध घेताना देवाने

मोशेची किती काळजी घेतली होती तशी देव आपली काळजी घेत असतो हे त्यांच्या लक्षात आले व त्यांना खूप आनंद वाटला. देव कसा आहे हे मूलतः समजण्यासाठी पवित्र शास्त्र म्हणते, ''आपला देव परमेश्वर हा अनन्य परमेश्वर आहे' (अनु ६:४). देवाचे अनन्यत्व हा आपला मूलभूत विश्वास आहे.

*परंतु देव कसा आहे हे दर्शविण्यास ाठी त्याने स्वतःची अनेक नावांनी आपल्याला ओळख करून दिली आहे.*

पवित्र शास्त्रात नावांना विशेष महत्व आहे कारण त्या नावांमध ून त्या व्यक्तीची नीट ओळख पटविली जाते. देवाला असलेल्या प्रत्येक नावातून त्याचे वैशिष्ट्य दिसून येते. त्याच्या दैवी व्यक्तिमत्वाचे पैलू त्या नावांतून दिसून येतात.

जुन्या करारात देवाची तीन नावे दिली आहेत. याव्हे, एलोहीम आणि अदोनी. प्रत्येक नावाचे खास वैशिष्ट्य आहे. एलोहीम हे पहिले नांव आहे आणि त्याचा उल्लेख दोन हजार वेळा केलेला आढळतो. याव्हे हे नाव देखील एक प्रमुख नांव असले तरी एलोहीम हे नाव देखील खूप महत्वाचे आहे, ते आपण नीट ध्यानात घ्यावे अशी देवाची इच्छा आहे पण हे नाव म्हणजे काय?

आपल्या भाषेत आपण एकासंबंधी बोलतांना एकवचन व अनेकांबद्दल बोलतांना अनेकवचन वापरतो. परंतु अनेकवचन हिब्रू भाषेत विशिष्ट प्रकारे वापरण्यात येते. दोन व्यक्तीसंबंधी वेगळे सर्वनाम व दोनपेक्षा अधिक असेल तर अनेकवचन वापरण्यात येते. या दोन्ही म्हणजे 'द्वी' व 'अनेक' मधील फरक महत्वाचा आहे. एलोहीम हे नाम देवासाठी प्रथम वापरण्यात आले. एलोहीम निर्माणकर्ता देव हे त्याचे नाव एकवचनी किंवा द्वीवचनी नसून ते अनेकवचनी आहे.

*“देवाने (एलोहीमने) प्रारंभी आकाश व पृथ्वी निर्माण केली” (उत्पत्ती १:१)* म्हणजे पवित्र शास्त्रातील अगदी पहिल्याच वचनामध्यें देवाची ओळख व त्रैक्य देव किंवा देवाचे त्रैक्य अशी करून दिली आहे. या तिघांना मिळून ‘त्रैक्य’ ही उपाधी दिली आहे.

देवाचे त्रैक्य रूप समजल्यानंतर, देवाने मनुष्य कसा निर्माण केला याची नोंद आहे. *“मग देव बोलला, आपल्या प्रतिरुपाचा व आपल्याशी सदृश असा मानव आपण करू” (उत्पत्ति १:२६).** या वचनामध्ये ‘आपल्या’ हे अनेकवचनी सर्वनाम वापरले आहे. परंतु पुढच्याच वचनामध्ये आपण वाचतो की *“नर व नारी अशी त्याने निर्माण केली” (उत्पत्ति १:२७).* ‘त्याने’ म्हणजे येथे एकवचनी सर्वनाम आहे. म्हणजे एलोहीम हे देवाचे सुरुवातीला असलेले नाव हे एकवचनी आहे अनेकवचनीही आहे.

देव कसा आहे हे जगिक ज्ञानाद्वारे कोणाही मनुष्याला समजणार नाही. ते समजावे म्हणून देवानेच आपल्यावर कृपा केली. *“आपल्याला जगाचा आत्मा नव्हे तर देवापासून जो आत्मा आहे तो मिळाला यासाठी जे देवाने आपल्याला कृपेने दिले ते आपण ओळखून घ्यावे” (१ करिंथ २:१२).* देव कसा आहे हे समजण्यासाठी ह्यापासून सुरुवात करून पवित्र शास्त्र त्याच्या त्रैक्यासंबंधीचे गूढ हळूहळू उकलत जाते. देवाचे हे त्रैक्य रूप सजण्यासाठी देव तुमच्यावर किती प्रेम करतो हे ही तुम्हाला सातव्या प्रकरणात दिसून येईल.

---

* वनस्पतींप्रमाणे मानवाची निर्मिती झाली नाही हे क्षात घेणे महत्वाचे आहे. तसेच सजीव प्राण्याची उत्क्रांती होत शेवटी मानव तयार झालेला नाही. नर व नारी ही देवाने स्वतःच्या प्रतिमेत निर्माण केले आहेत. देवाची मानव निर्माण करण्याची कृती ही अलौकिक अशी आहे. तुम्ही नेमके कोण व कसे आहात याचे सुंदर स्पष्टीकरण तुम्हाला याच पुस्तकात पुढे वाचावयास मिळेल.

देवाची प्रीती किती अमर्याद आहे हे तुम्हाला समजावे यासाठी देव पवित्र शास्त्रातून ती प्रगट करतो. देव जो बाप, देव जो पुत्र व देव जो पवित्र आत्मा याची ओळख आपल्याला पवित्र शास्त्रात करून दिली आहे. तरीही तो एक आणि एकच देव आहे. मानवी मनाला हे संपूर्ण सत्य समजणे अवघड आहे. सत्य व जिवंत देव कसा आहे हे मनुष्याच्या मनाला समजावे म्हणून त्याने पुढाकार घेऊन मनुष्याला स्वतः प्रगट केले.

देवाच्या गौरवाचे व पवित्र्याचे संपूर्ण प्रगटीकरण मोशेला झाले नाही. परंतु एलोहीम, देव जो पुत्र याच्याद्वारे मनुष्याला समजेल व पेलवेल असे देवाचे प्रगटीकरण करण्यात आले.

नव्या करारात आपण वाचतो,

*“अंधारातून उजेड प्रकाशित होईल असे जो देव बोलला तो येशू ख्रिस्ताच्या मुखावरील देवाच्या गौरवाच्या ज्ञानाचा प्रकाश पाडण्यासाठी आमच्या अंतःकरणात प्रकाशला आहे” (२ करिंथ ४:६).*

विचार करा की जेव्हा योहानाने येशूच्या मुखावरील तेज पाहिले तेव्हा तो म्हणाला, *“आम्ही त्याचे गौरव पाहिले ते गौरव पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचे असावे असे होते” (योहान १:१४)*

नंतर योहानाने देवाशी प्रत्यक्ष तोंडोतोंड भेट झाल्यानंतर, एलोहीमला प्रत्यक्ष भेटल्यानंतर, येशूच्या खातर त्याने सर्व काही सांगितले आहे. त्याची अनंतकालिक देवाशी भेट झाल्याचे तो सांगतो – निर्माणकर्ता देव, मोशेचा देव त्याला भेटला.

हे आश्चर्यजनक असले तरी योहानाची निर्माणकर्त्या परमेश्वराशी भेट ही अत्यंत वास्तव ऐकू येणारी, दिसू शकणारी आणि समजू शकणारी अशी होती.

> *‘जे प्रारंभापासून होते, जे आम्ही ऐकले आहे, जे आम्ही आपल्या डोळ्यांनी पाहिले आहे जे आम्ही न्याहाळले व स्वहस्ते चाचपिले त्या जीवनाच्या शब्दाविषयी आम्ही सांगतो’ (१ योहान १:१).*

आपण योहानाच्या पत्रात जे काही वाचतो ते निश्चितपणे विसंगत किंवा संदिग्ध असे नाही. त्याने जे लिहिले ते जिवंत देवाच्या भेटीमुळे लिहिले.

“परंतु आज मला त्याचा काय उपयोग होतो?” असा तुम्हाला प्रश्न पडला असेल. योहानानेही त्याचे त्वरित उत्तर दिले आहे - *“तुमचा आमचा आनंद पूर्ण व्हावा म्हणून आम्ही हे लिहितो” (१ योहान १:४)* आणि तुम्ही हे पुस्तक वाचत आहात तेव्हा तुमच्या या मित्राला देखील, देवाची भेट झाल्यामुळे तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा असे वाटते. योहान स्पष्ट करतोः

> *“जे आम्ही पाहिले व ऐकले आहे ते तुम्हासही यासाठी कळवितो की तुम्हीही आमच्याशी सहभागी व्हावे, आपली सहभागिता तर पित्याबरोबर व त्याचा पुत्र येशू ख्रिस्त ह्याच्याबरोबर आहे. तुमचा आमचा आनंद पूर्ण व्हावा म्हणून आम्ही हे लिहितो” (१ योहान १:३, ४).*

होय, काळोख्या रात्री प्रकाश जसा सुंदर दिसतो, तसे देवाच्या गौरवाचा प्रकाश लोकांना त्याच्याकडे आकर्षित करतो. देव कसा आहे हे समजण्याची तुमची इच्छा असेल तर मोशेप्रमाणेच तुम्हीही प्रार्थना करा. “हे देवा तुझे गौरव मला प्रगट होऊ दे.”

## *विचार करा*

१. देवाचा शोध व्हावा म्हणून तुम्ही पवित्र शास्त्र विचारपूर्वक वाचले काय?

२. पवित्र शास्त्र वाचत असतांना देवाची ओळख व्हावी म्हणून तुम्ही देवाला विनंती करता काय?

यासाठी एक प्रार्थना सुचवितो - "हे देवा, तू संपूर्ण सृष्टीचा निर्माणकर्ता आहेस व तू माझ्यावर प्रीती करतोस म्हणून तू मला प्रगट हो आणि तुझा प्रिय पुत्र येशू ख्रिस्त हा मसीहा आहे हे मला दाखवून दे."

३. जर देवाची खरेपणाने उपासना करावी हे तुम्हाला समजले असेल तर तो देव - तुमच्या शोधाच्या कल्पणेहून फार थोर आहे. तुमच्या आकलन शक्तीहून तो फार थोर आहे. मानवी कल्पनेपेक्षा तो अती थोर आहे.

*मानवी स्वभावाची मला थोडीफार जाण आहे असे मला वाटते. इतिहासातील सर्व थोरपुरुष हे शेवटी मनुष्यच होते, मी ही मनुष्यच आहे.*

*पण त्यापैकी एक सुद्धा येशू ख्रिस्तासारखा मुळीच नाही. तो तर मनुष्यापेक्षा अतिश्रेष्ठ असा होता.*

नेपोलियन.

# प्रकरण ४

# लोकांचे विभाजन नेमके कशामुळे होते?

आजचे जग म्हणजे एक खेडेगाव आहे असे म्हटले जाते. परंतु या गावामध्ये अनेक फितूर शेजारी राहत असल्यामुळे हे गाव मनुष्यांना राहण्यासाठी भयानक झाले आहे.

मनुष्यांमध्ये या धरणीवर असे विभाजन होण्याची अनेक कारणे आहेत. राजकीय, आर्थिक, व्यवसायिक आणि स्थानिक, घरगुति समस्या अशी प्रमुख कारणे आहेत. अशा कारणांमुळे लोकांमध्ये विभाजनाची क्रिया जोरदारपणे होत आहे. तरीपण याहीपेक्षा एक महत्वाचे कारण आहे.

प्रथम आपण या विभाजनामागील काही सामान्य कारण पाहू आणि नंतर नेमके महत्वाचे कारण कोणते आहे याचा विचार करू या.

## सामान्यपणे होणारे विभाजन

**राजकीय कारण** : सध्या सर्व राजकारणी लोक एकमेकांवर अविश्वास दाखवतात. त्यांच्या मनात एकमेकांविषयी भय आहे. जेव्हा एकमेकांचे प्रश्न चांगल्या समझोत्याने सुटत नाहीत तेव्हा लष्करी सामर्थ्यानेच ते सुटतील व सुरक्षा लाभेल असे त्यांना वाटते.

दरम्यान, लोक आण्विकशास्त्रबंधी विरुद्ध घोषणा देतात. शांततेसाठी आग्रह धरतात. परंतु शांती प्रक्रियेचा आग्रह धरणारेच त्यांच्या आडमुठ्या मार्गामुळे युद्ध परिस्थिती निर्माण करत असतात. हे आपण दूरदर्शवर पाहातच असतो. ही किती विरोधाभास निर्माण करणारी निदर्शने आहेत हे आपण पाहतोच.

**आर्थिक कारणे** : नैसर्गिक आपत्तींचा वाढता क्रम आहे. दुष्काळ, पावसाचा अभाव, भूमिकंप, कुपोषण यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. तिसऱ्या जगात (अप्रगत राष्ट्रात) तर याचा दुष्प्रभाव वाढत्या प्रमाणात दिसून येतो. सधन राष्ट्र व गरीब राष्ट्रे यामधील आर्थिक दरी दयनीय आहे. अनेक लोक स्वार्थत्याग करून देणग्या देतात तरीही दुर्दैवाने आपण पाहातो की श्रीमंत लोक अधिक श्रीमंत होतात तर दरिद्री लोक अधिक दरिद्री होतात.

**घरगुती कारण** : आज विवाह मोडत आहेत, जीवन व कुटुंबे उध्वस्त होत आहेत हे उघड दिसत आहे. एखाद्या जीवघेण्या साथीप्रमाणे ही समस्या वेगाने फैलावत आहे. लेटसोल मला म्हणाले, ‘‘माझे घर मोडले’’ मला वाटले की त्याच्या आफ्रिकन घराच्या चार भिंती कोसळल्या असाव्यात. पंरतु त्याच्या म्हणण्याचा अर्थ असा होता की त्याच्या पत्नीने त्याला सोडून दिले होते. आज अशीच अनेक घरे ‘मोडत’ आहेत. स्वार्थीपणाच्या आगीत नातेसंबंधाची राख होत आहे (तरी पण देवाच्या प्रीतीमुळे कुटुंबांना व पती-पत्नींना कसे एक होऊन नेहमीकरिता टिकून राहता येईल याविषयी आपण पुढील प्रकरणात पाहणार आहोत).

**व्यवसायिक कारण** : वेगवेगळ्या कारखान्यात कामगारांवर

कामाचा अती ताण पडत आहे. त्यातून मनुष्ये असमाधानी बनत आहेत. १९८५ साली ब्रिटेनमध्ये कारखान्यातील वाद चिघळून शिगेस पोहचले होते. उग्र निदर्शने संपली, संपही संपले, तरीही लोकांच्या मनात बदल्याची आग होती. मालक-नोकर नाते सुडाने भरले. सगळी कारखानदारी भ्रष्ट झाली. १९०४ मध्ये कोळसा खाण कामगारांनी केलेली निदर्शने व आज होत असलेली निदर्शने यात किती फरक आहे हे जॉन पेरीने मला सांगितले.

जॉन पेरी जेव्हा प्रथम मला भेटला तेव्हा त्याचे वय ९१ वर्षांचे होते. तो एक निवृत्त कोळसा-खाण-कामगार होता. आता तो अगदी अपंगावस्थेत, आंधळा झालेला होता. त्याला फुफ्फुसाचा दुर्धर रोगही जडला होता. जेव्हा शक्य होई तेव्हा मी आणि माझी पत्नी त्याला त्याच्या झोपडीत भेटायला जात असू. १९०४-०५ मध्ये आलेल्या संजीवनानंतर देवाच्या योजनेनुसार तो कसा देवाकडे आला हे तो आम्हाला अगदी जोशपूर्ण आवेशाने सांगत असे. त्यावेळी ते खाणकामगार व त्यांचे खाणमालक यांची जिवंत देवाबरोबर भेट झाली. त्यांच्यामध्ये अतूट एकी, एकमेकांवर विश्वास व आदर निर्माण झाला होता. पाहा १९०५ व १९८५ मधील मालक नोकर संबंधात किती फरक पडला आहे!

त्या दिवसांच्या आठवणीने जॉन पुरता भारला होता. मद्याला मागणी नसल्यामुळे किती तरी गुजे बंद पडले याची त्याला आठवण झाली. कोळशाच्या खाणीत सहकाऱ्याबरोबर खाली खोलवर जाताना ते देवाचे गुणगाण गीताद्वारे कसे आनंदाने करीत होते ह्याचीही त्याला आठवण झाली. “लोक आजही येऊन मला विचारतात की ते संजीवन आता कुठे गेले?” जॉन म्हणाला. तितक्याच आवेगाने

छातीवर उजव्या हाताची मूठ आपटीत तो पुढे म्हणाला, ‘‘ते संजीवन इथे भरलेले आहे!’’

## खरे विभाजन

विभाजनाची वरील कारणे खोल रूजलेली असली तरी मनुष्याचे कायमस्वरूपी आणि भयावह असे विभाजन होण्याचे वेगळेच कारण आहे. अनेक देशाची शांती ढळविण्याचे भय सध्या जगाला सतावत आहे. देवाबद्दल अज्ञान असल्यामुळे लोक संभ्रमीत झाले आहेत.

देवाने मनुष्याला स्वतःचे प्रगटीकरण केले तेव्हा देवाने त्याच्या पावित्र्याबद्दल कधीच तडजोड केली नाही. येशूच्या जन्मापूर्वी देवाने जाहीर केले होते की तो स्वतः कसा आहे हे मनुष्यास समजावे म्हणून जो जगाचा प्रकाश धाडणार आहे. तो म्हणतो, *‘‘अंधकारात चालणाऱ्या लोकांनी मोठा प्रकाश पाहिला आहे’’ (यशया ९:२)* त्याचा प्रकाश ओळखण्यासाठी देवाने काही खुणाही देऊन ठेवल्या. *‘‘कारण आम्हासाठी बाळ जन्मला आहे, आम्हास पुत्र दिला आहे...’’ (यशया ९:६).*

देव जर फक्त म्हणाला असता की बाळ जन्मणार आहे तर त्यात फार मोठे काही नसते. कारण बालके तर नेहमीच जन्मतात. ‘बाळ जन्मणार आहे’ एवढेच म्हटले असते तर ते वाक्य कमी महत्वाचे राहिले असते. परंतु त्या वाक्याचा संबंध आम्हास पुत्र दिला आहे ह्या अभिवचनाशी असल्यामुळे ते फार फार महत्वाचे आहे. जे भाकीत अनेक वर्षांपूर्वी केले ते पूर्ण होऊन त्याचा इतिहास झाला. कारण देव जे बोलला तसेच घडले. जगात तो बालक जन्मला, स्वर्गातून पुत्र आम्हास देण्यात आला, अंधारात चाचपडणाऱ्या लोकांना पुत्राच्या द्वारे देवाने प्रकाश दिला. आजही तो तेजस्वी प्रकाश अंध

ाकाराला दूर सारत आहे. अन्यथा अविश्वासाच्या अंधकारामुळे देव आमच्या दृष्टीआड झाला असता.

देवाच्या अनन्यसाधारण पुत्राचा जन्म, त्याला इतरांपासून वेगळे राखण्यासाठी देवाने अधिकृत अशा चमत्काराची खूण दिली. *"यास्तव प्रभु स्वतः तुम्हास चिन्ह देत आहे. पाहा, कुमारी गर्भवती होऊन पुत्र प्रसवेल व त्याचे नाव 'इम्मानुएल' (आमच्या सन्निध्य देव) असे ठेवील" (यशया ७:१४).*

'इम्मानुएल' म्हणजे 'आमच्या सन्निध्य देव' हे किती आश्चर्यकारक आहे! त्याच्या नावातून जे प्रगट होते त्यावरून पवित्र शास्त्रात जे शुभवर्तमान दिले आहे ते इतर धर्मांपेक्षा किती वेगळे आहे हे आपल्याला समजते. खोटे धर्म मनुष्याने देवाप्रत कसे पोहंचावे हे सांगतात. परंतु पवित्र शास्त्र म्हणजे देवाचे वचन सांगते की खुद्द देव मनुष्याप्रत आला.

पवित्र शास्त्रात सांगितले आहे की देव पृथ्वी नामक ग्रहावर आला व एक कुमारी गर्भवती झाली. त्या दिवशी विश्वाचा निर्माणकर्ता स्थलकालाचा अंश बनला व एक इतिहास घडला : तो त्या गोष्टीच्या विचारात आहे, तो पाहा, प्रभुच्या दुताने त्याला स्वप्नात दर्शन देऊन म्हटले, *"योसेफा, दावीदाच्या पुत्रा तू मरीयेचा आपली पत्नी म्हणून स्वीकार करण्यास अनमान करू नकोस, कारण तिच्या ठायी जो गर्भ आहे तो पवित्र आत्म्यापासून आहे" (मत्तय १:२०).* नंतर येशूचा जन्म झाला व तो मोठा झाला. त्याचे देवत्व सिद्ध करण्यासाठी त्याने शास्त्री परुश्यांशी वादही केला. तो बोलला, *"मी आणि पिता एक आहोत" (योहान १०:३०).*

अपोलो-XV या यानाचा अंतराळवीर जीम आयर्विन म्हणाला,

''मनुष्याने चंद्रावर चालण्यापेक्षा देव पृथ्वीवर चालतो हे अधिक महत्वाचे आहे.'' खरेच मानवाने अंतरीक्षेत घेतलेल्या भरारींपेक्षा अनंतकालच्या देवाने काही काळ पृथ्वीवर राहणे म्हणजे मोठे आश्चर्यच आहे.

'तुम्हासाठी बाळ जन्मला व पुत्र दिला आहे' या भविष्यवाणीनंतर त्या व्यक्तीचे वर्णन दिले आहे. *'त्याच्या खांद्यावर सत्ता राहील, त्याला अद्‌भुत, मंत्री, समर्थ देव, सनातन पिता, शांतीचा अधिपती म्हणतील. त्याच्या सत्तावृद्धीला व शांतीला अंत नसणार' (यशया ९:६७).* ज्याला जगावर राज्य करावयाचे आहे त्या राजाला अशाप्रकारचे गुण असणे आवश्यकच आहे. आजच्या जगामध्ये देखील. आपण अशा राजाची अपेक्षा करीत आहोत की जो केवळ ज्ञानीच नव्हे तर सामर्थ्ययुक्तही हवा, ज्यामुळे प्रत्येक गोष्ट त्याला व्यवस्थित पार पाडता येईल. काही राजे ज्ञानी होते व कोणत्या वेळी काय करावे हे त्यांना माहीत होते. परंतु इतिहासामध्ये असा एकही राजा होऊन गेला नाही की जो जगाला पूर्ण शांती देऊ शकला.

तो शांतीचा राजाच, ज्ञानाने व सामर्थ्याने परिपूर्ण आहे व तोच जगाला खरी व पूर्ण शांती देऊ शकतो. एक दिवस येशू या पृथ्वीवर राज्य करण्यासाठी येणार आहे. तो जेव्हा येईल तेव्हा शस्त्रास्त्रे निर्माण करणारा पृथ्वीवरील प्रत्येक कारखाना बंद पडेल. अण्वास्त्रांचा पूर्ण नाश होईल. सरहद्दीवर रक्षण करणारा प्रत्येक सैनिक आपल्या घरी कायमचाच निघून जाईल.

मानव जातीवर राज्य करण्यास मनुष्य किती असमर्थ आहे हे त्यानेच वारंवार दाखवून दिले आहे. अखिल पृथ्वीवर राज्य करणारा, शांतीचा अधिपती आपला राजदंड उंचावेल आणि मगच शांती व न्याय

प्रस्थापीत होईल. *“तेव्हा ते आपल्या तरवारी मोडून त्यांचे फाळ करितील, आपल्या भाल्याच्या कोयत्या करितील, यापुढे एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर तरवार उचलणार नाही ‘ते इतःपर युद्धकला शिकणार नाहीत’ (यशया २:४).* त्या शांततामय दिवशी *‘जल समुद्राला व्यापून टाकिते तशी पृथ्वी परमेश्वराच्या प्रतापाच्या ज्ञानाने भरेल’ (हबक्कूक २:१४).* अनादि अनंत परमेश्वराला दुसऱ्या कशानेही समाधान होणार नाही.

येशू ख्रिस्ताच्या मार्गदर्शनानुसार येणाऱ्या त्या असीम शांतीच्या दिवसापूर्वी मानवामध्ये पूर्वी कधी झाले नाही एवढे विभाजन होईल. फूट पडेल. हे सर्वांना स्पष्ट दिसेल. येशू ख्रिस्त हा त्या सर्व गोंधळाचा केंद्र असेल.

**म्हणूनच येशू कोण आहे हे तुम्हाला नीट समजणे आवश्यक आहे. तो कशासाठी आला व त्याने येथे असताना तुमच्यासाठी काय केले हे तुम्हाला समजलेच पाहिजे.**

उत्पत्तिचे पुस्तक व योहानाचे शुभवर्तमान हे एकाच समान वाक्याने सुरू होते. उत्पत्तीच्या पुस्तकात आपण वाचतो. *“प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी ही निर्माण केली” (उत्पत्ति १:१).* तसेच योहानाच्या शुभवर्तमानात आपण वाचतो, *“प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता आणि शब्द देव होता” (योहान १:१).* उत्पत्तीमध्ये देवाला - एलोहीम’ म्हटले तर योहान त्याला ‘शब्द’ असे म्हणतो. एलोहीम म्हणजे शब्द. त्याने स्वतःस मनुष्य रूप धारण केले आणि तो त्याच्या निर्मितीमध्ये, मनुष्यांमध्ये राहावयास आला. शब्द देही झाला व त्याने आम्हामध्ये वस्ती केली. हे भयावह स्तंभित करणारे वाक्य त्याच्या संदर्भासह असे आहे-

*"प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता आणि शब्द देव होता. तोच प्रारंभी देवासह होता. त्याच्या द्वारे सर्व झाले आणि जे काही झाले ते त्याच्यावाचून झाले नाही. त्याच्या ठायी जीवन होते व ते जीवन मनुष्यामात्राचा प्रकाश होते.... तो जगात होता व जग त्याच्याद्वारे झाले तरी जगाने त्याला ओळखिले नाही. जे त्याचे स्वतःचे त्याकडे तो आला तरी त्याच्या स्वकीयांनी त्याचा स्वीकार केला नाही. परंतु जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांस म्हणजे त्याच्या नांवावर विश्वास ठेवणाऱ्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला....शब्द देही झाला आणि त्याने आम्हामध्ये वस्ती केली, आणि आम्ही त्याचे गौरव पाहिले. ते पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचे गौरव असावे असे अनुग्रह व सत्य ह्यांनी परिपूर्ण होते" (योहान १:१-३,१०-१२,१४).*

अनेक शतकांपूर्वी मोशेला व आजकालच्या सर्व लोकांना देवाचा शोध हवा होता तसाच तो फिलिप्पालाही हवा होता.

फिलिप्प येशूला विनंती करून -*'प्रभुजी आम्हाला पिता दाखवा' (योहान १४:८)* आणि येशूने त्याला उत्तर दिले, *"ज्याने मला पाहिले आहे त्याने पित्याला पाहिले आहे" (योहान १४:९).* येशू स्वतः जर देव नसताच तर त्याचे उत्तर किती हास्यास्पद व मूर्खासारखे ठरले असते. परंतु त्याच्यावर असा दोषारोप कोणीही करू शकत नाही. जर येशू देव नसता तर तो जगातील एक नंबरचा ठग ठरला असता. म्हणूनच आपण एक लक्षात ठेवले पाहिजे की जेव्हा आपण येशूला पाहातो तेव्हा देवालाच पाहातो.

येशू कोण आहे हे जाहीर झाल्या क्षणी लोकांमध्ये फाटाफूट व्हावयास सुरुवात होते. जेव्हा येशू म्हणाला की *'मी व पिता एक आहो' (योहान १०:३०)* हे ऐकून येशूमध्ये देवाचा शोध लागला अशी अनेकांची खात्री पटली यात नवल नाही. परंतु देव स्वतःला इतका नम्र करू शकतो यावर विश्वास न ठेवल्यामुळे अनेक जण भरकटले. काहीजण येशूकडे आकर्षिले गेले तर काही जन दूर गेले. काही त्याच्यामागे गेले तर काहींनी त्याला मारण्याचा कट रचला.

येशू जिवंत असताना देखील लोकांमध्ये फूट पडली होती. तो म्हणतो, *"जो मला अनुकूल नाही, तो मला प्रतिकूल आहे" (मत्तय १२:३०).*

**तरी प्राथमिक प्रतिक्रिया ही काही कायस्वरुपाची नसते.**

जो माणूस पूर्वी येशूचा शत्रू होता तोच पुढे त्याचा शिष्य बनला. त्या माणसाचा आपण विचार करू या. सुरुवातीला शौल एक यहूदी धर्मगुरू होता. तो येशूच्या अनुयायांचा अतिशय द्वेष करीत होता. त्यांना जिवे मारण्याची परवानगी त्याला मिळाली होती परंतु शौलाचे परिवर्तन झाल्यानंतर त्याने येशूला स्वतःचा प्रभु व स्वामी असे मानले व आयुष्यभर त्याने येशूलाच स्वीकारले. येशू ख्रिस्ताशी अगदी एकनिष्ठ राहून त्याने जिवावर बेतणारी अनेक संकटे आनंदाने सहन केली. हा फरक कसा घडला?

शौल दिमीष्काच्या रस्त्यावरून चालला होता. तेव्हा त्याला एक 'तेजस्वी प्रकाश' दिसला. त्या तेजाने तो काही काळ अंधळा झाला. शौलाच्या मनाची खात्री झाली की तो सर्वसमर्थ देवाच्या सानिध्यात आहे.

'याव्हे' हा ग्रीक शब्द वापरून तो म्हणाला, 'प्रभो, तू कोण आहेस?' त्याने म्हटले, *''ज्या येशूचा तू छळ करितोस तोच मी आहे'' (प्रे.कृ. ९:५).* तेव्हाच शौलाला समजले की येशू म्हणजे देव आहे.

या प्रगटीकरणामुळे येशूचा शत्रू शाऊल ह्याचा पालट झाला व तो प्रेषित पौल झाला. त्या दिवसापासून त्याने आपले संपूर्ण जीवन येशू ख्रिस्ताला समर्पित केले. त्या विश्वासापायी त्याला अनेक संकटे सहन करावी लागली तरी त्याने देव येशूच्या रुपात या पृथ्वीवर आला ही सुवार्ता सर्वत्र गाजविली. पौलाच्या जीवनात असलेली ख्रिस्ताची जाज्वल्य समक्षता त्याला जगाच्या इतिहासात, संतश्रेष्ठ बनवून गेली. त्याने लिहिलेल्या पत्रांमधून त्याने, जग व त्यातील सर्व काही ख्रिस्ताचे आहे हा संदेश खात्रीपूर्वक दिला आहे (कलस्सै. १:१६).

पवित्र शास्त्र स्पष्ट करते की नासोरी येशू हा देव जो पुत्र आहे. 'यहोवा विटनेस' किंवा 'मॉर्मन्स' म्हणतात की तो केवळ 'देवाचा पुत्र' आहे. हे त्यांचे मत चुकीचे आहे. इस्लाम म्हणतात की तो केवळ देवाचा प्रेषित आहे. हे मत देखील पूर्णतः चुकीचे आहे. अशा लोकांची खोटी शिकवण स्वीकारून अनेकजण देवाने स्वतःला जगासाठी दिले हे सत्य नाकारतात. याला इंग्रजीमध्ये 'सिन्क्रेटिझम' म्हणतात. त्याचा अर्थ 'विभिन्न विश्वासांना एकत्रित करण्याचा प्रयत्न'

हिंदू लोक, त्यांच्या इतर देव-देवतांसोबत त्यांच्या देवघरात किंवा संग्रहात येशूला ठेवतात. आपल्याला माहीत आहे की एलीयाच्या देवाने म्हणजे खऱ्या व जिवंत देवाने बालाच्या अनेक मूर्ती नष्टप्राय केल्या. तसेच प्रभु येशू ख्रिस्तापुढे मानव निर्मीत देव व मूर्ति सपशेल नष्ट होतील कारण येशू हा देव जो पुत्र असा आहे. अनादि-अनंत पिता व पवित्र आत्मा यासह तो आहे.

येशू हा देव आहे हे समजल्यावर तो कुमारीच्या उदरी जन्मला, त्याने अनेक चमत्कार केले, तो मरण पावला व पुनरुत्थीत झाला, त्याचे स्वर्गारोहण झाले आणि तो गौरवाने पृथ्वीवर पुन्हा येणार यावर आपण सहज विश्वास ठेवू शकतो. कारण येशू हा देव आहे. अखिल विश्व त्यानेच निर्माण केले आहे. विश्वाचे सगळे नियम त्यानेच तयार केलेत. मानवावरील प्रीतीस्तव मुक्तीसाठी त्या नियमांचा तो उपयोग करतो.

नासोरी येशूच्या नावाभोवती जग विभागले आहे. जे विभागलेले गट आहेत 'त्यांच्यामध्ये' काय असावे वा काय नसावे' किंवा ते राजकारणात बलवान आहेत की दुर्बल आहेत किंवा त्यांच्या देशातील मतप्रणाली कशी आहे ह्याचा विशेष संबंध नाही. देव जेव्हा या पृथ्वीवर मनुष्य रुपात आला तेव्हाच जे विभाजन व जी फूट मानवांमध्ये पडली ती अतिशय मूलभूत कारण मानवाच्या विभाजनासाठी ठरली आहे.

यासंबंधी येशू ख्रिस्त स्वतःच म्हणतो :

*"देव जर तुमचा पिता असता तर तुम्ही माझ्यावर प्रीती केली असती, कारण मी देवापासून निघालो व आलो आहे. मी आपण होऊन आलो नाही तर त्यानेच मला पाठविले. तुम्ही माझे बोलणे का समजून घेत नाही? याचे कारण असे की तुमच्याने माझे वचन ऐकवत नाही. तुम्ही आपला बाप सैतान यापासून झाला आहा आणि तुमच्या बापाच्या वासनांप्रमाणे करावयास इच्छिता. तो प्रारंभापासून मनुष्य घातक होता आणि तो सत्यात टिकला नाही कारण त्याच्यामध्ये सत्य नाही. तो खोटे बोलतो तेव्हा तो स्वतःचे बोलतो कारण तो लबाड व लबाडीचा बाप आहे" (योहान ८:४२-४४).*

जसा विश्वासणाऱ्यांचा पिता देव आहे तसा अविश्वासणाऱ्यांचा बाप सैतान आहे हे वाचून तुम्हाला काही आश्चर्य वाटले का? पाहा, प्रत्येकजण हा देवाचे लेकरू नाही. देवाच्या कुटुंबाचा घटक असणे किंवा सैतानाच्या कुटुंबाचा घटक असणे यापैकी एकाची निवड करणे तुम्हाला आणि मला क्रमप्राप्त आहे.

देवावर तुमचा कितीही 'खरा' विश्वास असला तरी तुम्ही कदाचित खरेच चुकत असाल. मनुष्याचा विश्वास कशावर आहे हे महत्वाचे नाही असे म्हणणे लबाडीचे आहे. विष हे औषध समजून कितीही भक्तिभावाने प्राशन केले तर परिणाम मृत्युच आहे!

खरे तर मानवाची दोन कुटुंबात विभागणी झाली आहे. प्रत्येक व्यक्ती ही त्या दोन कुटुंबांपैकी एकाचा घटक असतोच. ती दोन कुटुंबे म्हणजे एक देवाचे कुटुंब व दुसरे सैतानाचे कुटुंब. तुम्ही कोणत्या कुटुंबाचे घटक आहात हे जाणणे फार महत्वाचे आहे. देवाच्या कुटुंबाचे घटक होण्यासाठी तुम्हाला सर्वप्रथम देव कोण आहे हे समजणे अगत्याचे आहे आणि देवाने त्याचा पुत्र आम्हास देऊन आमच्यासाठी काय केले हे प्रत्येकाने ओळखलेच पाहिजे.

'येशू' या नावाचा अर्थ म्हणजे याव्हे म्हणजेच 'तारणारा'. म्हणूनच देवदूत योसेफाला म्हणाला - *"...तू त्याचे नाव येशू ठेव कारण तोच आपल्या लोकांस त्यांच्या पापांपासून तारील" (मत्तय १:२१).*

## *विचार करा*

१. देवावर विश्वास ठेवणे म्हणजे काय याचा तुम्ही गंभीरपणे विचार करता का?

२. लोकांमध्ये विभाजन होण्याचे नेमके कारण कोणते? ते राजकीय, कौटूंबिक, आर्थिक किंवा व्यवसायिक आहे का? किंवा ते आत्मिक व चिरकाल असे आहे का?

३. प्रभु येशूने सांगितलेल्या त्या दोन कुटूंबांपैकी कोणत्या कुटुंबाचे तुम्ही घटक असावे असे तुम्हास वाटते?

*नैतिक अधःपतनाची जाणीव असणे ही इतर कोणत्याही गोष्टींहून देवाच्या तारणदायी कृपेची खात्री असते.*

*डॉ. अर्नोल्ड (हेडमास्तर, रग्बी स्कूल)*

## प्रकरण ५

# खरी समस्या कोणती आहे?

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला लोक या जगाच्या भविष्यासंबंध ी अगदी आशावादी होते. त्यांना वाटले की आता शांतीचे सुवर्णयुगच अवतरणार आहे. अनेकांना असे वाटले की प्रत्येक राष्ट्राची भरभराट होईल. जी राष्ट्रे आतापर्यंत निराशा, दारिद्र्य, रोगराई आणि भयानक यातनामधून गुजरली त्यांना चांगले दिवस येतील. परंतु १९१४ मध ये युरोप खंडात रणदुंदुभी वाजली.

आता २१ वे शतक सुरू झाले. अनेक शास्त्रीय शोध लागले. लोकांना अप्रतिम सुविधा मिळत आहेत. तरीही लोक उज्वल भवितव्याबद्दल साशंक आहेत. लाखो-करोडो लोकांच्या मनात अणुशस्त्राच्या अत्यंत विध वसंक ताकदीची भीति आहे. आंतर-राष्ट्रीय आतंकवाद आणि प्रत्येक राष्ट्राच्या अंतर्गत समस्या यामुळे विचार करणाऱ्या प्रत्येक मनुष्याला असे वाटते की मानवी इतिहासातील अत्यंत भयावह अशा अवस्थेत आपण सापडलो आहोत. आजच्या जगात लोक कसे वेगळे पडत आहेत हे आपण आधी बघितले आहे. मानवी संस्कृतीवर सतत आघात होत आहेत. कशामुळे असे होत आहे?

या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी जगातील सर्व नामवंत पुढारी भेटतात व बोलणी करतात. अनेक मुद्यांवर ते चर्चा करतात. एकमेकांचे विचार ऐकून काही ठराव केले जातात. त्यामुळे जग

आणखीनच अवघड समस्येत गुरफटून जाते. आपण किती पैसा व ताकद लावली आहे हाच विचार करण्याऐवजी आपण काय केल्यामुळे जगाची दिशा योग्यप्रकारे बदलू शकेल याचा कोणी विचार करीत नाही. राजकीय पुढारी आणि धुरंधर प्रणेते, तल्लख बुद्धिचे शास्त्रज्ञ व हुशार लोक, चतुर व्यापारी आणि जगतिक बँका, आदरणीय डॉक्टर्स आणि समाजशास्त्रज्ञ हे सर्वच उत्तम मते प्रगट करतात. तरीही या प्रश्नाचे उत्तर सापडत नाही.

ह्या सर्व नामवंत लोकांमधून, केव्हातरी अगदी क्वचितच दृष्टीने मनुष्याची खरी समस्या काय आहे याचा उल्लेख केला जातो. आपली खरी समस्या नेमकी काय आहे हे केवळ देवच आपल्याला दाखवून देत असतो. आणि याचवेळी देवाचा खरेपणाने शोध करणारे लोक व केवळ धार्मिकतेसंबंधी वरवर उत्सुकता दाखविणारे लोक यातील भेद आपल्या लक्षात येतो.

देव बोलला, *''आपल्या प्रतिरुपाचा व आपल्याशी सदृश असा मानव आपण करू'' (उत्पत्ति १:२६)*. कदाचित तुम्हाला प्रश्न पडेल – ''देवासदृश असा मनुष्य कसा निर्माण झाला असेल?'' अर्थातच तो शारीरिकदृष्ट्या सदृश नाही. कारण येशू म्हणाला *''देव आत्मा आहे'' (योहान ४:२४)*. आपल्याप्रमाणे देवाला हातपाय, डोळे नाहीत. *देव 'अगम्य प्रकाशात राहतो, ज्याला कोणा मनुष्याने पाहिले नाही आणि कोणाच्याने पाहवत नाही (१ तीमथ्य ६:१६)*. अदृश्य असा मानव कध ीच अस्तित्वात नव्हता. म्हणून देहात राहणाऱ्या मनुष्यामध्ये देहापेक्षा काहीतरी वेगळे श्रेष्ठ आहे. जेव्हा देह नाश पावतो तेव्हा तेच सत्य व्यक्तित्व सदा जिवंत राहते आणि ते व्यक्तित्व देवसदृश असे आहे.

पवित्र शास्त्र दर्शविते की देवाला मन, भावना आणि इच्छा ही आहेत. या तीन विभागात मनुष्य देवसदृश असा निर्माण करण्यात आला. अर्थात देव हा देव आहे त्यामुळे त्याच्या भावना, बुद्धिमत्ता ही

अमर्याद अशी आहेत. त्याला कसली सीमा नाही. देवाचे ते स्वभाव वैशिष्ट्य आहे. याउलट मानवाला अनेक मर्यादा आहेत. अत्यंत बुद्धिमान शास्त्रज्ञ आईनस्टाईन याची बुद्धिसुद्धा मर्यादितच होती. कोणीही मनुष्य सर्वज्ञ नाही, कोणीही अमर्याद प्रीती करू शकत नाही. तसेच मानवाची इच्छा सार्वभौम नसते. मनुष्य त्याच्या भविष्याचा स्वामी नाही. त्याच्या दैवाचा तो कप्तान नाही.

मनुष्याला आत्मिक कुवत मात्र दिलेली आहे. त्या कुवतीच्या जोरावर तो देवाशी सहभागिता साधू शकतो. म्हणून पवित्र शास्त्र सांगते की मनुष्य हा आत्मा जीवशरीर यांचा मिळून झाला आहे (१ थेस्सल ५:२३).

आत्म्याच्याद्वारे मनुष्य देवाच्या सानिध्यात राहू शकतो. शरीराद्वारे मनुष्य जड जगाशी संपर्कात राहू शकतो (जीवाद्वारे तो विचार, निवड व प्रीती करू शकतो).

जर पवित्र शास्त्रात आपण बारकाईने पाहिले तर आत्मा हा अग्रभागी आहे, जीव दुसऱ्या क्रमांकावर तर शरीर तिसऱ्या क्रमांकावर. किती बरोबर आहे सारे!

पण काही तरी कुठे तरी बिघडले आहे परिणामी मनुष्याने हा क्रम बदलूनच टाकला आहे. शरीर अग्रक्रमांकावर झाले, जीव दुसऱ्या क्रमांकावर आणि आत्मा आहे तिसऱ्या क्रमांकावर! दुर्दैवाने मनुष्य शारीरिक, जगिक आणि वासनिक गोष्टींमुळे आजच्या जगात दडपून जात आहे. त्याचे निर्णय, जिव्हाळा आणि विचारक्षमता आज दडपली गेली आहेत आणि आत्मिकदृष्ट्या मनुष्य क्षीण व मृत झाला आहे. म्हणून ज्या देवाने त्याच्या सदृश असा मनुष्य निर्माण केला, ती देवाची प्रतिमा जतन करण्याऐवजी मनुष्य देवाला दुय्यम स्थान देत आहे, त्याला झुगारून देत आहे आणि आता तर अशा दिशाभूल झालेल्या लोकांचा देवाशी काहीच संबंध राहिला नाही.

ज्या लोकांचा देवाशी संबंध नाही ते आत्मिकदृष्ट्या मृत झाले आहेत. उलट ज्यांचा देवाशी जिव्हाळ्याचा संबंध आहे तेच खऱ्या अर्थाने जिवंत आहेत.

*“तरी देव दयासंपन्न आहे म्हणून आपण आपल्या अपराधांमुळे मृत झालेले असतांही त्याने आपल्यावरील स्वतःच्या अपरंपार प्रेमामुळे ख्रिस्ताबरोबर आपणाला जिवंत केले” (इफिस २:४,५).*

मनुष्याच्या महत्वाकांक्षेमुळेच या जगामध्ये अनेक समस्या निर्माण झाल्या, देवाने मनुष्याला बाहुले किंवा कठपुतली म्हणून निर्माण केले नाही. दुसऱ्याच्या मर्जीप्रमाणे मनुष्याने वागावे असे देवाला वाटले नाही. दोऱ्या ओढल्या की त्या कठपुतलीची किंवा बाहुलीची हालचाल त्या कलाकाराच्या मर्जीप्रमाणे होत असते. परंतु देवाने आपल्याला विचार स्वातंत्र्य दिले आहे. निवड करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. या स्वातंत्र्याबरोबरच आपल्यावर नैतिक जबाबदारीही आहे. आपण घेतलेले निर्णय नैतिक पातळीवर योग्य हवेत. (अनेक मानसशास्त्रज्ञ हे बंधन मानत नसतात व पवित्र शास्त्रातील सत्य ते झुगारतात.)

मनुष्याला निर्माण केल्यानंतर पहिली शोकांतिका घडली. एदेन बागेमध्ये दोन विशिष्ट प्रकारची झाडे होती. एक होते जीवनाचे झाड व दुसरे होते बरे व वाईट यांचे ज्ञान करून देणारे झाड (उत्पत्ती २:९). देवाने आदाम व हवेला आज्ञा दिली होती की त्यांनी त्या बरे व वाईट यांचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाऊ नये. इतर झाडावरील फळे खाण्याची मुभा देवाने त्यांना दिली होती. देवाने त्यांना हे निवड करण्याचे स्वातंत्र्य दिले होते. देवाने मनुष्यला - नर व नारी यांना हे विचार स्वातंत्र्य दिले - आज्ञापालनाचे वा आज्ञाभंगाचे स्वातंत्र्य देवाने दिलेली आज्ञा पाळावयाची किंवा नाही हे सर्वस्वी त्यांच्या इच्छेवरच अवलंबून होते. हा त्यांचा स्वतःचा असा वैयक्तिक निर्णय होता.

परंतु आदाम आणि हवेने देवाविरुद्ध बंड केले व मनुष्य जातीने देवाने जे सर्वोत्तम करावयाचे ठरविले होते ते सर्व गमावले. त्यांच्या आज्ञाभंगामुळे देवाला व एकूणच मानवजातीला दुःख होणार हे देवाला अगोदरच ठाऊक होते. परंतु देवाचे आपल्या निर्मितीवर म्हणजे मानवांवर अपरंपार प्रेम असल्यामुळे त्यांना भावी वैभव प्राप्त व्हावे व योग्य निवडीची संधी मिळावी यासाठीच देवाची योजना होती.

आदाम आणि हवेने चुकीची निवड करावी यासाठी त्या लबाड सैतानाने त्यांना सतत भुलविले. बंदी केलेले फळ त्या दोघांनी खावे म्हणून सैतानाने त्या फळांचे सुंदर वर्णन केले व त्यांना सांगितले की ते फळ खाल्ल्यानंतर ते देवासमान होतील (आजही सैतान म्हणतो की मनुष्य हाच स्वतः देव होऊ शकतो. परंतु देव हा देव आहे व तो कधीही देवापेक्षा यत्किंचीतही कमी होत नाही आणि मनुष्य हा मनुष्यच आहे व तो कधीही मनुष्यापेक्षा यत्किंचीतही मोठा होत नाही). तरीही सैतानाने आदाम व हवा यांना भुलविले व देवाच्या इच्छेविरुद्ध वागण्यास भाग पाडले. परिणामी सर्व मानवजात सर्वसमर्थ देव जो निर्माणकर्ता त्याच्या प्रेमळ व वैयक्तिक सहभागीतेपासून दूर झाली. कारण सर्व मनुष्ये आदामाचीच संतत्ती आहे. *“एका माणसाच्याद्वारे पाप जगात शिरले आणि पापाच्याद्वारे मरण शिरले आणि सर्वांनी पाप केल्यामुळें सर्व माणसांमध्ये अशाप्रकारे मरण पसरले” (रोम ५:१२).*

मनुष्याने निर्मितीनंतर लगेचच चुकीची निवड करून आज्ञाभंग केला, त्यामुळेच आज प्रत्येक स्मशानभूमि, इस्पितळ, सैन्य आणि बंदिशाळा जगात निर्माण झाल्या आहेत. हे सैतानी कृत्ये, ज्याला आपण पाप म्हणतो ते सर्व मानवांमध्ये उपजतच आले. या पापामुळे मनुष्य देवापासूनच विभक्त झाला असे नाही तर इतर माणसांपासून देखील दुरावला.

**परंतु तुम्ही आणि मी केवळ जन्मताच पापी नाही तर आपल्या कृत्यांद्वारे देखील पापी आहोत.**

तुम्ही आणि मी जन्माचेच पापी आहोत यासंबंधी स्तोत्रकर्त्याने म्हटले आहे, *“पाहा, मी जन्माचाच पापी आहे, माझ्या आईने गर्भध ाारण केले तेव्हाचाच मी पातकी आहे” (स्तोत्र ५१:५)* परंतु आपले पाप केवळ अनुवंशिक आहे असे नाही तर आम्ही करीत असलेली दुष्कृत्ये ही देखील आमच्यासाठी पापच आहेत. पवित्र शास्त्र म्हणते *“आज्ञा मोडणाऱ्या लोकांत... आम्हीही सर्व पूर्वी आपल्या दैहिक वासनांना अनुरूप असे मागे वागलो. आपल्या देहाच्या व मनाच्या इच्छेप्रमाणे करीत होतो व स्वभावतः इतरांप्रमाणे क्रोधाची प्रजा होतो” (इफिस २:२,३).*

होय, आमच्या आज्ञाभंगामुळे आम्ही देवासमोर दोषी ठरतो. त्याबद्दल इतर कोणालाही दोष देता येणार नाही. - पत्नी, मित्र आईबाप त्याबद्दल दोषी ठरत नाहीत. आम्ही ज्या परिस्थितीतून जात आहोत किंवा आमच्या आजुबाजूने वातारवरणही दोषपात्र ठरत नाही. तुम्ही तुमच्या पातकांसाठी जबाबदार आहात. मीही माझ्याच पातकांसाठी जबाबदार आहे.

लोकांमध्ये पसरलेले विभाजन आणि फितुरी याचे एकमेव कारण म्हणजे पाप. देव न मानणारा एक नास्तिक आणि विश्वासणारा यामध्ये पाप आहे. अरबी ते यहूदी या सर्वांमध्ये पाप आहे. तिसरे जग आणि कारखानदारीने गजबजलेले जग यामध्ये पाप आहे. भांडवलदार आणि हुकुमशाही लोकांमध्ये पाप आहे. पोलिस ते गुन्हेगार यांमध्ये पाप आहे. पालक असो की वेश्या असो; श्रीमंतीच्या थाटात राहणारा असो किंवा दारिद्र्यात लोळणारा असो, सुशिक्षित असो किंवा अशिक्षित असो... *‘सर्वांनी पाप केले आहे आणि ते देवाच्या गौरवास अंतरले आहे’ (रोम ३:२३).* आज पापामुळेच सर्व मनुष्यांमध्ये ताण-तणाव निर्माण होत आहेत.

परंतु पातक्यांची आशा म्हणजे येशू ख्रिस्त! तो म्हणतो *“कारण नीतिमानांना नव्हे तर पापी जनांना बोलविण्यासाठी मी आलो आहे” (मत्तय ९:१३).* कमी जास्त प्रमाणात आम्ही प्रत्येकानेच देवाचे पावित्र्य गमावले आहे. ‘पाप’ म्हणजे ‘पावित्र्य गमविणे’ आम्ही स्वतः होऊनच त्यामध्ये काही दुरुस्ती करू शकत नाही. चांगले राहून किंवा काही तरी चांगले करून आपण शांती प्रस्थापित करू शकू ही फोल आशा आहे. *‘आढचता बाळगू नये म्हणून कर्मे केल्याने हे झाले नाही’ (इफिस २:९).* म्हणूनच तारणासंबंधी बोलतांना येशूने म्हटले, *‘मला दया पाहिजे, यज्ञ नको’ (मत्तय ९:१३).*

आपल्या वैयक्तिक पापांच्या कचाट्यातून आपली सुटका व्हावी यासाठी प्रत्येकाला परमेश्वराच्या कृपेची जाणीव झाली पाहिजे.

देव दयाधन आहे (इफिस २:४) म्हणूनच तो म्हणतो की आपल्यासाठी त्याने तारणाची देणगी मोफत दिली आहे. *“तुमचे तारण कृपेनेच विश्वासाच्या द्वारे झाले आहे आणि हे तुमच्या हातून झाले नाही तर हे देवाचे दान आहे” (इफिस २:८).* देवाच्या पवित्र सानिध्यात आपण यावे म्हणून येशूनेच तारणाचे दार आपल्यासाठी सताड उघडले त्यासाठी त्याला पूर्ण किंमत मोजावी लागली.

प्रभु येशू ख्रिस्ताद्वारे कृपाळू देवाने आपल्याला विपुल जीवन मिळवून दिले आहे. परंतु देवाने तुम्हाला इच्छास्वातंत्र्य दिले आहे. देव तुम्हाला तुमच्या इच्छेपासून बळजबरीने दूर करू इच्छित नाही. देवाच्या इच्छेला तुम्ही किती महत्व देता हेच महत्वाचे आहे. देव म्हणतो, *‘पाहा आत्ताच समय अनुकूल आहे, पाहा, आत्ताच तारणाचा दिवस आहे’ (२ करिंथ ६:२).* आताच ! पुढे केंव्हातरी नव्हे ! येशू काय म्हणतो ते ध्यानात ठेवा - *“कारण नीतिमानांना नव्हे तर पापी जनांना बोलविण्यासाठी मी आलो आहे” (मत्तय ९:१३).*

तुमच्या समस्येचा गंभीरपणे विचार करतांना तुमच्या पातकांसंबंधी विचार करणे फार गरजेचे आहे. आजच तुमचा स्वीकार करण्यासाठी येशूने आपले बाहू पसरले आहेत. आज तुम्ही कोणत्याही स्थितीत असला तरी येशू तुमच्यासाठी उत्सुक आहे. त्याला तुमच्याकडून ऐकावयास हवे आहे की *“हे देवा मज पाप्यावर दया कर’ (लूक १८:१३).*

## सी मॅक्स येथील तुरुंगातून आलेले पत्र

(दक्षिण आफ्रिकेमधील अति सुरक्षित तुरुंगातील बंदिवानाकडून हे पत्र आले आहे)

*‘तुमचा देवाचा शोध’ हे पुस्तक मला वाचावयास मिळाले. देवाचे वचन समजण्यासाठी मला त्याचा फार उपयोग झाला. खरे जीवन कसे असावे याचा मार्ग या पुस्तकात मला सापडला, माझे म्हणणे काय हे तुम्हाला समजले असेल असे मला वाटते. माझ्या मित्राने ते पुस्तक मला वाचायला दिले. देव हाच अखिल जगाचा निर्माणकर्ता आहे असा माझा विश्वास आहे. मी आता या तुरुंगात आहे आणि देव माझे सर्वतोपरी सहाय्य करील असा माझा विश्वास आहे.”*

– ट्रान्स वर्ल्ड रेडियो तर्फे प्रसृत

## विचार करा

१. समाजामध्ये आज भयानक विकृती निर्माण झाली आहे हे तुम्हाला दिसते काय?

२. तुम्ही आजारी पडल्यानंतर तुमचे डॉक्टर तुमच्या प्रकृतीची कसून तपासणी करून मगच तुम्हाला औषधे देतात काय?

३. तुमच्या कोणत्याही समस्येचे परिक्षण पवित्र शास्त्र कसे करते व त्यावर त्यातून कोणते उपचार सुचविले आहे?

*त्या नगरात जादूगिरी करून शोमरोनी लोकांना थक्क करणारा असा शिमोन नावाचा एक माणूस होता आणि आपण कोणीतरी मोठे आहो असे तो दाखवीत असे. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वजन त्याचे लक्षपूर्वक ऐकत व म्हणत की जिला देवाची महाशक्ती म्हणतात ती हा आहे.*

*डॉ. लूक*

# प्रकरण ६

# लोकांची एवढी दिशाभूल का होते?

मी लहान मुलगा होतो तेव्हा ब्रिटीश आइलेस भागात मी राहात होतो आणि शत्रूंची विमाने त्यावर सतत घिरट्या घालीत होती. तो युद्धाचा काळ होता आणि ही संहारकशस्त्रे असलेली विमाने आमच्या विभागातून त्यांचे लक्ष्य असलेल्या मिडलँड्स व उत्तर इंग्लंडकडे जात होती. आमची विमाने व शत्रूंची विमान कोणती हे मी व माझे मित्र त्या विमानाच्या आवाजावरून ओळखत असू. जेव्हा शत्रूच्या विमानावर प्रकाशझोत पडे त्यावेळी आम्हाला खूप मजा वाटे व आता क्षणात त्या विमानावर हल्ला चढविण्यात येईल व ते गरगर करीत खाली कोसळेल असे आम्हाला वाटे.

जेव्हा शत्रुपक्षाचे विमान असे कोसळायला लागे तेव्हा विमानामध ील लोक हवाईछत्रीच्या आधाराने जीव वाचविण्यासाठी खाली उड्या मारीत. अशा लोकांना पुढे लपण्यासाठी किंवा पळून जाता येऊ नये म्हणून चौकातील व रस्त्यावरील सर्व खूणा काढून टाकण्यात येत होत्या. रस्त्यात एकही खूण आढळत नव्हती.

तरी आम्हा लहान मुलांना ठाऊक होते की वूटन वूड्स येथील एका चौकामध्ये एक लहानशी, डोळ्यांना सहज न दिसणारी अशी

खूण होती. आम्ही त्या खूणेची दिशा बदलून शत्रूंची दिशाभूल करीत असू. त्यामुळे आम्ही आमच्या सैनिकांची युद्धात मदत करीत आहोत असेच आम्हाला वाटे. नकोशा वाटणाऱ्या अशा पाहूण्यांचा असा गोंधळ उडविण्यात आम्हाला आनंद वाटे.

परंतु त्या लोकांजवळ जर त्या विभागाचा तपशील दर्शविणारा नकाशा असेल तर अशा खुणा बुजवूनही त्यांची कसलीही दिशा भूल होत नसे. खुणांची दिशा बदलण्याच्या आमच्या बालीश कल्पनाही त्या लोकांचा घोटाळा करण्यास कमी पडत. जर नकाशाचे नीट आकलन त्यांना करता आले नाही तर मात्र त्यांचा घोटाळा होत असे.

पवित्र शास्त्रात आपल्याला ज्या मार्गदर्शक खुणा दिलेल्या आहेत त्यात दिशाभूल करणाऱ्या लोकांसंबंधी देव बोलतो.

प्रथम या अफाट विश्वाकडे दृष्टी लावल्यास, त्याच्या उत्पन्नकर्त्याला विसरणे म्हणजे स्वतःची मोठी दिशाभूल करून घेणे होय.

> *"स्वतःला शहाणे म्हणता म्हणता ते मूर्ख बनले..... आणखी ज्याअर्थी ते देवाची जाणीव ठेवण्यास ते मान्य झाले नाहीत त्याअर्थी देवाने त्यांना अनुचित कर्मे करण्यास विपरीत मनाच्या स्वाधीन केले"* (रोम १:२२,२८)

अशी भ्रष्ट मने मग निर्माणकर्त्या देवाऐवजी निर्मितीचीच भक्ती करीत राहतात. पण जो स्वच्छ मनाचा आहे तो निर्माणकर्त्याचीच भक्ती करील. म्हणून देवाने विश्व निर्माण केले हे तुम्ही नाकाराल तर देव तुम्हाला विपरीत मनाच्या स्वाधीन करेल व हे विश्व कसे निर्माण झाले याविषयी तुम्ही मूर्खपणाच्या कल्पना लढवाल. विपरीत मन म्हणजे संभ्रमीत किंवा भ्रष्ट मन!

जे लोक देवाचे वचन तुच्छ मानतात ते मार्गभ्रष्ट होतात असे देवाचे वचन सांगते. त्यांचा शेवट म्हणजे नाश. देवाच्या वचनावर जो

प्रीती करीत नाही व ते पाळत नाही तो खरोखर दुर्धर प्रसंगात सापडतो.

> *"ज्यांचा नाश होत चालला आहे त्यांनी आपले तारण साध ावे म्हणून सत्याची आवड धरावयाची ती धरिली नाही. ....त्यांनी असत्यावर विश्वास ठेवावा म्हणून देव त्यांच्या ठायी भ्रांतीचे कार्य चालेल असे करितो" (२ थेस्सलनी २:१०,११).*

एकदा मनुष्याने सत्य नाकारले की तो असत्याचा आधार घेतो.

एकदा लंडनमध्ये दाट धुक्यातून मी माझ्या घराकडे निघालो होतो. परंतु त्या दाट धुक्यात मला रस्ता सापडेना. मला मदतीची गरज होती. माझ्या हातात विजेरी होती. पण तिचा प्रकाश दाट ध ुक्यामुळे हातभर अंतरावरसुद्धा पोहचेना. मनाचा अतीव संभ्रम हा दाट धुक्याप्रमामाणेच असतो. या पृथ्वीवर ते अखेरपर्यंत चालणार आहे. कारण लोक देवाचे सत्य वचन नाकारीत आहेत. येशूच्या शिष्यांनी त्याला एकदा विचारले होते - "तुझ्या येण्याचे व युगाच्या समाप्तीचे चिन्ह काय?" येशूने त्यांना उत्तर दिले,

> *'कारण खोटे ख्रिस्त व खोटे संदेष्टे उठतील व साधेल तर निवडलेल्यांस देखील फसवावे म्हणून मोठी व चिन्हे अद्‌भुते दाखवितील" (मत्तय २४:२४).*

कदाचित तुम्ही म्हणतही असाल, "मी तर फसवला गेलो नाही. "खोटा ख्रिस्त कोण हे तुम्ही ओळखता याचे तुम्हाला भूषण वाटत असेल. खोटा संदेष्टाही तुम्ही ओळखू शकता याचे तुम्हाला भूषण वाटत असेल. पण क्षणभर थांबा व तुम्हाला काय वाटते याचा विचार करा. तुम्हाला देवाच्या वचनातील सत्य रूजले नाही म्हणून देवाने सैतानाला तुमच्या मनाची फसवणूक करू दिली, याची तुम्हाला थोडीदेखील जाणीव झालेली नाही. कोणत्या तरी खोट्या संदेष्ट्याने

तुम्हाला फसविले आहे अशी तुमची खरी खात्री पटली असेल तर मात्र तुमची फसवणूक झालेली नाही. ज्याच्या मनात संभ्रम भरलेला असेल आणि जो आपल्याच बुद्धीवर विसंबून राहतो तो असत्यावर विश्वास ठेवून शेवटी फसतो.

पवित्र शास्त्र वाचणारे व त्यामधील सत्याला विरोध करणारे दोन प्रकारचे लोक असतात. ते जगाच्या शिकवणीवर भर देतात. पहिल्या प्रकारचे लोक म्हणजे जे स्वतःच्या बुद्धीमत्तेवरच विसंबतात आणि स्वतःला आपण समर्थ आहोत असे मानतात. दुसऱ्या प्रकारचे लोक म्हणजे जे नैतिकदृष्ट्या आज्ञाभंजक असतात. परंतु ज्यांना खरोखर देवाच्या इच्छेप्रमाणे वागावेसे वाटते त्यासंबंधी येशू म्हणतो, *'जो कोणी त्याच्या इच्छेप्रमाणे करावयाची मनिषा बाळगील त्याला ही शिकवण देवापासून आहे किंवा मी आपल्या मनचे बोलतो ते समजेल' (योहान ७:१७).*

देवाच्या इच्छेप्रमाणे करण्याची तुमची खरोखर तयारी असेल तर तुम्ही कशावर विश्वास ठेवावा व कशावर ठेवू नये आणि काय करावे व काय करू नये याचे मार्गदर्शन देवच तुम्हाला त्याच्या पवित्र वचनांमधून करील.

जे लोक देवाच्या वचनाचे स्वतःच्याच बुद्धीनुसार स्पष्टीकरण देतात त्यांच्यापासून तुम्ही सावध असले पाहिजे. ते तुम्हाला चुकीच्या विश्वासाप्रत नेऊन चुकीची वागणूक करावयास लावतील.

आज सैतानाचे अनेक हस्तक लोकांना बहकवीत आहेत. त्यांचे असे अनेक खोटे पंथ निर्माण झाले आहेत. ज्या कोणी देव जो पिता, देव जो पुत्र आणि देव जो पवित्र आत्मा - ह्या त्रैक्य देवावर - विश्वास ठेवण्याचे नाकारतो तो खोटा संदेष्टा आहे. असे लोक पवित्र शास्त्रातील वचने संदर्भाशिवाय उपयोगात आणतात आणि असे संदर्भहीन तत्वज्ञान जगासमोर मांडण्याचा प्रयत्न

करतात व खोटे धर्मशिक्षण देतात. असा खोटा शिक्षक तुम्ही ओळखू शकता. त्याला विचारा - येशू ख्रिस्त हा कोण आहे?'' यासाठीच तर तो नेमका कोण आहे हे प्रथम समजणे तुम्हाला अत्यावश्यक आहे.

येशू हा देवाचा पुत्र - देव जो पुत्र - आहे हे तुम्हाला खरेच समजले म्हणजे काही तथाकथीत गुप्त ख्रिस्ती पंथामध्ये आत्मिक संभ्रम* कसा आहे हे तुम्हाला समजेल. अशा पंथांमध्ये देवाचे नाव घेतले जात असले तरी येशूची शिकवण ते मानीत नाहीत.

येशू म्हणतो,

*''माझ्याद्वारे आल्यावाचून पित्याजवळ कोणी येत नाही'' (योहान १४:६).* जे विश्वासापासून बहकले आहेत त्यांच्याबद्दल पवित्र शास्त्र कडक शब्दात म्हणते - *'एक देव आहे असा विश्वास तूं धरितोस हे बरे करितोस, भूतेही विश्वास धरितात व कांपतात'' (याकोब २:१९).*

---

* संपूर्ण जगामध्ये 'फ्रिमेसनरी' हा सर्वात मोठा गुप्त ख्रिस्ती पंथ आहे. दहा दशलक्ष लोक त्या पंथाचे सदस्य आहेत' बंधुप्रेम, सत्य व स्वास्थ्य' या त्यांच्या तत्वांकडे अनेकजण आकर्षित होतात. सुरुवातीला सर्व काही हानीकारक नाही असेच वाटते. 'मेसन' होण्यासाठी प्रत्येक सदस्याला तो सध्या अंधारात आहे व प्रकाशाकडे वाटचाल करणार आहे हे कबूल करावे लागते. पण येशूवर विश्वास ठेवणाऱ्याला प्रकाश मिळाला आहे याची खात्री असते. येशू म्हणतो, ''मी जगाचा प्रकाश आहे, जो मला अनुसरतो तो अंधारात चालणार नाही तर त्याच्या जवळ जीवनाचा प्रकाश राहील'' (योहान ८:१२). मेसॉनिक पंथामध्ये दीक्षा देण्याचा नाट्यमय आणि प्रतिकात्मक विधी असतो. त्यावेळी त्या व्यक्तीला देवाच्या संकल्पनेपासून परावृत्त करण्यात येते. उलट 'ग्वाटो' या नामाकडे त्याला निर्देशित करण्यात येते. त्याला सांगण्यात येते 'ग्वाटो' हे देवाचे नवे नाव आहे व तो या विश्वाचा रचनाकार आहे. देवावर विश्वास ठेवणारी कोणतीही व्यक्ति बौद्ध,

आज पवित्र शास्त्रातील पवित्र देवाला नाकारणारे अनेक धर्म व पंथ वाढत आहेत हे आपण पाहातो. हिंदू धर्मातील अनेक पंथ लोकांना आपल्याकडे ओढीत आहेत. ज्या राष्ट्रांची परंपरा पवित्र शास्त्रावर आधारित होती तीच राष्ट्रे आता हिंदू धर्मातील काही चुकीची तत्वें, ध्यानधारणा, योगा यांनी प्रभावित झाली आहेत. हिंदूधर्मातून उद्भवलेले अनेक पंथ स्वतःचे देव (मूर्ती) निर्माण करून मूर्खपणाने त्यांचीच उपासना करीत आहेत. निर्माणकर्त्या परमेश्वराचे त्यांना मुळीच भान राहिले नाही. अनेक साधु व बुवा यांना महत्व देणारे अनेक संभ्रमित लोक आहेत ते जिवंत देवाला मानण्याऐवजी भोंदू साधूंवर अधिक विश्वास ठेवीत आहेत. त्याच जिवंत देवाने, त्याच्या आपल्यावरील प्रेमास्तव नम्र होऊन देहधारण केला हे ते मानत नाहीत.

मुस्लीम लोकही त्यांच्या धर्माचा द्वेषाने प्रसार करीत आहेत. काही वर्षांपूर्वी जे शक्य नव्हते ते त्यांना आता पेट्रोल-डॉलर्सद्वारे शक्य होत आहे आणि ते आपल्या राष्ट्रांच्या सीमा अधिक विस्तारीत आहेत. डोंम ऑफ रॉक ह्या यरुशलेमेमधील मुस्लीम लोकांच्या महत्वाच्या मशीदीत ते लोक देवाच्या सुवार्तेला जुमानत नाहीत. त्या

---

*(Contd...79)* ख्रिस्ती, मुस्लीम, हिंदू अथवा यहूदी ही फ्रीमेसन बनू शकते. म्हणून 'ग्वाटो' (मानव निर्मित देव) ही कल्पना येशू ख्रिस्तापासून, ज्याला पवित्र शास्त्र 'जगाचा प्रकाश' म्हणते (योहान १:९) त्यापासून ढळविते. नंतर नवीन मेसन जेव्हा मोठा मेसन होतो. तेव्हा त्याला देवाच्या आणखी एका नव्या नावाची ओळख करून दिली जाते. ते नाव म्हणजे 'बुलन'. यहूदी आणि मध्यपूर्वेत देवाचे जे नाव आहे त्याचे मिश्रण म्हणजे हे नाव होय. हे नाव याह म्हणजे याव्हे, बुल (बालाचे नाव) आणि अन म्हणजे मिसरी देव-सूर्य. अशातऱ्हेने संमिश्रण अपूर्वच म्हणावे लागेल! सगळ्या विश्वासांचे एक मिश्र रसायन! सारेच व्यर्थ! येशू स्वतः म्हणतो *'पण तुझा डोळा सदोष असला तर तुझे संपूर्ण शरीर अंधकारमय होईल; यास्तव तुझ्यातील प्रकाश जर अंधार असला तर तो अंधार केवढा !" (मत्तय ६:२३).*

डोम ऑफ रॉकच्या सभोवती असे लेख आहेत. 'देवाला पुत्र नाही आणि तो त्याने कधीही दिला नाही.' पवित्र शास्त्र तर स्पष्टपणे सांगते.

> *'देवाने जगावर एवढी प्रीती केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, यासाठी, की जो कोणी त्याजवर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे'' (योहान ३:१६).*

धार्मिक क्षेत्रातच आत्मिक संभ्रम आहे असे नाही. धर्मनिरपेक्ष जगामध्ये मानव कल्याणालाच महत्व दिले जात आहे. मनुष्य हाच विश्वाचा केंद्रबिंदू आहे आणि मानवाचे सर्वतोपरी कल्याण साधेल हेच त्यांचे ध्येय आहे. रेडिओ, टेलिव्हीजन, शाळा, कॉलेजेस, वर्तमानपत्रें, मोठमोठ्या आंतरराष्ट्रीय कंपन्या यामधून मानवतेचे तुणतुणे वाजविले जात आहे. ''स्वतःचेच कौतुक'' प्रत्येक जाहीरातीतून प्रगट होत आहे.

मानवता म्हणजे मानवाचीच पुजा असे तत्व आज मानण्यात येत असले तरी ती काही नवीन कल्पना नाही. पौलाच्या काळामध्ये देव म्हणाला, *''त्यांनी देवाच्या खरेपणाची लबाडीशी अदलाबदल केली आणि निर्माणकर्त्याऐवजी निर्मितांची भक्ती व सेवा केली. तो निर्माणकर्ता तर युगानुयुग धन्यवादित आहे. आमेन'' (रोम १:२५).* मानवतावाद्यांना देव एक साधा प्रश्न विचारत आहे : *'मी पृथ्वीचा पाया घातला तेव्हा तू कोठे होतास? तुला समजण्याची अक्कल असेल तर सांग'' (ईयोब ३८:४).* ही तर जुनीच गोष्ट आहे. सैतान हवेकडे येऊन जे अशक्य आहे ते शक्य आहे असे भासवून म्हणाला, *''तुम्ही देवासमान व्हाल'' (उत्पत्ति ३:५).* आजही सैतान धर्मनिरपेक्ष मानवतावादातून जगाला विकृत शिक्षण देत आहे.

कदाचित तुम्ही आजच्या नवयुगातील तरुण असाल आणि कोणत्या धार्मिक किंवा राजकीय प्रणालीचा तुमच्यावर प्रभाव नसेल. तुमच्या मते राजकारण संशयास्पद आणि धर्म अप्रस्तुत असेल. स्वतःच्या कर्तृत्वाने स्वतःचा उद्धार करावा असे तुम्हाला वाटत असेल. रॉक म्युझिक, संगीताचा झंकार, किंवा इतर कोणत्या झगमगाटामुळे तुम्ही स्वतःचा एकटेपणा विसरण्याचा प्रयत्न करीत असाल.

जे शब्द तुमच्या कानी पडतात व त्यानुसार तुम्ही नाचता ते शब्द तुम्हाला समजतात. त्यांचे वर्णन करण्याची तुमची इच्छा नसेल. पण सैतान, लैंगिकता आणि उदासीनतेने ते भरलेले असतात हे तुम्ही मान्य कराल. नरकाच्या भेसूरतचे वर्णन त्या संगीतातून प्रतीत होते. अर्थहीन अस्तित्वाचा पर्याय म्हणून तुम्ही ते स्वीकारता. कधी कधी परस्थिती हिंसक बनते आणि अशा वेळी तरुण बेभान होऊन स्वतःचा व इतरांचा नाश करण्यास सरसावतात.

लॉस एंजेल्स शहरातील एका ठिकाणाबद्दल मी तुम्हाला सांगतो. ते ठिकाण 'रेफ्रिजरेटर' या नावाने ओळखले जाते. ते मृतदेह बर्फात ठेवण्याचे ठिकाण आहे. तेथे ६०० तरुणांचे मृतदेह तीन महीने जतन करून ठेवले होते. त्यांचे नातेवाईक केव्हा येतील व ते आपल्या मुलांचे मृतदेह ओळखतील याची प्रतीक्षा करती होते. 'अनोळखी अशा नावाची चिट्ठी प्रत्येकाच्या अंगठ्याला बांधली होती. पुढे त्यांच्यापैकी अनेकांचा 'अनोळखी' म्हणूनच कोणत्यातरी स्मशानभूमीत दफन विध ी केल्या गेला. ही सगळी तरुण पीढी चुकीच्या मार्गावर होती. तो मार्ग बदलणे त्यांना अशक्य झाले होते. जर त्यांनी येशूचे शब्द ऐकले असते तर किती बरे झाले असते. *येशू म्हणतो, ''मी आलो आहे तो त्यांना जीवनप्राप्ति व्हावी व ती विपुलपणे व्हावी म्हणून आलो आहे'' (योहान १०:१०).*

या गोंधळात भरीस भर म्हणून आता 'काळा जादूटोणा' आला

आहे. अंधाराच्या युगात होत असलेला जादूटोणा आज मोठ्या प्रमाणात चालू आहे याचे खात्रीशीर पुरावे उपलब्ध आहेत. विज्ञानयुगात हे चालू आहे हे आश्चर्यच आहे!

कल्पना करता येणार नाही अशा ठिकाणी सैतानाची उपासना करणारे लोक मोठ्या संख्येने वावरत आहेत. लंडन शहरातील अनेक व्यावसायिक किंग्स्टन या शहरात 'ब्लॅक मास' साजरा करण्यासाठी एकत्र जमतात. चेटूक करण्याचे प्रकार युरोपमध्ये आणि दूरच्या सुंदर अशा व्हॅंकूवर बेटापर्यंत पोहंचले आहेत. आफ्रिकेतील काळी जादू जगात सर्वत्र पसरत आहे. अनेक खेळसुद्धा 'नरक व श्वापद', 'प्लॅंचेट' यावर आधारलेले असून लोकांची भलती करमणूक करीत आहेत. हा सगळा परिणाम वरकरणी फसव्या धार्मिकतेच्या दिखाऊपणामुळे आहे. चुकीच्या मार्गाने देवाचा शोध ते करीत आहेत. त्यामुळे ते जिवंत देवाच्या प्रकाशापासून दूर तर जात आहेतच पण जादू-टोण्याच्या गडद अंधारात गडप होत आहेत. आणि आपण अशा समाजाला आज सुसंसकृत समाज समजत आहोत.

देव शेवटल्या दिवसांसंबंधी काय म्हणतो याचे नीट स्मरण ठेवले पाहिजे. खोटे संदेष्टे, चिन्हे व अद्‌भुते यामुळे शेवटल्या काळी मनुष्य संभ्रमीत होईल. देव म्हणतो की अखेरच्या काळात भयंकर फसवणूक करणारा अधर्मी पुरुष प्रगट होईल..... *"सैतानाच्या कृतीप्रमाणे सर्व प्रकारची खोटी महत्कृत्ये, चिन्हे, अद्‌भुते आणि सर्वप्रकारचे अनीतिजनक कपट यांनी युक्त असे त्या अनीतिमानाचे येणे होईल" (२ थेस्सल २:९,१०).*

खोटे शिक्षण आणि दुष्ट प्रथा याचा वाढता प्रभाव यामुळे समाज व राष्ट्रे ही निराशेच्या पोकळीत भिरभिरत आहेत. सैतानाच्या अनेक खाणाखुणा आज अस्तित्वात आहेत परंतु त्यातील एकही जगाचा उद्धारक प्रभु येशू ख्रिस्त याकडे निर्देष करीत नाही.

जगाला दुःखाच्या दरीत लोटणाऱ्या या परिस्थितीत, देवाचा संदेश कधीच निराशाजनक, गोंधळात पाडणारा आणि मृत्युसमान नाही. त्याचा संदेश संपूर्ण आशेचा, विश्वासाचा आणि विपुल जीवनाचा आहे. देवाचा शोध घेतांना जेव्हा तुम्ही पवित्र शास्त्राचे वाचन करता तेव्हा पवित्र आत्मा तुम्हाला सतत प्रभु येशू ख्रिस्ताकडे निर्देष करील. तो म्हणतो, *“मार्ग, सत्य व जीवन मीच आहे’, माझ्याद्वारे आल्यावाचून पित्याकडे कोणी येत नाही”(योहान १४:६).* येशूशिवाय दुसरा मार्गच नाही.

चुकीच्या मार्गदर्शनासंबंधी देवाने तुम्हाला इशारा दिला आहे. तुम्ही मार्ग भ्रष्ट होता कामा नये. पुष्कळ संभ्रम निर्माण होईल व तुमची मने गोंधळून जातील असे देवाने अगोदरच स्पष्ट केले. आहे. आता तो तुम्हाला अभिवचन देत आहे.

> *“परमेश्वर म्हणतो, तुम्हाविषयी माझ्या मनात जे संकल्प आहेत, ते मी जाणतो. ते संकल्प हिताचे आहेत. अनिष्टांचे नाहीत ते तुम्हास तुमच्या भावी सुस्थितीची आशा देणारे आहेत. तेव्हा तुम्ही माझा धावा कराल, तुम्ही जाऊन माझी प्रार्थना कराल व मी तुमचे ऐकेन. तुम्ही मला शरण याल आणि पूर्ण जिवेभावे माझ्या शोधास लागला तेव्हा मी तुम्हास पावेन. परमेश्वर म्हणतो मी तुम्हास पावल्यावर तुमचा बंदिवास उलटवील आणि सर्व लोकांत व ज्या सर्व स्थळी मी तुम्हास हाकून लाविले आहे तेथून तुम्हास एकत्र करीन” (यिर्मया २९:११-१४).*

### विचार करा

१. कोणते मन निर्मात्याऐवजी निर्मितीचीच उपासना करेल? (रोम १:२२-२८ वाचा)

२. देवाचा शोध घेतांना, तुमच्या मनातील प्रश्न सोडविण्यासाठी कोणती किल्ली तुमच्या हाती देण्यात आली आहे? (योहान ७:१७ वाचा).
ती म्हणजे तुमचे मन आहे काय?
तुमची इच्छाशक्ती आहे काय?

३. देवाप्रत पोहचण्यासाठी त्याने तुम्हाला स्पष्ट चिन्हे दिली आहेत काय? (योहान ८:१२ वाचा).

*पुष्कळ वर्षांपूर्वी इंग्लंडमधील एका शब्बाथ शाळेतील मुलाने त्याच्या शिक्षिकेला एक प्रश्न विचारला : ‘बंडखोर मुलांवर देव प्रीती करतो कां?’’ शिक्षिकेने उत्तर दिले, ‘‘मुळीच नाही.’’ असे सांगून नकळत देवाची नालस्ती करण्यात आली! जर देव बंडखोर मुलांवर प्रीती करीत नसेल तर त्याने माझ्यावर प्रीती केली नाही! शेक्सिपियर म्हणतो, ‘‘बदल पाहून प्रीती बदलत असेल तर ती प्रितीच नाही!’’*

*जी. कॅम्बेल मार्गन*

# प्रकरण ७

# देव खरोखर माझ्यावर प्रीती करतो काय?

तुम्हाला ज्या व्यक्तीचे खूप महत्व वाटते त्या व्यक्तीच्या प्रितीसंबधी तुम्ही कधी प्रश्न केला आहे काय? किंवा ज्या व्यक्तींवर तुम्ही प्रीती करता त्या व्यक्तीला तुमच्या प्रीतीबद्दल कधी पुरावा देण्याचा प्रयत्न केला काय? खरी प्रीती ही केवळ शब्दातून नव्हे तर योग्यवेळी केलेल्या कृतीतून प्रगट होत असते.

शब्दांपेक्षा कृती प्रभावी असते आणि देवाने येशूच्या क्रूसखांबावरील मरणाच्याद्वारे त्याची प्रीती दाखवून दिली. या देवाच्या कृतीमधील महत्व तुम्हाला समजले म्हणजे देव तुम्हावर प्रीती करतो हे नव्याने सांगण्याची मुळी गरजच नाही.

मी जेव्हा प्रथम ख्रिस्ताकडे वळलो तेव्हा एक सत्यकथा माझ्या वाचनांत आली. ती एका तुतारी वाजविणाऱ्या मुलाची व एका शिपायाची आहे. बोर युद्ध सुरू असतांना ते दोघेजण सैन्यात काम करीत होते. तुतारी वाजविणारा मुलगा, विली होल्ट हा तेव्हा बारा वर्षांचा होता. देवाची ओळख नसलेल्या सात शिपायांमध्ये एका तंबूत त्याला ठेवले होते. त्या शिपायांपैकी एकाचे नाव बिल होते. बिलच्या

उलट विली येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणारा असा मुलगा होता. रोज रात्री विली आपल्या बिछान्याजवळ गुडघे टेकून शास्त्र वाचून शांतपणे प्रार्थना करीत असे. हे पाहून इतर शिपाई विलची चेष्टा करीत व त्याला हिणवीत असत.

एकदा त्या पथकाच्या प्रमुख अधिकाऱ्याने त्यांना कवायतीच्या मैदानावर बोलावले. विली व बिल ज्या दिवशी तंबूची रखवाली करीत होते त्या दिवशी चोरी झाल्याचे निष्पन्न झाले होते. तो अधिकारी कर्नल ह्या पदावर होता आणि तो खूप संतापला होता. त्याने सर्व शिपायांना निर्वाणीचा इशारा दिला. तो म्हणाला, ‘पूर्वीही मी तुम्हाला ताकीद दिली होती पण तिचा काही उपयोग झाला नाही. काल रात्री पुन्हा चोरी झाली आहे. ज्याने चोरी केली आहे त्याला मी ती कबूल करण्याची आता शेवटची संधी देत आहे. जर कोणीच कबूल झाले नाही तर तुम्हातील प्रत्येकाच्या पाठीवर चाबकाचे दहा फटके मारण्यात येतील; पण तुमच्यापैकी एकाने कबूली दिली तर बाकीचे शिक्षेमधून सुटतील.”

सगळीकडे गंभीर शांतता पसरली. तेव्हढ्यात विली एक पाऊल पुढे आला व म्हणाला, सर, तुम्ही म्हणाला की एकाने गुन्हा कबूल केला तर बाकीचे सुटतील मग मीच तो एक आहे. ते पाहून तो कर्नल कडाडला – ‘कोण आहे तो भ्याड शिपाई जो एका कोवळ्या निरपराध ा मुलाला बळी देत आहे?” कोणीच काही हालचाल करेना. तेव्हा तो कर्नल म्हणाला, “असे असेल तर त्या गुन्हेगार शिपायाच्या बदली या कोवळ्या पोराला होणारी भयंकर शिक्षा तुम्हाला पाहावी लागेल.”

कर्नलने म्हटल्याप्रमाणे, विलीच्या पाठीवर चाबकाचे क्रूर फटके बसू लागले. त्या फटक्यांसरशी विली भोवळ येऊन खाली कोसळला. ते

भयंकर केविलवाणे दृष्य पाहून बिल पुढे आला व म्हणाला, ‘‘थांबा! मी चोरी केली. त्याची शिक्षा मी भोगीन.’’ तोवर विली हळूहळू भानावर आला होता. पडल्या पडल्याच त्याने बिलकडे किलकिल्या डोळ्यांनी पाहिले व हळूवार स्वरात तो म्हणाला, ‘‘बिल, कर्नलने हुकूम दिला आहे आणि तो आता मोडता येणार नाही, उरलेले फटके मीच खाईन!’’ आणि विलीने ते दहा भयंकर क्रूर फटके स्वतः सहन केले.

त्या कोवळ्या विलीला त्या फटक्यांच्या परिणामातून कधीच बरे होता आले नाही. विली मृत्युपूर्वी अंथरुणाला खिळून होता, बिल मनाने खूप खचला, विलीच्या खाटेजवळ बसून रडत रडत तो म्हणाला, ‘‘विली, हे तू माझ्यासाठी का सहन केले?’’ विली त्याला म्हणाला, ‘‘बिल, देवाच्या प्रीतीबद्दल मी तुला सांगत होतो तेव्हा तूं माझी चेष्टा करीत होता. तुझी शिक्षा मी स्वतःवर घेतली कारण आता तरी तुला येशूची प्रीती समजावी. तुझ्याऐवजी त्याने स्वतःचा प्राण त्या वधस्तंभावर दिला. तुझ्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तो मरण पावला. ’’ विली मरण्याअगोदर बिलने येशू ख्रिस्ताचा, त्याच्या तारणारा म्हणून स्वीकार केला.

मरणाच्या पंथास लागलेल्या मानवाकरिता, तारणाची ही अतर्क्य योजना स्वर्गातून पृथ्वीवर राबवण्यात आली. त्या योजनेचा केंद्रबिंदू आहे प्रीती - देवाची मानवावरील प्रीती. त्या प्रीतीस्तव ख्रिस्ताने अगदी आज्ञाधारकपणे आपल्या तारणासाठी स्वतःचा जीव दिला.

## परिपूर्ण मनुष्य

गुलगुथा टेकडीवर तीन क्रूस उभे होते. दोन क्रूसावर दोन चोरांना टांगण्यात आले होते. त्या दोघांच्या मधील क्रूसावर येशूला खिळण्यात आले होते व त्याने तेथेच त्याचा प्राण सोडला होता.

क्रूसावरील त्या भयानक यातना सहन करीत असतांनाच, एक चोर त्या काळातील न्यायसंस्थेवर चिडून त्याचे मत मांडत होता. क्रूसावर रक्तबंबाळ झालेल्या त्याच्या शरीराचे त्यावेळी भान नव्हते हे अजबच वाटेल. त्या दोन चोरांनी घोर अपराध केला होता. पण येशू निरपराध आहे हे कळून चुकल्यावर तो चोर रोमी सरकारला दोष देत होता. निरपराध येशूला त्यांनी विनाकारण मृत्युदंडाची शिक्षा दिली होती. या अन्यायामुळे तो चोर गलबलला होता. त्या चोराने अगदी अचूक अशा तीन गोष्टी नम्रपणे हेरल्या होत्या, आणि थोड्याच वेळाने तो चोर अखेरचा श्वास घेणार होता.

पहिली गोष्ट : 'आपण आपल्या कृत्याचे फळ भोगत आहोत' या अगदी छोट्याशा वाक्यात त्या मरणाऱ्या चोराने स्वतःच्या पापांची नम्रपणे कबूली दिली आहे.

दुसरी गोष्ट : 'आपले मरण तर यथार्थ आहे', आजच्या जगात चोरी करणे हा साधारण सर्वत्र घडणारा गुन्हा आहे. पण पहिल्या शतकामध्ये अशा गुन्ह्यासाठी मृत्युदंडाचे कडक शासन होते. परंतु त्या चोराने, त्या दोन चोरांना दिलेली मृत्युदंडाची शिक्षा कशी कायदेशीर व न्याय्य आहे याची खात्रीच पटवून दिली, "..... आपला दंड यथान्याय आहे."

तिसरी गोष्ट : 'ह्याने काही अयोग्य केले नाही.' त्या चोराने स्वतःचा अपराध कबूल केला आणि रोमी सरकारचा न्याय व सजा मान्य केली. येशूबद्दल त्याचा कळवळाही त्याने दाखवला. 'हा मनुष्य येशू' खरोखर निर्दोष आहे याची खात्री त्या चोराला पटली होती, आणि अशा निर्दोष मनुष्याला अन्यायाने वधस्तंभावर खिळले आहे हे त्या मरणाऱ्या चोराच्या लक्षात आले होते.

स्वतःच्या अपराधाची जाणीव झाल्यामुळे त्या चोराला येशूकडे वळण्याशिवाय दुसरा पर्यायच राहिला नव्हता. म्हणूनच तो अगदी काकूळतीने येशूला म्हणाला, *'तू आपल्या राजाधिकाराने येशील तेव्हा माझी आठवण कर'* अशा प्रामाणिक पाप कबुलीमुळे येशूने लगेच त्या चोराला अभिवचन दिले, *'मी तुला खचित सांगतो, तूं आज मजबरोबर सुखलोकात असशील'' (लूक २३:३९-४३).*

त्याच दिवशी त्या पश्चात्तापी चोराला सार्वकालिक जीवनाची हमी येशूने दिली. कारण तो चोर योग्य व्यक्तीकडे - येशूकडे वळला आणि दयेची याचना त्याने योग्य जागी म्हणजे येशू मरण पावला त्या क्रूसाजवळ केली.

होय, त्या दोन मरणाऱ्या चोरांपैकी एका चोराची खात्री पटली होती की येशू सर्वस्वी निर्दोष आहे. पुढे येशूच्या दोन शिष्यांनीही दोन गोष्टी ध्यानी घेतल्या. त्यांनी प्रामाणिकपणे साक्ष दिली की येशू निर्दोष व निष्पाप होता. हे दोन शिष्य व प्रेषित पौल यांनी येशू कसा निष्पाप आहे याची साक्ष दिली आहे.

येशूचा अगदी जवळचा मित्र असलेला पेत्र उतावीळ म्हणून परिचीत होता. त्याच्या त्या स्वभावाला साजेशा भाषेतच त्याने येशू निर्दोष असल्याची साक्ष दिली आहे. तो म्हणतो *'त्याने पाप केले नाही'* अशी कृतीमय भाषा पेत्र वापरतो (१ पेत्र २:२२).

योहानसुद्धा येशूशी अगदी निगडीत होता. तो त्याचा अगदी जवळचा मित्र होता. येशू जेव्हा लोकांच्या गर्दीपासून दूर असे तेव्हा योहान त्याच्याकडे लक्षपूर्वक पाहात असे. अशा शांत व बारीक पाहाणीनंतर योहान येशूबद्दल म्हणतो, *''त्याच्या ठायी पाप नव्हते' (१ योहान ३:५).*

पौल एक बुद्धिमान व नावाजलेला धर्मपंडित होता. त्याने आपल्या हुशारीने व ज्ञानाने म्हटले, *''त्याला पाप ठाऊक नव्हते''* *(२ करिंथ ५:२१)*. अर्थात त्यात नवल वाटण्यासारखे काही नाही. येशू निष्पाप आहे याबद्दलच्या या साक्षी खरोखर लक्षणीय आहेत.

परंतु काही लोकांना हे म्हणणे पटणार नाही. ते म्हणतील, ''तो मरणारा चोर किंवा पेत्र, योहान आणि पौल यांच्या साक्षी वस्तुनिष्ठ नाहीत. तो मरणारा चोर भयंकर विथरलेला होता आणि ते प्रेषित येशूविषयी असलेल्या त्यांच्या समर्पणासंबंधी साशंक होते'', ठीक आहे, पण तो रोमी सुभेदार व पंतय पिलात यांच्या सबंधी काय? तो तर निश्चितच येशूचा मित्र नव्हता. लोकसमुदाय येशूला मरणदंडाची शिक्षा द्यावी असा आग्रह धरीत होता. तेव्हा पंतय पिलात म्हणाला,

> *''पाहा ज्या गोष्टींचा आरोप तुम्ही ह्याच्यावर ठेवता त्यासंबंधी मी तुमच्यासमक्ष ह्याची चौकशी केल्यावर मला ह्या मनुष्याकडे काहीही दोष सांपडला नाही'' (लूक २३:१४).*

देव जो पिता, आकाशातील त्याच्या रासनावरून जे जाहीर करतो त्यासंबंध या सर्व मानवी साक्षींची तुलना कशी करावी बरे? एखाद्या जाहीर सभेमध्ये जेव्हा एखादा वक्ता भाषण करतो तेव्हा त्याची ओळख करून देण्याची प्रथा आहे. येशू ख्रिस्ताच्या सेवेपूर्वी देवाने देखील त्याच्या प्रिय पुत्राची ओळख करून दिली. अतिशय स्पष्ट आवाजात देववाणी झाली - *'हा माझा पुत्र मला परमप्रिय आहे, याजविषयी मी संतुष्ट आहे' (मत्तय ३:१७).*

देव पित्याला ठाऊक होते की येशूने या जगात देहधारण करून जे जीवन जगायचे होते ते त्याच्या इच्छेप्रमाणे होते. *आपण सर्वजण*

*पापी असल्यामुळे देवाच्या गौरवाला अंतरलो (रोम ३:२३).* परंतु येशू मात्र तसा नव्हता! तो सर्वदृष्टीने परिपूर्ण होता. म्हणून येशूने आपल्या सेवेची सुरुवात केली तेव्हा देवपित्याने त्याची ओळख करून दिली. ती त्याच्या पवित्र पित्याने करून दिलेली ओळख आहे (योहान १७:११). त्याचा प्रिय पुत्र ज्या पद्धतीने जगला त्याप्रती त्याला संतोष वाटला.

प्रभु येशू हा देवापेक्षा किंचितही कमी नाही हे आपण पूर्वी पाहिले आहे. देवाने स्वतःला नम्र केले व मनुष्यदेह धारण केला व कुमारिकेच्या उदरी जन्म घेतला हे विस्मयकारक आहे. तरी येशू आपल्या पित्याच्या इच्छेप्रमाणे वागला नसता तर पित्याला कधीच आनंद वाटला नसता. या जगात असतांना येशू नेहमी पित्याच्या इच्छेप्रमाणे वागला आणि त्याने पित्याला नेहमी संतोषच दिला. येशूच्या मानवी रुपातून पित्याचे स्वर्गीय व पवित्र प्रगटीकरण होते. त्याच्या प्रीतीची प्रतिती या स्वार्थी, पापी आणि दुःखमय जगात येते.

होय, ज्या येशूने देव म्हणून पृथ्वी निर्माण केली त्याच पृथ्वीवर तो मनुष्य म्हणून वावरला. येशू देवापेक्षा किंचीतही कमी नव्हता तरी मानव स्वरुपात त्याने देवाची मनुष्याने कसे वागावे ही अपेक्षा ३३ वर्षे स्पष्ट केली. देवाने मनुष्य कसा असावा हे येशूच्या जीवनातून परिपूर्णपणे दाखवून दिले. पृथ्वीवरील त्याच्या जीवनात येशूने दाखवून दिले की तो सदैव स्वर्गीय पित्यासाठी हजर आहे. त्यामुळे स्वतःच्या प्रिय पुत्राकडे पाहताना देव नेहमी संतुष्ट होता. येशू मनुष्य म्हणून परिपूर्ण जीवन जगला.

निर्दोष! निष्पाप! परिपूर्ण! मरणाऱ्या त्या पश्चातापी चोराला व पंतय पिलाताला येशू निर्दोष व निष्पाप आहे हे दिसले. पेत्र, योहान

आणि पौल यांच्या दृष्टीने येशू निष्पाप होता. स्वर्गीय पित्याच्या दृष्टीने येशू परिपूर्ण होता. निर्दोष! निष्पाप! परिपूर्ण! तरी पण तो मरण पावला. आम्हावरील अमर्याद प्रेमास्तव तो मरण पावला!

## अमर्याद प्रीती

त्या पहिल्या उत्तम शुक्रवारी जे लोक तेथील हृदयद्रावक दृश्य पाहात होते त्यांच्यामध्ये तुम्ही उभे आहात अशी कल्पना करा. क्रूसाभोवती लोक अवाक होऊन पाहात होते. ते भयानक दृष्य पाहात असतांना तेथे एक विरोधाभासही दिसत होता.

येशूच्या दोन्ही बाजूला दोन चोर वधस्तंभावर टांगण्यात आले होते. ते मनुष्यासमोर आणि निर्माणकर्त्या देवासमोर दोषी होते. कायद्याप्रमाणे त्यांना मृत्युदंडाची शिक्षा गरजेची होती.

त्या दोन चोरांच्यामध्ये येशू त्याच्या वधस्तंभावर खिळलेला आहे. येशू केवळ मनुष्यांसमोरच नव्हे तर देवासमोरही निर्दोष होता. परंतु तो त्याच्या पवित्र पित्यापुढे परिपूर्णही होता. होय, 'देव ख्रिस्तामध्ये...' (२ करिंथ ५:१९) निष्कलंक व निर्दोष वध ास्तंभावर गेला (१ पेत्र १:१९). देवाच्या अतीव प्रेमास्तव पाप्यांसाठी ख्रिस्त मरण पावला.

येशू चोरांसारखाच मरण पावला नाही. येशू त्याच्या विरोधकांना म्हणाला, *"मी आपला जीव परत घेण्याकरतां देतो....मला तो देण्याचा अधिकार आहे व तो परत घेण्याचाहि अधिकार आहे' (योहान १०:१७,१८).* आपल्या प्रीतीची परिसीमा केवढी आहे हे शिष्यांना सांगतांना येशू म्हणाला, *'आपल्या मित्रांकरिता आपला प्राण द्यावा यापेक्षा कोणाची प्रीती मोठी नाही' (योहान १५:१३).*

प्रभुच्या मृत्यूनंतर व त्याच्या पुनरुत्थानानंतर पौलाने म्हटले, *‘ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याला त्याने तुमच्या आमच्याकरिता पाप असे केले यासाठी की आपण त्याच्या ठायी देवाने नीतिमत्व असे व्हावे’ (२ करिंथ ५:२१).* येशूच्या बलीदानातील सत्य अनेक शतकांनंतर असे शब्दबद्ध झाले :

प्रभु, तूं माझे नीतिमत्त्व आहेस
मी तर तुझे पाप होतो
जे माझे ते तूं आपलेसे केले
तुझे ते मला मुक्तपणे दिले
तूं जसा नव्हताच मुळी तसा झाला
की मी जसा नाही तसा व्हावे

## गव्हाचा दाणा

आपल्या मरणाची पूर्ण कल्पना येशूला होती म्हणूनच तो शिष्यांना म्हणाला,

*‘आता माझा जीव व्याकूळ झाला आहे, मी काय बोलू? हे बापा या घटकेपासून माझे रक्षण कर, परंतु मी यासाठीच या घटकेत आलो आहे. हे बापा तूं आपल्या नामाचे गौरव कर. तेव्हा अशी आकाशवाणी झाली की मी ते गौरविले आहे आणि पुन्हाही गौरवीन’’ (योहान १२:२७-२८).*

पण रोमी सरकारच्या त्या क्रूसावरील अनन्वित छळातून देवाचे गौरव कसे होते याविषयी तुम्हाला आश्चर्य वाटत असेल.

आपल्या पित्याला प्रार्थना करण्याआधी येशूने शिष्यांना सांगितले होते की गव्हाचा दाणा मेल्याशिवाय पीक देऊ शकत नाही.

*“मी तुम्हाला खचीत खचीत सांगतो गव्हाचा दाणा जमिनीतून पडून मेला नाही तर तो एकटाच राहतो आणि मेला तर बहुत पीक देतो” (योहान १२:२४).*

येशू निष्पाप होता त्यामुळे मृत्यू त्याच्यावर कधीच मात करू शकत नव्हता. तरी त्याने मरण स्वीकारले. तुमच्या आणि माझ्याऐवजी त्याने मृत्यू पत्करला. त्या मृत्युद्वारे तो अनेकजण तारलेले असे मिळवी. म्हणूनच येशू त्याची योजना स्पष्ट करतो व तारणाची खात्रीही देतो. तो म्हणतो -

*“मी पित्यापासून निघून जगात आलो आहे, पुन्हा जग सोडून पित्याकडे जात आहे” (ही त्याची योजना); ‘आणि मी जाऊन तुम्हासाठी जागा तयार केली म्हणजे पुन्हा येऊन तुम्हाला आपल्याजवळ घेईन, यासाठी की जेथे मी आहे तेथे तुम्हीहि असावे” (हे त्याचे अभिवन). (योहान १६:२८; १४:३)*

हे आश्चर्यकारक आहे. कदाचित ते अविश्वसनीय असे वाटेल. तारणाऱ्या ख्रिस्ताच्या असीम प्रेमाची माहिती असूनही काहीजण त्याच्या पापक्षमेचा अव्हेर करतील. त्याच्या मृत्युसंबंधी काहीजण अलिप्त राहतील. लोक त्याचा अव्हेर करोत की त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करोत, सर्वांचा परिणाम एकच-सार्वकालिक जीवनास कायमचे मुकणे, सार्वकालिक प्रितीला व सार्वकालिक प्रकाशाला मुकणे. ही अत्यंत भयानक अवस्था अशी शब्दबद्ध केली आहे -

मरण तर तुला मरावेच लागेल

एवढे भयंकर मरण मरावे लागेल
ते असेल अनंतकालिक मरण
सतत मरत राहशील पण मरणार नाहीस.

**तरी येशू ख्रिस्त तुमची नरकातून सुटका होऊन तुम्ही स्वर्गात जावे यासाठीच मेला नाही तर स्वर्गातून देव तुम्हास मिळावा म्हणून मेला.**

सार्वकालिक जीवन म्हणजे मी केवळ स्वर्गात चिरकाल राहीन एवढेच नव्हे. पवित्र शास्त्र खात्रीदायक सांगते की आताचे आपले वैभवी जगणे म्हणजे सार्वकालिक जीवनच आहे.

*'देवाने आपल्याला सार्वकालिक जीवन दिले आणि हे जीवन त्याच्या पुत्रामध्ये आहे. ज्याला तो पुत्र आहे त्याला जीवन आहे, ज्याला देवाचा पुत्र नाही त्याला जीवन नाही' (१ योहान ५:११,१२).*

सार्वकालिक जीवन त्या व्यक्तीमध्ये आहे – प्रभु येशू ख्रिस्तामध ये. जेव्हा येशू आपल्या हृदयात येतो तेव्हा सार्वकालिक जीवन त्या क्षणी सुरू होते.

## फार मोठे मोल

देवाची पवित्रता, न्याय आणि असीम प्रीती ही येशू ख्रिस्ताच्या वधस्तंभावर एकवटली आहेत. तेथे देवाची पवित्रता प्रगटली, त्याचा न्याय यथार्थ ठरला आणि तुमच्या आणि माझ्यासारख्या पापी लोकांवर देवाच्या प्रितीचा वर्षाव झाला. पण त्यासाठी त्याला फार मोठे मोल द्यावे लागले.

ओसवाल्ड चेंबर्सनी त्यांच्या 'माय अटमोस्ट फॉर हिज हायेस्ट' या पुस्तकात एक इशारा सुरुवातीला दिला आहे.

*‘देवाच्या पित्यासमान प्रेमाची जाणीव ठेवा. तो म्हणतो, ‘देव एवढा प्रेमळ व कृपाळू आहे की तो आपल्या पापांची निश्चित क्षमा करील. नव्या करारात भावनांना थारा नाही. केवळ येशू ख्रिस्ताच्या वधस्तंभाद्वारेच देव आपल्या पापांची क्षमा करून आपल्याला त्याच्या जवळ घेतो. वधस्तंभाशिवाय दुसरा मार्गच नाही. हे सत्य आम्हाला उमगले तरी अत्यंत साध्या-सरळ विश्वासामुळे आपण क्षमा पावू शकतो आणि कदाचित देवाने यासाठी किती मोठे मोल दिले हे विसरूनही जातो.*

विली होल्टच्या त्यागाबद्दल आपण अगोदर वाचले आहेच. परंतु कालवरीच्या त्या टेकडीवर खुद्द देवाने जे भयंकर दुःख आपल्यासाठी सहन केले. ते काणाही मनुष्याला सहन करणे केवळ अशक्य आहे. आत्म्याने भरलेल्या देवाच्या वचनातून म्हणजेच पवित्र शास्त्रातून देव पडदा सारून त्याच्या प्रेमळ त्यागाचे सकृत दर्शन आपल्याला घडवतो. तरीही त्याच्या प्रेमाची व्याप्ती मनुष्याच्या बुद्धिसामर्थ्यापलीकडील आहे. त्या प्रीतीचा विचार केला तर खरेच तिची लांबी, रुंदी, उंची व खोली किती आहे हे अजमावणे फार कठीण आहे.

**आपल्या पापास्तव येशूने वधस्तंभावर जे दुःख सहन केले ते तीन प्रकारचे आहे.**

वधस्तंभावर येशूचे शरीर विंधले गेले, वधस्तंभावर येशूची प्रीती पूर्णतेस आली आणि वधस्तंभावर येशूचा आपल्या प्रेमळ पित्याशी असलेला संबंध तुटला - पित्याचे गौरव, प्रकाश व शांती त्याजपासून दूर झाली. येशूने आपल्यासाठी वधस्तंभावर जे सहन केले त्याची पूर्ण कल्पना आपल्याला कधीच करता येत नाही.

येशूने वधस्तंभावर सहन केलेले शारीरिक दुःख, मानसिक दुःख आणि आत्मिक दुःख यांचा आपण नव्याने विचार करू व त्यातून त्याने आम्हा पापी लोकांवर किती प्रीती केली हे जाणून घेऊ.

**शारीरिक दुःख** : एक चुरगळलेला कागदाचा बोळा फाडून टाकणे आणि एक अप्रतिम, अतिमोलवान चित्रकृति फाडून टाकणे यात किती फरक आहे. तसेच येशू ख्रिस्ताचे मरण आणि एखाद्या सामान्य मनुष्याचे मरण याची तुलना होऊच शकत नाही.

जुन्या करारामध्ये, शारीरिक दुःखभोगामुळे येशूचा चेहरा किती विरूप होईल याचे भाकित केले आहे, 'त्याचा चेहरा मनुष्यांसारखा नव्हता, त्याचे स्वरुप मनुष्य जातींच्यासारखे नव्हते इतका तो विरूप होता' (यशया ५२:१४). त्याचा चेहरा ठेचला गेला होता व त्याला ओळखणे कठीण झाले होते. येशूने स्वतःच यासंबंधी म्हटले,

> *'पाहा आपण वर यरुशलेमेस जात आहो, तेथे मनुष्याच्या पुत्राला मुख्य याजक व शास्त्री ह्यांच्या स्वाधीन करण्यात येईल. ते त्याला देहांतशिक्षा ठरवतील आणि परराष्ट्रीयांच्या स्वाधीन करितील. ते त्याची थट्टा करतील, त्याच्यावर थुंकतील, त्याला फटके मारतील व त्याचा जीव घेतील.. ....'' (मार्क १०:३३,३४).*

आणि अगदी तसेच घडले! नंतर ज्या लोकांनी ते सर्व प्रत्यक्ष पाहिले त्यासंबंधी मार्क आपल्या शुभवर्तमानात म्हणतो, *''त्यांनी त्याच्या मस्तकावर वेताने मारिले, ते त्याच्यावर थुंकले आणि गुडघे टेकून त्यांनी त्याला नमन केले. अशी त्याची थट्टा केल्यावर त्यांनी त्याच्या अंगावर जांभळे वस्त्र टाकून त्याचे स्वतःचे कपडे त्याला पुन्हा*

*घातले आणि वधस्तंभावर खिळण्याकरिता ते त्याला बाहेर घेऊन गेले" (मार्क १५:१९,२०).*

ज्या चाबकाने येशूचे शरीर फोडून काढले त्या चाबकाच्या वाद्यांना लोखंडी खिळे आणि हाडे लावलेली होती. त्या फटक्यांनी त्याची पाठ आणि छाती सोलून निघाली होती. त्याच्या चिंधड्या उडाल्या होत्या. स्तोत्रामध्ये त्यासंबंधी भाकीत केले आहे आणि मसीहा म्हणेल –*"त्यांनी माझे हातपाय विंधिले आहेत, मला आपली सर्व हाडें मोजता येतात, ते मजकडे टक लावून पाहतात" (स्तोत्र २२:१६,१७).* खरोखर सर्वांगी परिपूर्ण असा प्रभु अनंत यातना भोगीत मरणाच्या अधीन झाला. त्याच्या उडालेल्या चिंधड्यांमुळे तो मनुष्यासारखा दिसेना. अगदी विरुप झाला.

यावरून देव तुमच्यावर किती प्रेम करतो याची तुम्हाला कल्पना झाली काय?

**मानसिक दुःख :** आपल्या प्रभु येशूच्या शारीरिक दुःख भोगाची तीव्रता आपल्या कल्पनेपलीकडची आहे. तरीही त्याच्या एकूण दुःखाच्या ती एक लहानसा भाग आहे. त्याच्या मनातील भयंकर दुःखाचा त्याच्या शरीरावरून दिसणारा तो अल्प भाग आहे.

वधस्तंभावर येशूने अनन्वित अशा मानसिक यातना भोगल्या. योहानाने त्या भयानक घटनेची नोंद आपल्यासाठी करून ठेवली आहे.

> *'परंतु येशूजवळ आल्यावर तो मरून गेला आहे असे पाहून त्यांनी त्याचे पाय मोडिले नाहीत. तरी शिपायांतील एकाने त्याच्या कुशीत भाला भोसकिला आणि लागलेच रक्त व पाणी बाहेर निघाले" (योहान १९:३३,३४).*

वैद्यकशास्त्रातील तज्ज्ञांच्या मते येशूचा मृत्य हृदय फुटल्यामुळे

झाला हे माझ्या ऐकण्यात आले आहे. त्यामुळे त्याच्या कुशीतून रक्त व पाणी निघाले. काही हृदयविकाराच्या तज्ञांचे म्हणणे आहे की जेव्हा हृदय फुटले तेव्हा त्याच्या भोवती असलेल्या आवरणात रक्त व पाणी साठते. तसे ते येशूच्या हृदयातही घडले. त्यामुळेच जेव्हा शिपायाने येशूच्या कुशीत भाला भोसकला तेव्हा रक्त व पाणी निघाले. येशू ख्रिस्ताच्या मृत्युसंबंधी केलेल्या अनेक अचूक भाकितांप्रमाणेच एकोणसत्तराव्या स्तोत्रात त्याच्या हृदयद्रावक मृत्युसंबंधी सांगितले आहे - *'निंदा होत असल्यामुळे माझे हृदय भग्न झाले आहे, मी अगदी बेजार झालो' आहे' (स्तोत्र ६९:२०).* अत्यंतिक मानसिक दुःखामुळे येशूचे प्रेमळ हृदय अक्षरशः भग्न झाले.

येशूच्या प्रेमळ हृदयात ते भग्न झाल्यामुळे सगळ्या मानवजातीचे दुःख सामावले गेले. त्याच्या निष्कलंक आत्म्यामध्ये - पाप्यापासून अगदी अलिप्त असलेल्या त्याच्या आत्म्यांमध्ये - कल्पनाही करता येणार नाही अशी नरकाची सगळी घाण एकवटली गेली आणि येशूचे हृदय भग्न झाले व तो मरण पावला (इब्री ७:२६).

यावरून, देवाची तुमच्यावर केवढी प्रीती आहे हे तुम्हाला समजले काय?

**आत्मिक दुःख :** अनेक लोक येशूचे शारीरिक व मानसिक दुःख समजू शकतील परंतु येशूचे आत्मिक दुःख समजणे अवघड आहे. येशूचे सर्वात मोठे दुःख म्हणजे पित्याची सार्वकालिक समक्षतता त्याला दुरावली. पवित्र आत्मा व त्याचा संबधं तुटला. हे दुःख त्याच्या सहनशक्ती पलिकडचे होते.

तीन तास सर्वत्र अंधार पसरला - दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत सर्वत्र अंधार पसरला. तेव्हा देव जो पिता व देव जो पवित्र आत्मा

यांनी येशूचा त्याग केला. त्यावेळी येशू - देव जो पुत्र - आरोळी मारून आर्तपणे म्हणाला- *"माझ्या देवा, माझ्या देवा तू माझा त्याग कां केला?" (मत्तय २७:४६).*

त्या भयानक दिवशी देवाचे त्र्यैक्य भंग पावले. अवर्णनीय प्रकाश अंधारला. तुमच्या आणि माझ्या पातकामुळेच ते सार्वकालिक्य त्र्यैक्य भंगले. जेव्हा येशू वधस्तंभावर खिळलेला होता तेव्हा देवाची त्या पापाशी सहभागिता होणे अशक्य होते. येशूचे निष्कलंक शरीर वध स्तंभावर पापमय झाले. कारण *"ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याला त्याने तुमच्या आमच्याकरिता पाप असे केले...." (२ करिंथ ५:२१).*

म्हणून, जेव्हा येशू मरण पावला तेव्हा, जगाच्या भयानक पातकाचा परिणाम म्हणून तीन तास सर्वत्र अंधार पसरला होता.

तेजोमय सूर्य कसा अंधारात दडला
तेजस्वी प्रकाशच बंद पडला
येशू, विश्वाचा निर्माणकर्ता मरण पावला
निर्मितीच्या पापहरणासाठी निर्माता मेला.

एझॅक वॉट्स (१६७४-१७४८).

*'देव प्रकाश आहे आणि त्याच्या ठायी अंधार मुळीच नाही' (१ योहान १:५).* देवाच्या पावित्र्याचा प्रकाश आणि मानवाच्या पापाचा अंधार यांची भागी कधीच होऊ शकत नाही. प्रकाशात झोत पडल्याबरोबर अंधार नाहीसा होतो आणि प्रकाश झोत संपला की पुन्हा अंधार होतो. हरवलेल्या मानवजातीचे पाप येशूने स्वीकारल्यामुळे अंधार पसरला.

देवाच्या प्रितीचा साक्षात प्रकाश जे नाकारतात त्यांना सार्वकालिक अंधारातच राहावे लागेल. मध्यरात्रीहून गडद अंधार, अंधार कोठडीतील एकांताहून भयावह एकांत, काळाहून काळातील असा एकांत म्हणजे तो सार्वकालिक भयावह अंधार, *''न्यायाचा निवाडा हाच आहे की जगात प्रकाश आला आहे आणि मनुष्यांनी प्रकाशापेक्षा अंधाराची आवड धरिली, कारण त्यांची कर्मे दुष्ट होती' (योहान ३:१९).* येशूकडे पाठ करणे म्हणजे अंधार आणि मृत्यु यांना कवटाळणे होय. मृत्यु म्हणजे आत्मिक मृत्यु आणि सार्वकालिक मृत्यु. येशूकडे वळणे म्हणजे जीवनाला - अविनाशी जीवनाला, आत्मिक जीवनाला कवटाळणे होय.

## विजेत्याची आरोळी

त्या तीन तासांच्या उदास अंधारातून एक चांगली घटना. येशू त्रासीकपणे असे म्हणाला नाही - 'आता मी संपलो' तर तो आनंदातिशयाने, त्याचे उद्धारकार्य पूर्ण झाल्यानंतर चित्कारला -''पूर्ण झाले'' हा त्याचा विजयोद्गार आहे. (योहान १९:३०)

**त्याने तुमच्या आणि माझ्या पापाचा मोबदला पूर्णपणे दिला. पूर्ण झाले!**

त्याचे उद्धारकार्य पूर्ण झाले. आता देवपित्याची सहभागिता प्रकाशरुपाने पुन्हा प्रगटली. अंधार सरला. प्रकाश पुन्हा अवारला. अविनाशी सहभागिता पुन्हा सुरू झाली (योहान १७:५). आता आमच्या पापाचा मोबदला आम्ही चुकविण्याची गरज उरली नाही. येशूने सैतानाचा पूर्ण बिमोड केला. सर्परूपी सैतानाचे दात कायचे उखडून काढले. त्याची नांगी मोडली.

## मरणाने मरणाच्या अधिपतीस जिंकले

तुमच्या आणि माझ्या पापाचा मोबदला देण्यासाठीच देवाने मनुष्यरुप धारण केले असे नाही. तर *“....तोहि त्यांच्यासारख्या रक्तमांसाचा झाला यासाठी की मरणावर धनीपणा करणारा म्हणजे सैतान याला आपल्या मरणाने नाहीसे करावे” (इब्री. २:१४).*

दाविदाने गल्याथाच्या तरवारीनेच गल्याथाचा वध केला, तसेच येशूने सैतानाचे शस्त्र म्हणजे मरण वापरून सैतानाचा पराभव केला. येशू हाच सर्व स्त्री पुरुषांचा उद्धारकर्ता आहे. तोच खरा मुक्तिदाता आहे. अनंतकालिक मरणापासून लोकांना मुक्त करणारा येशूच आहे. आत्मिक अंधारातून मनुष्याला मुक्त करणारा तो येशूच आहे. देवाने मनुष्य त्याच्या प्रतिमेत निर्माण केला आणि सैतानाने मनुष्याला आत्मिक बंधनाने जखडून टाकले. तेच बंधन येशूने तोडून टाकले.

येशू आपल्यासारखा रक्तामांसाचा होता तेव्हाच त्याने सैतानाचा पराजय केला. त्याने मृत्युवर मात केली व त्याचे गौरवी पुनरुत्थान झाले. मग त्याचे स्वर्गारोहण झाले. ‘प्रमुख याजक झालेला येशू अग्रगामी असा आपल्याकरिता आत गेला (इब्री ६:२०) प्रमुख मनुष्य - निर्दोष निष्कलंक व निष्पाप - असा स्वर्गात गेला. वध स्तंभावरील मरणाद्वारे येशूने आपल्यासाठी स्वर्गाचे दार उघडले.

चार्लस वेस्लींची पूर्ण खात्री झाली होती की त्यांच्यावर देवाची अतिशय प्रीती होती, आणि म्हणूनच ते म्हणाले, ‘‘आश्चर्यकारक प्रीती, माझ्या देवा तूं माझ्यासाठी मरण पावलास हे कसे शक्य झाले?’’

## आता ख्रिस्त पुन्हा उठला आहे!

*‘‘तरी पण ख्रिस्त महानिद्रा घेतलेल्यातले प्रथम फळ*

*असा मेलेल्यातून उठविला गेला आहे. मनुष्याच्याद्वारे मरण आले म्हणून मनुष्याच्याद्वारे मेलेल्यांचे पुनरुत्थानहि आहे" (१ करिंथ १५:२०-२१).*

डॉ. सॅग्स्टर हे अत्यंत प्रभावी वक्ते होते. आपल्या अत्यंत रसाळ वाणीने ते आपला तारणारा उद्धारक येशू ख्रिस्त याबद्दल बोलत असत. परंतु दुर्दैवाने त्यांना तोंडाचा कर्करोग झाला व मृत्युपूर्वी त्यांना बोलता येईना. मरण्यापूर्वी त्यांनी त्यांच्या मुलीला खुणेने कागद-पेन्सिल आणावयास सांगितले. ईस्टरच्या रविवारी सकाळी त्यांनी त्या कागदावर लिहिले, जीभ नसून 'ख्रिस्त उठला आहे' असे ओरडून सांगण्याची मनात तीव्र इच्छा असणे चांगले, जीभ असता ख्रिस्त पुनरुत्थित झाला आहे अशी ओरडण्याची इच्छा मनात नसणे काय उपयोगाचे !"

अग्रीपा राजासमोर प्रेषित पौल स्वतःचे, त्याच्यावरील आरोपांचे खंडण करण्यासाठी उभा राहिला तेव्हा त्याने सर्वांचे लक्ष येशूच्या भयंकर दुःखसहनाकडे आणि पुनरुत्थानाकडे वेधले. *'त्या अशा ख्रिस्ताने दुःख सोसणारे असावे आणि मेलेल्यातून उठणाऱ्यांपैकी पहिले असून त्यान आमच्या लोकांस व विदेशी लोकांस प्रकाश प्रकट करावा" (प्रे. कृ. २६:२३)*

येशूच्या पुनरुत्थाना अगोदर, काही लोक मरणामधून उठल्याचा उल्लेख नव्या करारात आहे. लाजारस, याईराची कन्या, विधवेचा मुलगा हे मरणातून उठले होते. येशूने त्यांना मरणामधून उठविण्याचा चमत्कार केला तरी नंतर काही दिवसांनी ते पुन्हा मरण पावले. परंतु आपल्या प्रभु येशू ख्रिस्तासंबधीं तसे झाले नाही. तो आजही केवळ दैहिकरित्या जिवंत नाही तर आत्मिकरित्या सार्वकालिकपणे जिवंत आहे. मृत्यूमधून उठणारा तोच एकमेव पहिला आहे!

जीवनाच्या उत्पन्नकर्त्याला कबर कधी कुजू देईल काय? येशू ख्रिस्त हा निर्माणकर्ता देव आहे म्हणूनच त्याने शून्यातून जीवन निर्माण केले. एक पूर्ण मनुष्य म्हणून येशू तारणारा देव आहे व त्याने कबरेवर मात केली व तो जिवंत झाला. जे लोक त्याच्यावर विश्वास ठेवतात त्यांना त्याने स्वर्गाच्या वाटेवर आणले आहे. तो त्यांना अभिवचन देत आहे –

> *“तरी देव दयाधन आहे म्हणून आपण आपल्या अपराधांमुळे मृत झालो असतांहि त्यांने आपल्यावरील स्वतःच्या परमप्रेमामुळे ख्रिस्ताबरोबर आपल्याला जिवंत केले (तुमचे तारण कृपेने झाले आहे), ख्रिस्त येशूमध्ये त्याच्यासह उठविले आणि त्याच्या सह स्वर्गलोकी बसविले” (इफिस २:४-६).*

करिंथ येथील विश्वासणाऱ्यांना लिहिलेल्या पत्रात पौल त्यांना आठवण करून देतो त्यांनी ख्रिस्ताचा स्वीकार केला व त्यामुळे पापाच्या परिणामापासून ते मुक्त झाले. त्यांच्या विश्वासाने ते तारले गेले *‘ध र्मशास्त्राप्रमाणे ख्रिस्त तुमच्या आमच्या पापांबद्दल मरण पावला तो पुरला गेला, धर्मशास्त्राप्रमाणे तिसऱ्या दिवशी उठविला गेला’ (१ करिंथ १५:३, ४).* आज प्रत्येक विश्वासणारा त्या वैभवी घटनेची साक्ष देतो – ‘ख्रिस्त माझ्या पापाबद्दल मरण पावला व पुन्हा उठला आणि त्याच्यामध्ये मला नवजीवन मिळाले आहे.’

## पहिल्या दिवसापासून तिसऱ्या दिवसापर्यंत

‘येशू ख्रिस्त मरण पावला आणि तिसऱ्या दिवशी पुन्हा उठला. मग इतके दिवस तो काय करीत होता?’ यासंबंधी तुम्ही आश्चर्य करीत असाल. परंतु देवाने तुमच्या या शंकेचे उत्तर दिले आहे :

*“त्याने आरोहण केले” ह्यावरून तो पृथ्वीच्या अधोलोकी उतरला. ह्यापेक्षा दुसरे काय समजावे? जो खाली उतरला होता त्यानेच सर्वकाही भरून टाकण्याच्या उद्देशाने सर्वोच्च स्वर्गावर आरोहण केले” (इफिस ४:९,१०).*

होय, पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की प्रभु येशू ख्रिस्त स्वर्गात चढून जाण्यापूर्वी अधोलोकात उतरला होता. त्यानंतर, जुन्या करारामधील जे संत होते (व जे विश्वासात मेले होते) त्यांना त्याने मोठ्या विजयाने स्वतःबरोबर नेले. आज देखील प्रत्येक खऱ्या विश्वासणाऱ्याला सुखद आश्वासन देण्यात आले आहे की त्यांचा मृत्यु म्हणजे गौरवाकडे जाण्याचे द्वार आहे. येशू ख्रिस्ताने आपल्या वतीने शारीरिक आणि आत्मिक मृत्युवर मात केली आहे हे खरेच नवल आहे.

*‘अरे मरणा, तुझा विजय कोठे? अरे मरणा तुझी नांगी कोठे? मरणाची नांगी पाप, आणि पापाचे बळ नियमशास्त्र आहे. परंतु जो देव आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्याद्वारे आपणाला जय देतो त्याची स्तुति असो”*

*(१ करिंथ १५:५५-५७).*

## पुरवणी - त्याच्या प्रीतीचा वारसाहक्क

प्रभु येशू ख्रिस्ताने आपल्यासाठी स्वर्गाचे द्वार उघडले आणि त्याच्यासह आपण स्वर्गात जाणार हे खरेच आश्चर्यकारक आहे.

येशूने त्याच्या मृत्यूपूर्वी आपल्यावरील प्रेमास्तव त्याने आपल्यासाठी पवित्र आत्मा पाठवून देण्यासंबंधी आश्वासन दिले. तो आपल्या शिष्यांना म्हणाला :

*"जो माझ्यावर विश्वास ठेवितो त्याच्यातून, शास्त्रात सांगितल्याप्रमाणे जिवंत पाण्याच्या नद्या वाहतील. ज्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला त्यांना जो आत्मा मिळणार होता, त्याच्याविषयी त्याने हे म्हटले, तोपर्यंत आत्मा दिलेला नव्हता कारण येशूचा तोपर्यंत गौरव झाला नव्हता. " (योहान ७:३८-३९)*

*'परंतु ज्याने मला पाठविले त्याच्याकडे मी आता जातो. ...मी पित्याला विनंती करीन मग तो तुम्हाला दुसरा कैवारी म्हणजे सत्याचा आत्मा देईल....मी जावे हे तुमच्या हिताचे आहे, कारण मी न गेलो तर कैवारी तुमच्याकडे येणारच नाही, मी गेलो तर त्याला तुमच्याकडे पाठवीन ... तो माझे गौरव करील" (योहान १६:५; १४:१६, १७; १६:७,१४).*

आपल्या पुत्राच्या मरणामध्ये देवपित्याचे गौरव कसे झाले हे आपण अगोदर पाहिलेच आहे. आता तुम्ही आणखी एक प्रश्न विचाराल : 'तुमच्या-माझ्याकडे पवित्र आत्मा पाठविल्यामुळे येशूचे गौरव कसे होईल?"

देवाची प्रीती प्रत्येक विश्वासणाऱ्याच्या जीवनात सतत वाहात राहाते. यावरून काही अंशी तरी आपल्याला समजेल की त्यामुळे येशूचे गौरव होत आहे. आपण वाचतो की, *".....आपल्याला दिलेल्या पवित्र आत्म्याच्याद्वारे आपल्या अंतःकरणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव झाला आहे" (रोम ५:५).* पवित्र आत्म्यामुळे देवाच्या प्रीतीचा साक्षात्कार आम्हाला फार मोठ्या प्रमाणात होत असतो. येशूने वध स्तंभावर पूर्ण केलेल्या कार्यावर आपण विश्वास ठेवतो आणि पवित्र

आत्म्याद्वारे तुम्ही इतर लोकांवर प्रीती कराल व त्यांच्यापर्यंत ख्रिस्ताचीच प्रीती पोहंचेल! आश्चर्यच आहे ना!

येशू तुमच्या पापाबद्दल मरण पावला हे जाणून त्याबद्दल त्याचे आभार मानणे म्हणजेच देवाने तुमच्या पातकांची क्षमा केली व तुम्हावर प्रीती केली याचा सुखद अनुभव घेणे होय.

मग येशूला तुमच्या जीवनात योग्य ते स्थान देणे म्हणजेच तुम्ही त्याची प्रीती अभावी लोकांपर्यत पोहंचविण्याचे उत्तम साधन बनणे.

एका अतिशय हुशार जर्मन तत्वज्ञानाला एक प्रश्न विचारण्यात आला. 'देवाविषयी तुमचे नेमके काय मत आहे?' त्याने लहान मुलांच्या गीतातील ओळी उत्तरादाखल देत म्हटले,

''येशुची प्रीती पतीतावरी
शास्त्रात वर्णिली पाहा खरी''

**खरेच देव माझ्यावर प्रीती करतो. तो तुमच्यावर सुद्धा फार प्रीती करतो.**

प्रेमापोटी तारणाची योजना आखण्यात आली.
कृपेनेच तारण मानवात अवतरले
कालवरीवर देवाने महान दृश्य पाहिले!
कृपा आणि दया यांचा ओघ वाहिला
पातकांची माझ्या किती क्षमा झाली
खचलेले माझे मन प्रफुल झाले
कालवरीवर माझ्या जीवाला स्वांतत्र्य व जीवन मिळाले.

## इराकमधून आलेले एक पत्र

‘‘मी एका मुस्लीम कुटुंबात होते. दुवा करणे व रोजे ठेवणे मला माझ्या घरातील लोकांनी शिकविले. मुस्लीम पद्धतीप्रमाणे मी बुरखा पांघरत असे कारण माझ्याकडे पाहून कोणाच्या मनात पाप उद्‌भवू नये.

त्यामुळे माझा सगळा वेळ रिकामाच जात असे. म्हणून मी रेडीओवरील कार्यक्रम ऐकू लागले. मला पवित्र शास्त्रावर अनेक संदेश ऐकावयास मिळाले. एकदा माझ्या वहिनीजवळ मी खूप सुंदर सुंदर स्टिकर्स बघितले. मग मी माझे पहिले पत्र तुम्हाला पाठविले ते माझ्या वहिणीच्या पत्यावरून. मग तुम्ही मला उत्तर पाठविले व त्यासोबत ‘तुमचा देवाचा शोध’ हे पुस्तकही पाठविले.

देवाचा शोध म्हणजे काय हे मी समजण्याचा प्रयत्न केला ७ व्या प्रकरणात एक प्रश्न आहे : ‘खरोखर देव मजवर प्रीती करतो का?’ एक परिच्छेद वाचून मी थोडावेळ थांबले. त्यात लिहिले आहेः ‘देवाने तुझ्यावर किती प्रीती केली हे त्याने त्या क्रूसावर दाखवून दिले. क्रूसाचा अर्थ तुला उमगला म्हणजे देव तुझ्यावर खरेच प्रेम करतो याबद्दल कुठल्या पुराव्याची गरज नाही.’’

हे प्रकरण मी १०० हून अधिक वेळा वाचले. मग माझी पूर्ण खात्री झाली की क्रूसाशिवाय मला दुसरा मार्गच नाही.

ट्रान्स वर्ल्ड रेडिओवरून प्रसृत.

## विचार करा

१. तुम्ही दुसऱ्यांवर प्रीती करता हे सिद्ध करण्याचा उत्तम मार्ग कोणता?

मुखाद्वारे?

कृतीद्वारे?

२. देवाने तुम्हावरील प्रीती कशी सिद्ध केली?

३. देवाच्या प्रीतीला तुम्ही व्यक्तिशः कसा प्रतिसाद द्याल?

*ऑपरेशनच्या खोलीमध्ये, सर्व इलेक्ट्रॉनिक वातावरणात शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरला एक गोष्ट समजते 'रक्त म्हणजे जीवन'. ते एकमेकांपासून अलग करता येत नाही. त्यातील एक जरी संपले तरी दोन्ही संपूनच जातात.*

डॉ.पॉल ब्रँड

# प्रकरण ८

# मला जीवन कोठे लाभेल?

मध्यरात्र झाली होती. अठरा तासांचा तापदायक रेल्वेचा प्रवास करून आम्ही म्हणजे मी, माझी पत्नी आणि इतर प्रवासी आता पॅरीसमधील सेंट लाझार या रेल्वे स्थानकावर पोहंचलो. रेल्वे स्टेशनवर आम्ही रेल्वे अधिकाऱ्याची वाट पाहात थांबलो. तो आला की आमची तिकीटे तपासून आम्हाला पुढील प्रवासासाठी जाऊ देणार होता.

आमच्या आसपास अनेक तरुण होते. मी आणि डॉरथी त्यांच्यात मिसळलो तेव्हा आम्हाला असे वाटले की युरोपमधील प्रत्येक देश त्या तरुणांद्वारे प्रतिनिधित्व करीत होता. काही तरुण तरुणी डुलकी घेत होते. डोक्याखाली त्यांनी उशी म्हणून त्यांच्या पिशव्या घेतल्या होत्या. काहीजण त्यांचे रक्षण करण्यासाठी त्यांच्या बाजूला उभे होते. उभ्या उभ्याच ते शीतपेये पीत होते. काहीजण सँडवीच खात होते.

या तरुणांबरोबर आमचा हास्यविनोद चालला हेता. ते तरुण अगदी उत्साही होते. तरी त्यांना जीवनाची नेमकी दिशा सापडली नव्हती. तिचा शोध ते करीत होते. सरते शेवटी मी आणि डॉरथीबरोबर प्रवास करीत असलेल्या आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताकडे आम्ही वळलो व त्याच्यासंबंधी बोलू लागलो.

आमचे बोलणे चालू असताना काही तरुणांनी येशूकडे वळण्याची व खरे जीवन प्राप्त करून घेण्याची इच्छा प्रदर्शित केली. त्यांना वाटले

की ते ‘खरे’ जीवन पुढच्या शहरात मिळेल. काहींना वाटले की नवे मित्र मिळाले की ते ‘खरे’ जीवन त्यांना मिळेल. तर काहींना वाटले की मद्य आणि मादक द्रव्ये मिळाले की ‘खरे’ जीवन मिळेल. काहींना त्यातून उद्भवणाऱ्या गंभीर आजाराची चिंता होती.

आफ्रिकेतील खेड्यांमध्ये ते अशा आजाराला ‘हडकुळ्या माणसाचा आजार’ म्हणतात. वैद्यकशास्त्रात त्याला एच्‌आयव्ही पॉझीटीव म्हणतात. एखाद्या मुलात, मुलीत किंवा प्रौढात त्याचा प्रादुर्भाव झाला म्हणजे त्याला ‘एड्स’ म्हणतात. त्या आजाराची चाहूल लागणे म्हणजे मृत्यूच! जगामध ये सर्व लोकांना ठाऊक आहे की रक्त दुषित झाले म्हणजे एड्स होतो. वास्तविक रक्त म्हणजे जीवन. पण जेव्हा ते दुषित होते तेव्हा जीवन संपते व मृत्यु झडप घालतो. रक्त हे जीवनाचा प्रवाह आहे. पण रक्तदोषाचे कण्हणे म्हणजे मृत्युला आमंत्रणच.

यासंबंधी माझ्याही मनाच भीति होती. म्हणूनच लंडनमधील एका दवाखान्यात एक मोठी शस्त्रक्रिया पाहण्याचे निमंत्रण मी धैर्याने स्वीकारले. तेथील गॅलरीत उभे राहून मी खाली पाहात होतो. शस्त्रक्रिया सुरू झाली. जेव्हा सुरीने त्या रुग्णाच्या कातडीवर छेद घेतला तेव्हा तर मला भोवळच आली. शेजारीच माझा एक डॉक्टर मित्र उभा होता. घामाने डबडबलेली आणि भितीने गांगरलेली माझी अवस्था पाहून त्याने मला म्हटले की मला जर ते असह्य होत असेल तर मी ते पाहू नये व दूर जावे. क्षणाचाही विलंब न लावता मी तेथून सटकलो!

रक्त पाहून काही जण घाबरतात. पण हेच रक्त रुग्णांसाठी जीवनदान ठरते. त्यांना रक्तपुरवठा करण्यात येतो. आज वैद्यकशास्त्र खूप प्रगत झाले आहे. गंभीर आजाराने ग्रस्त रुग्णाला किंवा मृत्युच्या पंथास लागलेल्या मनुष्याला, निरोगी मनुष्याच्या शरीरातील रक्त दिले

जाते व तो रोगी बरा होतो. जीवनाचा प्रवाह रक्तपुरवठ्यामुळे पुन्हा सुरू होतो.

रक्तासंबंधीचे संशोधन होण्यापूर्वी व त्यामागील गूढ उकलण्यापूर्वीच देवाने फार पूर्वीच सांगितले *"जीवन तर रक्तात असते" (लेवीय १७:११)*. डॉ. पॉल ब्रँड म्हणतात की "जीवनाचे सत्व म्हणजे रक्त. ' ऑपरेशनच्या खोलीमध्ये, सर्व इलेक्ट्रॉनिक्स वातावरणामध्ये शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरला एक गोष्ट समजते की रक्त म्हणजे जीवन. ते एकमेकांपासून अलग करता येत नाही. त्यातील एक जरी संपले तरी दोन्ही संपूनच जातात."

एचआयव्हीचा संसर्ग संपर्काद्वारे होतो व रक्त दुषित होते हे जरी अनेकांना माहीत असले तरी एक जगद्व्यापी 'आजारा' बद्दल अनेकजण अजाण आहेत. देवाने "एकापासून (एकच रक्तापासून) माणसांची सर्व राष्ट्रे निर्माण करून...आणि त्यांचे नेमलेले समय व त्यांच्या वस्तीच्या सीमा त्याने ठरविल्या आहेत" (प्रे.कृ.१७:२६). ह्या अघोरी अशा रक्तदोषामुळे सर्व मनुष्यजात धोक्यात आली. पवित्र शास्त्रामध्ये या दोषाचे मूळ आदामामध्ये आहे असे दाखवले आहे. आदामच सर्व मनुष्यांचा मूळ पुरुष आहे.

मूळ पुरुषच आदाम याने पाप केले (१ करिंथ १५:४५) आणि त्यामुळे मनुष्याच्या पुढील सर्व पिढ्या, मग त्या कोणत्याही वंशाच्या, रंगाच्या वा ठिकाणाच्या असोत, सर्वच मृत्युदंडास पात्र ठरल्या. पवित्र शास्त्र स्पष्टपणे म्हणते, "आदामात सर्व मरतात" (१ करिंथ १५:२२). रक्तदोषामुळे एड्स सारखा मृत्युप्रद नेणारा रोग जडतो. तसेच पापाचा अत्यंत भीषण परिणाम म्हणून मृत्यु हा पिढ्यान् पिढ्या चालू आहे. जर पापच नसते तर सर्व मनुष्ये थेट स्वर्गात गेले असते. आजार व मृत्यु यांचे थैमान त्यांच्या जीवनात आलेच नसते. परंतु तसे काही घडले नाही.

परंतु येशूद्वारे, मनुष्यमात्रामध्ये जीवनाचा, रक्ताचा झरा सुरू झाला याबद्दल आपण देवाचे आभार मानले पाहिजेत. हे सगळे असे घडले. गॅब्रीएल देवदूताने मरीयेला दर्शन दिले व तिला सांगितले की ती गरोदर होईल पुत्र प्रसवेल आणि त्याचे नाव येशू हे असेल. कुमारी मरीयेच्या उदरी हा गर्भ कसा राहील हे ही देवदूताने सांगितले,

> *"पवित्र आत्मा तुझ्यावर येईल आणि परात्पराचे सामर्थ्य तुझ्यावर छाया करील, ह्या कारणाने ज्याचा जन्म होईल, त्याला पवित्र, देवाचा पुत्र असे म्हणतील" (लूक १:३५).*

जेव्हा पवित्र आत्म्याचे बीज व एका स्त्रीचे बीज यांचा संयोग झाला तेव्हा चमत्कार घडला. अशा आश्चर्यकारक रीतीने देवाचे जीवन मानवांमध्ये अवतीर्ण झाले. मरीयेच्या उदरात तो गर्भ वाढत गेला, त्या गर्भात रक्तभिसरण चालू झाले तेव्हा ते रक्त अत्यंत शुद्ध व निर्दोष असे होते. होय, प्रभु येशूचे रक्त म्हणजे साक्षात जीवनच!*

---

* डॉ. एम.आर.डी. हान यांनी त्यांच्या 'रक्ताचे रसायनशास्त्र' (द केमिस्ट्री ऑफ ब्लड) या पुस्तकात रक्ताच्या विविध कार्यासंबंधी लिहिले आहे. ते म्हणतात, "आईच्या गर्भाशयात अत्यंत गुप्तपणे गर्भाची वाढ तिच्या रक्तपुरवठ्यामुळे होत असते. परंतु गर्भामध्ये निर्माण होत असलेले रक्त मात्र तो गर्भच निर्माण करीत असतो. गर्भधारणेपासून ते गर्भवृद्धी होते तोवर आईच्या रक्ताचा एक थेंबही त्या गर्भात जात नसतो." यासंबधी डॉ. कोलमन त्यांच्या "रक्तात लिहिले" (रिटन इन ब्लड) या पुस्तकात म्हणतात, "त्यांचे (डॉ. डीहानचे) म्हणणे मी नाकारत नाही. (डॉ. डीहानचे म्हणणे असे की मानवी गर्भातील रक्त हे तो गर्भच निर्माण करीत असतो). इतर तज्ञ डॉक्टरांनी त्या म्हणण्यामागील सत्य शोधले पाहिजे. जीवशास्त्रातील संकल्पनेनुसार या बाबीचा बाऊ करू नये. मग देवाद्वारे येशूची गर्भधारणा झाली ह्या घटनेत, येशूचे रक्ताचे महत्व लक्षात घेता, मानवामध्ये वंशपरंपरेने पाप कसे प्रसूत होत गेले याला अर्थच राहणार नाही."

मानवी रक्त हे अत्यत गुंतागुंतीचे द्रव्य आहे. आजही अनेक शास्त्रज्ञ रक्ताच्या ह्या गुंतागुतीच्या संशोधनामध्ये व्यस्त आहेत. जीवन देणाऱ्या या मानवी रक्ताची काही वैशिष्ट्ये अशी आहेत. ते शरीरातील दुषित पदार्थाचा निचरा करते, ते शरीर जिवंत ठेवते आणि ते जंतु आणि आजार यांना दूर ठेवते. हे खरेच नवलपूर्ण आहे. तरीही देवाने आपल्यासाठी असे 'रक्त' सिद्ध केले आहे की त्याचा परिणाम अधिक आश्चर्यकारक आहे. आणि तो रक्ताचा झरा अखंड वाहात आहे. ज्यांना खरे जीवन हवे आहे त्यांच्यासाठी हे रक्त उपलब्ध आहे. येशूचे रक्त म्हणजे मनुष्याचे पापविमोचन करणारे देवाचे उत्तम रसायन आहे. आत्मिकदृष्ट्या मृत लोकांमध्ये जीवनाचा ओघ पुन्हा सुरू करण्याचे सामर्थ्य येशूच्या रक्तात आहे. आत्मिकदृष्ट्या जिवंत असलेल्या लोकांचे हे रक्त सैतानाच्या प्रत्येक हल्ल्यापासून संरक्षण करते. या अद्‌भुत रक्तासंबंधी आपण वाचतो. *''वाडवडिलांच्या परंपरेने चालत आलेल्या तुमच्या निरर्थक वागणुकीपासून सोने रुपे अशा नाशवंत वस्तूंनी नव्हे तर निष्कलंक व निर्दोष कोकरा असा जो ख्रिस्त त्याच्या मूल्यवान रक्ताने तुम्ही मुक्त झाला आहा' (१ पेत्र १:१८,१९).*

## रक्त : शुद्धिकरणाचे सामर्थ्य

काही दिवसांपूर्वी एका कंपनीने आरोग्याचे नियम धाब्यावर बसवून एक करार केला अशी एक बातमी प्रस्तृत झाली होती. पैशाच्या लोभापायी त्या कंपनीने अँकरमध्ये काही अपायकारक द्रव्य वाहून नेले होते आणि त्याच अँकरमध्ये नंतर येताना खाद्यतेल वाहून नेले त्यामुळे अनेक लोक गंभीररित्या आजारी झाले.

देवाने मनुष्याचे शरीर फार आश्चर्यकारक असे तयार केले आहे. शरीरात पेशींपर्यंत अन्नपुरवठा केला जातो व अपायकारक

पदार्थ उत्सर्जित केले जातात आणि ही कार्ये शरीरात पेशींच्याद्वारे केली जातात. परंतु देवाची अचूक शरीरनिर्मिती अन्न व उत्सर्जित द्रव्ये यांची भेसळ होऊ देत नाही. रक्ताद्वारे अन्नपुरवठा होतो तसेच रक्ताद्वारे उत्सर्जनही होते. प्रत्येक पेशी इतकी लहान असते की शरीरातील, केशवाहिनीतून ती रक्तप्रवाहाबरोबर प्रवास करू शकते. जर त्या पेशींद्वारे उत्सर्जनाचे कार्य होऊ शकले नाही तर शरीरात रोग पसरेल, मृत्यु ओढवेल.

देवाने आपणातून पापाचे उत्सर्जन कसे केले जाते हे स्पष्ट केले आहे. पापाचे आपल्या जीवनातील उत्सर्जन येशूच्या रक्ताद्वारे होतेः *“पण जसा तो प्रकाशात आहे तसे आपण प्रकाशात चालत असलो, तर आपली एकमेकांबरोबर सहभागिता आहे आणि त्याचा पुत्र येशू ह्याचे रक्त आपल्याला सर्व पापांपासून शुद्ध करिते” (१ योहान १:७).* आपल्या पापांची क्षमा व्हावी यासाठी याहून दुसरा मार्गच नाही असे देवाने स्पष्ट केले आहे : *“रक्त ओतल्यावाचून पापक्षमा होत नाही” (इब्री ९:२२).*

## रक्त : त्याचे जीवनदायी सामर्थ्य

शरीराचे कार्य सुरळीतपणे चालावे यासाठी शरीरातील प्रत्येक पेशीला अन्नाचा व पाण्याचा पुरवठा करणे हे रक्ताचे आणखी एक महत्वाचे कार्य आहे. जर रक्ताद्वारे शरीरातील पेशींना आणि स्नायुंना असा पुरवठा होऊ शकला नाही तर त्या पेशी व स्नायु मृत होतात. रक्तप्रवाह शरीरात होणे थांबले की शरीर मृत होते. त्यामुळे रक्तामध येच जीवन आहे.

म्हणून येशूने जेव्हा त्याच्या रक्ताबद्दल शिष्यांना सांगितले तेव्हा त्यांना अचंबा वाटला. तो भर देऊन म्हणाला,

*“मी तुम्हांला खचित खचित सांगतो, तुम्ही मनुष्याच्या*

*पुत्राचा देह खाल्ला नाही व त्याचे रक्त प्याला नाही तर तुम्हांमध्ये जीवन नाही. जो माझा देह खातो व माझे रक्त पितो, त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे आणि मीच त्याला शेवटल्या दिवशी मी उठवीन. कारण माझा देह खरे खाद्य आहे व माझे रक्त खरे पेय आहे'' (योहान ६:५३-५५).*

नंतर येशूने त्याचा खरा अर्थ काय तो सांगितला : 'जो माझा देह खातो व माझे रक्त पितो तो मजमध्ये राहतो व मी त्याच्यामध्ये राहतो. आत्मिक जीवनाच्या स्त्रोताचे हे ज्ञान किती सुंदर आहे, आनंददायक आहे! पातक्यांची त्यांच्या पातकापासून सुटका व्हावी म्हणून येशूचे रक्त सांडण्यात आले. त्याने स्वतःचे रक्त आपल्यासाठी सांडले म्हणूनच आपण त्याच्या जीवनाचे भागीदार होऊ शकतो. त्याचे रक्त पिणे म्हणजे काय याचा अर्थ येशूने स्पष्ट केला -'मी त्याच्यामध्ये राहतो'-किती सुंदर!

येशूच्या पुनरुत्थानाच्या सामर्थ्याचा अनुभव ज्या विश्वासणाऱ्यांना आला आहे ते जोमाने आपली साक्ष देतात-''पुनरुत्थित ख्रिस्त मजमध्ये राहतो!' प्रभुभोजन स्वीकारणे म्हणजे तो भाकर व द्राक्षारस यांचे सेवन करणे हे प्रतिकारक असून त्याद्वारे आपण प्रभुचे आभार मानून आपली साक्ष देतो असे विश्वासणाऱ्यांना वाटते.*

जेव्हा विश्वासणाऱ्यांमध्ये पवित्र आत्मा वरून येतो तेव्हा येशूच्या रक्तामधील जीवनदायी सामर्थ्याची त्यांना आश्चर्यकारक रीतीने प्राप्ती होते. प्रत्येक व्यक्ती जेव्हा जीवनाचा शोध घेते तेव्हा तिला जीवन प्रदान करणाऱ्या 'रक्ताची' गरज असते.

---

* दुर्दैवाने बऱ्याच लोकांचा असा गैरसमज आहे की भाकर व द्राक्षरसाचे सेवन केल्याने ख्रिस्ताचे शरीर व रक्त त्यांना प्राप्त होते.

## रक्त : त्याचे संरक्षक सामर्थ्य

मानवी रक्त आणखी एक चमत्कारिक असे कार्य करीत असते. ते रक्त केवळ शुद्धिकारक आणि जीवनदायी नसते तर ते संरक्षकही असते.

जेव्हा भारतामध्ये ब्यूबॉनिक प्लेगची साथ पसरली होती तेव्हा सगळे जग हादरले होते. आंतरराष्ट्रीय उड्डाण करणारी भारतीय विमाने जंतुनाशकांनी स्वच्छ केली जात होती. तसेच त्या विमानातील प्रवाशांनाही वैद्यकीय तपासणीसाठी वेगळ्या ठिकाणी नेले जात होते. असे केले नसते तर रोगप्रसारण सर्वत्र होण्याची भीति होती. यासाठी भारतामधून येणाऱ्या विमानांसाठी वेगळा तळही उभारण्यात आला होता.

ब्युबॉनिक प्लेगच्या संसर्गाची तत्कालीन स्थिती होती; परंतु मानवी शरीरावर अनेक जंतुचा हल्ला सतत होत असतो. परंतु रक्तामध्ये त्या जंतूना परतवून लावण्याचे सामर्थ्य आहे. जीवनाचे रक्षण करणारी प्रतिजैविके रक्तात असतात. त्यामुळे जंतूचा नाश केला जातो. जेव्हा शरीरामध्ये रोगजंतू प्रवेश करतात तेव्हा पांढऱ्या पेशींच्या संख्येत वाढ होऊन त्या रोगजंतुंशी मुकाबला करतात व त्यांचा नाश करतात.

मानवी रक्ताप्रमाणेच प्रभु येशू ख्रिस्ताचे रक्त मानवी जीवनाचे रक्षण करते हे विशेष आहे. सैतानाच्या सततच्या हल्ल्यापासून येशूचे रक्त आपले रक्षण करते. देवाचे लोक आणि सैतान यांच्यामध्ये शेवटल्या दिवसांमध्ये युद्ध चालेल यासंबंधी आपण वाचतोः *"त्याला त्यांनी कोकऱ्याच्या रक्तामुळे व आपल्या साक्षीच्या वचनामुळे जिंकले आणि त्याच्यांवर मरावयाची पाळी आली तरी त्यांनी आपल्या जिवावर प्रीति केली नाही" (प्रकटी १२:११).* येशूच्या मोलवान रक्ताद्वारे तुम्ही सैतानाचा हल्ला परतवून लावू शकता.

सैतानाने जेव्हा आदाम आणि हवेला मोहात पाडले त्याचवेळी येशू सैतानावर विजय मिळवील ही भविष्यवाणी झाली होती. देवाने म्हटले की स्त्रीची संतती सैतानाचा नाश करील. *"आणि तू व स्त्री, तुझी संतति व तिची संतती यात मी परस्पर वैर स्थापीन, ती तुझे डोके फोडील" (उत्पत्ती ३:१५).* परंतु त्यापूर्वी सैतान येशूची मसीहाची टाच फोडील. स्त्रीची संतती म्हणजेच स्वतः प्रभु येशू ख्रिस्त, त्याने स्वतःचे रक्त, मोलवान रक्त सांडू दिले, '

*'हेतु हा की मरणावर सत्ता गाजविणारा म्हणजे सैतान ह्याला मरणाने शून्यवत करावे" (इब्री २:१४).*

पॅरीसमधील सेंट लाझार स्टेशनवर आम्हाला भेटलेल्या त्या तरुणांप्रमाणे अनेकजणांना खऱ्या जीवनाचा शोध लागला आहे.

युगांडामध्ये अनेक लोक मला व डॉरथीला भेटले आणि त्यांची खात्री पटली होती की त्यांना खरे जीवन प्राप्त झाले आहे. प्रभु येशू ख्रिस्ताच्या रक्तामध्ये त्यांना मनाचे शुद्धिकरण करणारे, जीवनदायक आणि सैतानाशी यशस्वी झुंज देण्याचे सामर्थ प्राप्त झाले. तशी त्यांची प्रामाणिक साक्ष होती व त्यांच्याबाबत *'जुने ते होऊन गेले व सर्व काही नवे झाले'* असेच घडले होते.

केनियामधील वकालतीने आम्हास धोक्याचा इशारा दिला होता की आम्ही युगांडाकडे जाऊ नये. परंतु मी व डॉरथी, देवाच्या आत्म्याच्या प्रेरणेमुळे युगांडास गेलोच. युगांडामधील पाळक वर्ग व त्यांच्या पत्नींबरोबर देवाने आमची भेट आधीच ठरवून ठेवली होती. आमच्या परतीच्या प्रवासाचीही व्यवस्था देवाने अगोदरच केली होती. (लष्करी उठाव होण्यापूर्वीचे आमचेच विमान ऐंटीबीवरून उड्डाण करणारे अखेरचे ठरले).

आम्ही जेव्हा विमानतळावर उतरलो तेव्हा तेथे भितीचे वातावरण होते. तेथील सावळा गोंधळ आणि अस्वच्छतेचे वर्णनच करता येणार

नाही. आम्हाला विमानतळावरून घेऊन जाण्यासाठी एक मोटार तयार ठेवली होती. बॉम्बमुळे रस्त्यात जागोजागी खड्डे पडले होते. आम्ही थोडे पुढे गेलो, तो शिपायांनी आमच्यावर बंदुका रोखल्या. ते शिपाई त्या सरकारचे होते किंवा सरकारविरोधी होते की शिपायाच्या गणवेशातील ते गुंड होते हे आम्हाला माहीत नव्हते. परंतु त्यांनी आमच्या ड्रायव्हरला ओळखले. तो त्यांच्या गटातलाच होता. त्यामुळे आम्हाला त्यांनी सुखरूपपणे पुढे जाऊ दिले.

आम्ही आमच्या ठिकाणावर पोहोचलो. पण ती जागा अस्वच्छ, अंधारी आणि भयप्रद अशी होती. तेथे जमलेले लोक भेदरलेले होते. परंतु जेव्हा सर्व पाळक व त्यांच्या बायका तेथे आल्या तेव्हा आम्हाला तेथील तणावपूर्ण वातावरणाचा विसर पडला. प्रभु येशू ख्रिस्ताची कृ पा आणि त्याचे गौरव तेथे हजर झाले. युगांडामधील सभा आमच्या सदैव स्मरणात राहतील जणू काय डोंगरमाथ्यावर आमची व देव बापाचीच भेट झाली होती.

सर्व पाळक व त्यांच्या बायका मोडक्या-तोडक्या बाकावर आठ तास बसून पवित्र शास्त्रातील सत्ये अगदी लक्षपूर्वक ऐकत होते. मी जेव्हा बोलत होतो तेव्हा माझी पत्नी फळ्यावर मुद्दे लिहीत होती; त्यामुळे ऐकणाऱ्यांची काही नोंदी करण्यात मदत होत होती. तेवढ्यात दरवाजावर कसलाच गोंधळ सुरू झाला. दारू पिऊन तर्र झालेल्या एका बंदुकधारी माणसाला दरवाजावर रोखले होते. त्याचा दुसरा एक बंदुकधारी साथीदार गर्दीतून पुढे घुसला व डॉरथीच्या छातीवर त्याने नेम धरला.

‘‘हा मनुष्य येशूकडे वळावा यासाठी आपण प्रार्थना करू या’’ शांतपणे डॉरथी म्हणाली.

काही क्षण, जे मला त्यावेळी युगायुगासारखे वाटले, लोटल्यानंतर माझा भाषांतरकर्ता मजकडे वळून मोठ्या आश्चर्याने मला म्हणाला, ‘‘तो

शिपाई जे काही आता म्हणाला त्यावर माझा विश्वासच बसत नाही–तो म्हणाला ''या बाईच्या देवाशी माझी ओळख झालीच पाहिजे''.

त्या भाषांतरकर्त्याचे बोलणे ऐकल्यानंतर जे दृश्य मी पाहिले ते मी कधीच विसरणार नाही. त्यामागे काहीही कारण असू दे, मग कदाचित एका देवदूताने त्या बंदूकधाऱ्याला अडविले असेल, किंवा देवाच्या अतिपवित्रतेचा धाक त्या शिपायाला त्याक्षणी वाटला असेल किंवा त्या शिपायाची त्यावेळी आंतरिक कळकळ असेल.....मला काही सांगता येत नाही. पण त्या क्षणी जे घडले ते म्हणजे त्याची बंदूक खाली गळून पडली आणि तो शिपाई गुडघे टेकून बसला!

सभा संपल्यानंतर विश्वासणाऱ्यांना विचारपूर्वक समोर बोलावले जाते. पण हा तसा प्रकार नव्हता. डॉरथीला त्याची पूर्ण जाणीव होती. ती त्या गुडघे टेकलेल्या शिपायाला म्हणाली ''माझ्यामागे ही प्रार्थना म्हण.'' मग शांतपणे तिने त्या गरजू शिपायाच्या आत्म्याला क्रूसाच्या पायथ्याजवळ आणले. पापीजनाचा तारणारा ख्रिस्त त्याला दिसला. जीवनाचा उगम ख्रिस्ताच्या रक्ताद्वारे त्याला सापडला.

मी हा अनुभव आता तुम्हाला का सांगत आहे? कारण त्या संस्मरणीय सभेनंतर काय घडले हे तुम्हाला समजावे म्हणून.

त्या सभेमध्ये अनेक लोक हजर होते. त्यांची मने भीतीने धास्तावलेली होती. त्या बंदुकधाऱ्याने जेव्हा बळजबरीने सभेमध्ये प्रवेश केला तेव्हा त्याच्याबद्दल सर्वांना घृणा वाटली. काही दिवसापूर्वी ज्यांच्या जिवावर बेतले होते असे काही लोक त्या सभेत हजर होते. त्यामध्ये एक पाळक होते. त्यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला होता पण त्यातून ते वाचले होते आणि त्या हल्ल्यात त्यांची बोटे कापल्या गेली होती. परंतु येशूवरील प्रीतीस्तव ते पुन्हा एकत्र आले होते. ख्रिस्ताकडे वळलेल्या त्या नवीन बंधुसाठी प्रेमाने प्रार्थना करण्यास ते सरसावले होते.

कुठल्याही वाद्यांची साथ नसताना, त्यांनी अतिशय उत्साहाने व जोमाने गीते गाईली. त्या गीतातील शब्दांनी आज देखील माझे हृदय भरून येतेः

आहा! येशूचे रक्त
आहा! येशूचे रक्त
आहा! येशूचे रक्त
पापापासून शुद्ध मज करी

जगातील सर्व पुढारी त्यावेळी आमच्याबरोबर हजर असते तर त्यांना सर्व समस्यांवर देवाचे काय उत्तर असते हे समजले असते.

*“आणि त्याच्या वधस्तंभावरील रक्ताच्याद्वारे शांती करून. ...त्याचा स्वतः बरोबर त्याच्याद्वारे समेट करावे हे पित्याला बरे वाटले” (कलस्सै १:२०)..“जे तुम्ही पूर्वी परके व दुष्कर्मे करीत मनाने वैरी झाला होता.....समेट केला आहे” (कलस्सै १:२१).*

ज्यांचा खरेच देवाबरोबर नीट संबंध जुळला आहे त्यांच्यासाठी म्हणजे - *“त्याच्या रक्ताने नीतिमान ठरविण्यात आल्यामुळे.... देवाच्या क्रोधापासून तारले जाणार आहो. पुत्राच्या मृत्यूद्वारे आपला समेट झाला....विशेषेकरून तारले जाणार आहो” (रोम ५:९-१०).*

## विचार करा

१. तुम्ही खरोखर जीवनाची इच्छा करता काय? ह्या जीवनाचे प्रभु येशूने वर्णन केले आहे "मी तर त्यांना जीवनप्राप्ती व्हावी व ती विपुलपणे व्हावी म्हणून आलो आहे" (योहान १०:१०)

२. पवित्र शास्त्रानुसार, मानवी शरीरात जीवन कोठे सापडते? (लेवीय १७:११ वाचा)

३. प्रभु येशूच्या मोलवान रक्ताचे सार्वकालिक महत्व कोणते? त्याच्या शुद्धीकारक सामर्थ्यावर तुम्ही विश्वास ठेवता?
जीवनदायी सामर्थ्यावर विश्वास ठेवता?
संरक्षक सामर्थ्यावर तुम्ही विश्वास ठेवता?
प्रभु येशूने म्हटले, "पुनरुत्थान व जीवन मीच आहे, जो माझ्यावर विश्वास ठेवितो तो मेला असला तरी जगेल आणि जिवंत असलेला प्रत्येक जण जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो कधीही मरणार नाही" (योहान ११:२५,२६).

*चित्रकाराच्या कलेची पूर्णता, मानवी चेहऱ्यावरील तेज, निसर्ग चित्रातील सौंदर्य यापैकी एकही आवाजाच्या माध्यमातून वर्णिता येत नाही. त्यासाठी दृष्टीच हवी.*

## प्रकरण ९

# देवाच्या कुटुंबाचा घटक मी कसा बनेन?

डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसंबंधी १९४० दरम्यान वैद्यक शास्त्रात खूपच सुधारणा झाली. नुकत्याच मरण पावलेल्या व्यक्तीच्या डोळ्याचे रोपण अंधव्यक्तीच्या डोळ्यावर करता आले. डॉ. सॅगस्टरनी केलेल्या पहिल्याच अशा यशस्वी रोपणाबद्दल त्यांनी आम्हाला माहिती दिली.

एका सुंदर सकाळी डॉ. सॅगस्टर इंग्लंड मधील सुरे डॉउन्स येथे दोन व्यक्तींसह पोहंचले. त्यापैकी एक स्त्री जन्मतः आंधळी होती. तर दुसरी व्यक्ती जिने तिच्या डोळ्यावर शस्त्रक्रिया केली ती डॉक्टर होती. त्या स्त्रीच्या डोळ्यावर शस्त्रक्रिया केल्यानंतर पट्टी बांध लेली होती. कारण प्रकाशकिरणामुळे तिला काही त्रास होऊ नये म्हणून तिचे डोळे पट्टीने झाकले होते. हळूहळू ती पट्टी काढण्यात आली. तिला प्रकाशाची जाणीव होऊ लागली व ती अगदी उत्साहीत होऊ लागली. उगवत्या सूर्याची किरणे तिच्या डोळ्यांवर पडण्यापूर्वी तिची पट्टी काढण्यात आली.

क्षितीजावर उगवणारा तो सूर्य त्या सकाळी फारच रमणीय होता. हळूहळू सावल्या पुढे सरकत होत्या. हिरवी पाने कोवळ्या उन्हात चमकत होती. पक्षी हवेत उडत होते. आपले भक्ष पकडीत

होते. ज्या स्त्रीने असे सुंदर दृश्य पूर्वी कधीच पाहिले नव्हते ते आता तिला दिसू लागले. तिच्या गालावरून अश्रू ओघळू लागले. ती म्हणाली, ‘‘तुम्ही मला ह्या सगळ्या सुंदर गोष्टींचे वर्णन केले होते; परंतु त्या इतक्या सुंदर असतील याची मला मुळीच कल्पना नव्हती!’’ देवाने निर्माण केलेल्या सुंदर निसर्गाचे निरीक्षण करीत ती किती तरी वेळ शांत बसून राहिली.

ज्या व्यक्तीने प्रकाश कधी पाहिलाच नाही त्याला तुम्ही लाल रंग कसा असतो हे कसे समजावून सांगाल? सूर्यास्ताचा मनोहर देखावा अंधाला कसा समजवाल? ते खरे तर अशक्यच आहे. ज्याला काहीच दिसत नाही त्याला वर्णनात्मक शब्द कानी पडल्यामुळे थोडेफार समजू शकते. परंतु सुंदर चित्र, चेहऱ्यावरील तेज, निसर्ग सौंदर्य अशा गोष्टी केवळ शब्दांद्वारे समजावणे अशक्यच आहे त्यासाठी दृष्टीच हवी.

असाच प्रकार जेव्हा एखादा विश्वासणारा, अविश्वासणाऱ्याला आत्मिक सौंदर्याचे वर्णन करून सांगतो तेव्हा घडत असतो.

लंडनमधील एका वैद्यकीय कॉलेजमधील परिक्षार्थी मुलाला मी देवाच्या प्रीतीमधील महानतेबद्दल सांगत होतो. तो मला म्हणाला, ‘‘पण मला तरी तसे काही दिसत नाही.’’ मला सर्व जाणवले पण तरीही मी पुढे बोलत राहिलो, ‘‘मी म्हणालो ‘डेव्हिड, हे पाहा तुझ्याबद्दल माझ्या मनात शंका नाही. अंधारकोठडीत मनुष्याने राहावे तसेच तुझे झाले आहे. मी स्वतः आत्मिक अंधारात चाचपडत होतो. पण आता मी त्या कोठडीतून बाहेर आलो आहे आणि देवाच्या प्रीतीचा प्रकाश मी पाहू शकतो. देवाची प्रीती कशी आहे हे जर तुला खरेच समजून घ्यावयाचे असेल तर तुला अंधारातून बाहेर आले पाहिजे.’’ त्या दिवशी डेव्हीडने गुडघे टेकून प्रभु येशूजवळ त्याच्या पातकांची क्षमा मागितली व त्याने येशूचा स्वीकार केला. तो आपल्या

गुडघ्यावरून उठला व जे म्हणाला ते मी कधीच विसरू शकत नाही. तो म्हणाला, ‘‘मला वाटले नव्हते की हे एवढे सुखद असते!’’

शारीरिक डोळ्यांनी देवाच्या सुंदर निर्मितीचा सुखद अनुभव घेता येतो आणि आत्मिक डोळ्यांनी मनुष्याला देवबापाची उपस्थिती, त्याचे सामर्थ्य आणि अमाप प्रीती यांचा प्रत्यय येतो.

प्रभु येशूचे स्वर्गारोहण झाल्यानंतर त्याने योहानाद्वारे लावदिकीया येथील मंडळीच्या आत्मिक स्थितीबद्दल कठीण शब्दात बोल लावला. त्या मंडळीतील लोकांसबंधी येशू म्हणाला, *‘‘मी श्रीमंत आहे, मी धन मिळविले आहे व मला काही उणे नाही असे तू म्हणतोस पण तू कष्टी, दीन, दरिद्री, आंधळा व उघडावाघडा आहेस’’ (प्रकटी ३:१७).* एखाद्या अंधळ्या माणसाची स्थिती किती दयनीय असते याची तुम्ही कल्पना करू शकता काय? आत्मिक अंधळेपणाचे निदान केल्यानंतर येशू ख्रिस्ताने त्यावर उपाय सुचविला आहे. *‘‘तुला दृष्टी यावी म्हणून डोळ्यात घालण्यास अंजन विकत घे’’ (प्रकटी ३:१८)* आणि हा उपाय किती महत्वाचा आहे! आत्मिक अंधळेपण घालविण्यासाठी आत्मिक शस्त्रक्रिया आवश्यक आहे, आणि ते पवित्र आत्म्याचे कार्य आहे.

तुम्ही जेव्हा प्रथम जन्मला होता तेव्हा तो तुमचा शारीरिक जन्म होता. परंतु त्यावेळी तुम्हाला आत्मिक दृष्टी आणि समज आलेली नव्हती. तुम्हाला आत्मिक अंधारातून बाहेर यावे आणि ज्ञान व देवाच्या गौरवाचा प्रकाश हवा असेल तर तुमचा दुसऱ्यांदा जन्म झाला पाहिजे (२ करिंथ ४:६). येशूने निकदेमाला म्हटले,

> *‘‘देहापासून जन्मलेले देह आहे आणि आत्म्यापासून जन्मलेले आत्मा आहे. तुम्हाला नव्याने जन्मले पाहिजे असे मी तुम्हाला सांगितले म्हणून आश्चर्य मानू नका’*

*(योहान ३:६,७)..... "नव्याने जन्मल्यावाचून कोणालाहि देवाचे राज्य पाहता येत नाही" (योहान ३:३).*

**म्हणून जर तुम्हाला देवाचे राज्य पाहावयाचे असेल तर तुमचा नवा जन्म झाला पाहिजे.**

जेव्हा तुमचा जन्म झाला तेव्हा सर्व मनुष्यांप्रमाणेच तुमच्यामध येही देवाच्या आकाराप्रमाणे एक पोकळी होती आणि ती भरून निघावी असा तिचा आग्रह होता. जेव्हा पुनरुत्थित ख्रिस्त त्या पोकळीमध्ये विराजमान होतो तेव्हाच ती आत्मिक पोकळी भरून निघते. तुम्ही येशूचा तुमचा तारणारा म्हणून स्वीकार करता तेव्हाच त्याच्या मृत्यूचा अर्थ तुमचा जीवनात साकारत जातो. तुमच्या पापांची क्षमा व्हावी एवढ्यासाठीच येशू मरण पावला नाही. तुमची अंतःकरणे शुद्ध व्हावीत आणि त्यांमध ये त्याची वस्ती व्हावी यासाठी तो मरण पावला. तुमच्या हृदयात तो येण्यापूर्वी तुमच्या पातकांची क्षमा होणे आवश्यक आहे.

मी एका आफ्रिकन तरुणाशी बोलत होतो. येशू ख्रिस्ताची सुवार्ता कशी गाजवावी यासंबधी तो दबलेला होता हे मला जाणवले. त्याच्या देशबंधुना सुवार्ता गाजविण्याचे प्रचंड ओझे त्याला जड वाटत होते. पुढील आठवड्यात मी सुमारे दोनशे पाळकांना पवित्र शास्त्राचे शिक्षण देणार होतो; तेव्हा मी त्या तरुणालाही तेथे येण्याचे निमंत्रण दिले. जेथे ते सर्व पाळक येणार होते ते ठिकाण आमच्यापासून शेकडो मैल दूर होते. मी त्याला सांगितले की त्याने बसने तो खडतर प्रवास करावा. त्याप्रमाणे तो तरुण, विल्यम, प्रवास करून थकल्या भागल्या अवस्थेत हजर राहिला. देवाच्या वचनासंबंधी अधिक ऐकण्यास मिळाले म्हणून त्याला आंनद वाटला. विल्यमने तो खडतर प्रवास गमतीखातर केला नव्हता! त्या सभेला उपस्थित राहता यावे म्हणून त्याने बसने प्रवास केला होता. जे त्याच्यासाठी राखून ठेवले होते ते त्याला त्याचा प्रवास पूर्ण झाल्यावर मिळाले.

तुमची व ख्रिस्ताची सहभागिता व्हावी यासाठी तुम्हाला मार्ग हवा याची जाणीव येशूला होती. यासाठीच तुमच्या पातकांची क्षमा करून त्याने तुमची अंतःकरणे शुद्ध केली व अशा अंतःकरणात वस्ती करण्यासाठी मार्ग तयार केला. तुमच्या पातकांची क्षमा होणे हे अगत्याचे तर होतेच; परंतु ख्रिस्तच तुमचे नवे जीवन आणि सर्वसमर्थ देवबापाशी तुमची सहभागिता व्हावी हीच येशूची अंतीम इच्छा होती. येशू ख्रिस्ताशी तुमचे वैयक्तिक नाते जुळावे यासाठीच तर तुम्हास निर्माण करण्यात आले आहे.

येशू खिस्त तुमच्या हृदयात वस्ती करतो हे समजणे म्हणजे तुमचा सार्वकालिक जीवनाचा प्रवास सुरू झाला आहे हे समजणे होय. जेव्हा ख्रिस्त तुम्हामध्ये वस्ती करतो तेव्हा त्याचे जीवन तुमच्या जीवनात उतरते.

> *“ती साक्ष हीच आहे की देवाने आपल्याला सार्वकालिक जीवन दिले आणि हे जीवन त्याच्या पुत्राच्या ठायी आहे. ज्याला तो पुत्र लाभला आहे त्याला जीवन लाभले आहे, ज्याला देवाचा पुत्र लाभला नाही त्याला जीवन लाभले नाही” (१ योहान ५:११-१२).*

म्हणून माझा मित्र डेव्हीड याने प्रभु येशूला त्याच्या पातकांची क्षमा करून त्याच्या जीवनात येण्याची विनंती केली व त्यानंतर त्याने आनंदोद्गार काढले होते, “हे एवढे सुखद असेल असे मला वाटले नव्हते!” यात मग नवल ते काय?

## पण हे कसे होईल?

पेत्राने जेव्हा येशूचे जीवन, मरण व पुनरुत्थान यासंबंधी संदेश दिला तेव्हा देवाने तेथील लोकांच्या मनात तारणाऱ्यासंबंधी इच्छा निर्माण केली. आज पवित्र आत्मा तुम्हाकरिता जे करीत आहे तेच

त्याने तेव्हा त्यांच्यासाठी केले. येशू हाच प्रभु आहे व तोच मसीहा आहे असे पेत्र म्हणताना त्यांनी ऐकले. येशूसंबंधी ही नवी समज त्यांना आल्यामुळे त्यांना तारणाची गरज व खात्रीही वाटू लागली. वधस्तंभावर खिळून ठार करण्यात आलेल्या येशूला त्यांनी नाकारले होते किंवा त्यांच्यासबंधी ते बेफिकीर होते आणि त्यामुळे त्यांचे हृदय आता फाटले असे शास्त्रवचन म्हणते आणि म्हणूनच त्यांनी अतिशय कळकळीने पेत्राला विचारले ‘‘आम्ही काय करावे?’’ (प्रे.कृ. २:३७).

पेत्राने त्यांना पश्चाताप करण्यासंबधी सांगितले. पश्चातापाशिवाय विश्वास हा खरा विश्वास नव्हे तसला विश्वास म्हणजे एक दिखाऊपणा असतो किंवा ती एक ‘सणक’ असते. जो विश्वास तारणदायी असतो त्यामध्ये विश्वासाची वृत्ती व वृत्तीत बदल येतो.

येशूने वधस्तंभावरील मरणाद्वारे तुमच्यासाठी जे केले ते तुम्ही साध्या विश्वासाद्वारे मान्य करता तेव्हा पापाप्रत आणि देवाप्रत तुमच्या वर्तणुकीत असाधारण असा बदल होतो. आणि तेव्हाच पवित्र आत्म्याद्वारे तुमच्या आत्मिक डोळ्यांवर शस्त्रक्रिया केली जाते व तुम्ही वेगळ्या दृष्टीने पाहू लागता. खरे पाहाता पश्चाताप म्हणजे ‘बदलते मन’ म्हणून नवा जन्म होणे म्हणजे देव आणि पाप यासंबंधी बदललेले मन प्राप्त होणे होय.

**देवासंबंधी** : पश्चाताप (बदललेले मन) देवासंबंधी सर्व खोटे विचार धुडकावून लावतो. आफ्रिकेमधील जे लोक आपल्या जुन्या मार्गांना व परंपरांना चिकटून होते. ते ख्रिस्ताकडे वळल्यानंतर त्यांनी आपल्या जुन्या मार्गांची व परंपरेंची राखरांगोळी केल्याचे मी पाहिले आहे. माझे काही मित्र त्यांच्या धार्मिक वेडगळ कल्पना व विधी सोडून जेव्हा पवित्र देवाकडे वळले होते तेव्हा त्यांना जिव घेण्याच्या धमक्या मिळाल्या होत्या. येशू हाच याव्हे-तारणारा एकमेव देव आहे ह्याची खोल मुळावलेली खात्री म्हणजे विश्वास.

**पापासंबंधी** : विश्वासाने जेव्हा तुम्ही तारणाच्या अनुभवात येता तेव्हा तुम्हाला तुमच्या पापीपणाची जाणीव होते व तुम्ही त्याबद्दल खेद करता. तुमच्या मनात झालेला बदल (पश्चाताप) यामुळे पापबद्दल तुम्ही यापुढे निष्काळजी राहणार नाही. पापाबद्दल यापुढे कसली सबब पुढे करणार नाही. यापुढे केवळ तुमच्या धार्मिकतेमुळेच तुमचे तारण होईल असाही विचार तुम्ही करणार नाही. *"आमची सर्व ध र्मकृत्ये देवापुढे घाणेरड्या वस्त्रांसारखी (चिंधी-सारखी) झाली आहेत" (यशया ६४:६).* परंतु जेव्हा तुम्ही येशूकडे वळता तेव्हा त्याला न आवडणाऱ्या गोष्टी तुम्ही सोडून देता.

कल्पना करा की एक शिपाई रजेवर गेला आहे. एक दिवस त्याला दोन पत्रे येतात. एक पत्र त्याच्या मित्राकडून आलेले असते आणि दुसरे त्याच्या अधिकाऱ्याकडून आलेले असते. पहिल्या पत्रात त्याच्या मित्राच्या लग्नाचे आमंत्रण असते तर दुसऱ्या पत्रात त्याच्या अधिकाऱ्याने त्याला कामावर ताबडतोब रुजू होण्याचा आदेश दिलेला असतो. आमंत्रण आणि आदेश यात किती फरक आहे! आमंत्रण आपण नम्रपणे नाकारू शकतो परंतु आदेशाचे पालन हे करावेच लागते अथवा बंड पुकारावा लागतो.

देव तुमच्यावर प्रीती करतो आणि पापामुळे तुम्ही मरणार हे त्याला ठाऊक आहे. म्हणून तो तुम्हाला पश्चातापाचे आमंत्रण देत नाही तर आदेश देतो.

पौल ग्रीसमधील विद्वानांपुढे भाषण करताना म्हणाला, *"परंतु आता सर्वांनी सर्वत्र पश्चाताप करावा अशी तो (देव) माणसांना आज्ञा करितो" (प्रे.कृ. १७:३०),* आणि त्या "सर्वां" मध्ये तुम्ही आहात.

देवासंबंधी असलेला गैरसमज दूर करून जेव्हा तुम्ही पापासून वळता व विश्वासाने येशूपाशी येता व तोच तारणारा आहे असे

जाहीर करता तेव्हा पवित्र आत्मा तुमच्या हृदयात कार्य करू लागतो. त्यामुळे 'इच्छा करणे व कृति करणे' तुम्हाला शक्य होते (फिलिप्पै २:१३). हा खरोखर चमत्कारच आहे. देवाच्या दृष्टीने योग्य तेच तुम्ही करू लागता. म्हणून जे लोक मनापासून पश्चाताप करतात त्यांना देव त्याच्या संकल्पाप्रमाणे इच्छा करण्यास व कृती करण्यासंबंधी अभिवचन देतो. तेव्हा तुमचे जीवन बदलून जाते आणि ते देवाच्या सामर्थ्याने भरते.

तुमचा एक मित्र म्हणून मी तुम्हाला कळकळीची विनंती करतो की तुम्ही उशीर न करता प्रभु येशू ख्रिस्ताचा स्वीकार करावा. एखादी निवांत जागा शोधा की जेथे तुम्ही देवाची प्रार्थना शांतपणे करू शकाल. अर्थात पोपटाप्रमाणे तुम्ही चर्पटपंजरी केली तर तुम्हाला त्याचा काही लाभ होणार नाही. तुम्ही विश्वासाने येशू ख्रिस्ताला प्रतिसाद देणे हे फार महत्वाचे आहे. येशू म्हणतो, *'मार्ग, सत्य व जीवन मीच आहे, माझ्याद्वारे आल्यावाचून पित्याकडे कोणी येत नाही' (योहान १४:६).*

आता तुम्ही डोळे झाका व उत्स्फूर्तपणे प्रार्थना करा, किंवा पुढे दिलेली प्रार्थना तुम्हास उपयुक्त ठरेल.

## माझा प्रार्थनेद्वारे प्रतिसाद

''हे देवा मी तुला ओळखले नव्हते व तुजवर प्रेमही केले नव्हते. परंतु हे प्रभु, मी आता तुझे आभार मानतो कारण तू मला ओळखले आहे व तू मजवर प्रीती करीत आहे.

मी पापी आहे. माझ्या कोणत्याही धर्मकृत्यामुळे मला तारण मिळत नाही हे मला समजले. म्हणून विश्वासाने मी तुझ्याकडे वळलो. हे येशू ख्रिस्ता, मी तुजजवळ माझ्या पापांची क्षमा मागतो. मी पापी आहे हे मी कबूल करतो व त्या पापांबद्दल मी पश्चाताप करतो. हे येशू, तू माझ्यासाठी मरण पावलास त्याबद्दल मी तुझे आभार

मानतो. तुझ्या मोलवान रक्ताने तू मला शुद्ध केलेस म्हणून मी तुझा ऋणी आहे. आता मी विश्वासाने माझे जीवन तुझ्या मोलवान रक्ताच्या सामर्थ्याखाली आणतो. तेच माझे रक्षण करते असा माझा विश्वास आहे.

प्रिय येशू, तू माझ्या जीवनात ये आणि माझ्या जीवनाचा ताबा घे.

प्रिय येशू, तुझ्या पवित्र आत्म्याद्वारे माझा नवा जन्म झाला याबद्दल मी तुझे उपकार मानतो. तुझ्या पुनरुत्थानाच्या सामर्थ्यामुळे मी आता देवाचे लेकरू बनलो आहे आणि मी चिरकाल तुझ्यासह राहणार आहे हे माझ्यासाठी आश्चर्यकारक आहे आणि त्याबद्दलहि मी तुझे आभार मानतो.''

*''तिच्यावर विश्वास ठेवणारा (येशूवर अवलंबून असलेला) फजीत होणार नाही'' (१ पेत्र २:६).*

तुम्ही आत्ता काय केले त्याबद्दल दुसऱ्याला सांगा. ख्रिस्त तुम्हामध्ये राहतो हे ध्यानात ठेवा. त्याची साक्ष देण्यासाठी तो तुम्हाला शक्ती पुरवतो हे लक्षात ठेवा.

*''की येशू प्रभू आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील, आणि देवाने त्याला मेलेल्यातून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल. कारण जो अंतःकरणाने विश्वास ठेवतो तो नीतिमान ठरतो व जो मुखाने कबूल करितो त्याचे तारण होते'' (रोम १०:९-१०).*

## स्लोव्हाकियातून आलेले एक पत्र

*प्रिय मित्रांनो, माझ्या जीवनांत अत्यंत प्रभावी ठरलेले पुस्तक : 'तुमचा देवाचा शोध' मी नुकतेच वाचून पूर्ण केले. मी आता पूर्वीचा उरलो नाही अशी माझी खात्री झाली आहे. प्रभु येशूने माझा स्वीकार केला व मी त्याला समर्पित झालो. माझ्या सर्व मित्रांना हा आनंद मिळावा असे मला वाटते. म्हणून दोन मित्रांसाठी मला दोन प्रती मिळाव्यात अशी मी आपल्याकडे मागणी करीत आहे....*

*माझ्या जीवनात सुवार्ता आणल्याबद्दल आणि ख्रिस्तात मला तारण मिळवून दिल्याबद्दल मी तुमचा आभारी आहे....इतके सुंदर पुस्तक असू शकते याची मला कल्पना नव्हती."*

*जे.अे.च्या नोंदीनुसार*

## विचार करा

१. उदारपणे मिळालेल्या एखाद्या देणगीबद्दल तुम्ही
कृतज्ञता कशी व्यक्त कराल?
तुम्ही असे म्हणाल काय –‘कृपया मला ती द्या?’
किंवा तुम्ही म्हणाल – ‘मी तुमचा आभारी आहे?’

२. तुम्ही देवाचे लेकरू आहा अशी तुमची भावना
आहे की तुमची तशी खात्री आहे?
‘कारण कृपेनेच विश्वासाच्याद्वारे तुमचे तारण
झालेले आहे आणि हे तुमच्या हातून झाले असे
नाही तर हे देवाचे दान आहे” (इफिस २:८).

३. येशू ख्रिस्तावरील तुमच्या विश्वासात या गोष्टींचा
समावेश आहे काय?–
पश्चातापासंबंधी कळकळ?
आभार मानण्याची कळकळ?
येशूवरच पूर्णपणे विसंबण्याची वृत्ती?

४. तुमचे तारण झाले आहे म्हणून आता तुम्ही
देवाचे आभार मानता काय? येशूने तुम्हांकरिता
जे काही केले व तो कोण आहे याबद्दल तुम्ही
देवाचे आभार मानता काय?

*देव आणि ख्रिस्त जर मजसाठी आहे तर कोणतीही गोष्ट - मग कोणतीही परिस्थीती, कोणतेही संकट अथवा कोणतीही परीक्षा असो मला कधीच स्पर्श करणार नाही. आणि जर काही अडचण निर्माण झालीच तर तिच्या मागे माझ्यासाठी देवाचा उदात्त हेतू असतो. त्याक्षणी मला कदाचित त्याची जाणीव नसेलही. परंतु न घाबरता जेव्हा मी माझे डोळे त्याच्या डोळ्यांशी भिडवितो आणि आलेल्या प्रसंगात देवाचा उदात्त हेतू आहे हे मानतो तेव्हा कोणतेही दुःख मजवर मात करू शकत नाही. कोणतीही परिस्थिती मला हताश करू शकत नाही, कोणतीही परीक्षा मला निःशस्त्र करू शकत नाही. कारण प्रभु जो माझा आनंद त्यामध्ये मी विसावतो. हा विश्वासाचा विजय आहे!*

*ॲलन रेडपाथ*

# प्रकरण १०

# पुढे काय?

तारण अगदी फुकट आहे! ते मिळविण्यासाठी कोणाला काहीही करावे लागत नाही. प्रभु येशू ते साध्य करून देतो.

तुम्हाला सुचविलेली प्रार्थना (किंवा तशीच दुसरी प्रार्थना) तुम्ही अगदी प्रामाणिकपणे केली तर तुमच्या ख्रिस्तावरील गाढ विश्वासामुळे तुम्ही देवाचे प्रिय लेकरू झाला आहात,

> *"जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला" (योहान १:१२).*

पण आता तुम्ही निश्चितच एक प्रश्न विचाराल – 'पुढे काय?'

येशू ख्रिस्त आपल्या शिष्यांना सोडून वधस्तंभावरील मरण आणि मृत्यूला पराभूत करण्यासाठी सज्ज झाला तेव्हा तो शिष्यांना म्हणाला *"तुम्ही माझ्यामध्ये राहा आणि मी तुम्हामध्ये राहीन" (योहान १५:४).* ख्रिस्ती जीवनाचे मर्म प्रभु येशूने या छोट्या वाक्यात सांगितले आहे. देवाच्या दृष्टीने विश्वासणारा प्रत्येकजण त्याचा पुत्र येशू ख्रिस्त यामध्ये राहतो. स्वर्गात प्रवेश करील तोपर्यंत तो ख्रिस्तात सुरक्षित असतो. विश्वासणाऱ्यामध्ये ख्रिस्त राहतो त्यामुळे मानवी दृष्टीने त्याचे कुटुंब, मित्रमंडळी, सहकारी यांना त्या विश्वासणाऱ्यांच्या जीवनातून ख्रिस्त दिसतो.

एखादी लोखंडी सळई विस्तवात खोचली आहे अशी कल्पना करा. बारकाईने पाहिले तर तुम्ही म्हणाल की, 'सळई विस्तवात आहे'. थोड्या वेळाने आणखी नीट पाहिले तर ती सळई तापून लाल झालेली तुम्हाला दिसेल आणि मग तुम्ही म्हणाल की 'सळईचा विस्तवच झाला आहे'' किंवा अशी कल्पना करा बादलीभर पाण्यात एक कप बुडविला आहे. आता पाण्यामध्ये कप आहे तसेच कपामध्ये पाणी आहे! होय ना?

जेव्हा तुमचा नवा जन्म झाला तेव्हा पवित्र आत्म्याने तुमचा बाप्तिस्मा (बुडवून) ख्रिस्तामध्ये केला.

पवित्र शास्त्र म्हणते, *"...तुमचे जीवन ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त ठेवलेले आहे'' (कलस्सै ३:३).* तुमचा नवा जन्म झाला त्यामुळे आता तुम्ही ख्रिस्तात आहा. किती छान! तुमचा नवा जन्म झाला तेव्हा पुनरुत्थित ख्रिस्ताचे वैभवशाली जीवन तुम्हामधून वाहू लागले आणि पवित्र आत्म्याद्वारे त्याचे प्रत्यंतर तुम्हांस आले. ख्रिस्त तुम्हामध्ये जगतो याचा तुम्हाला आनंद वाटतो. *"...गौरवाची आशा असा जो ख्रिस्त तुम्हामध्ये आहे तोच ते रहस्य आहे'' (कलस्सै १:२७)* आणि खरेच तुमचा नवा जन्म झाल्यामुळे आता पुनरुत्थित ख्रिस्त तुम्हामध्ये राहतो. किती सुंदर!

आता 'मी ख्रिस्तात आणि ख्रिस्त माझ्यात' ही दोन सत्ये आहेत व पवित्र शास्त्र त्याबद्दल काय म्हणते याचा आपण विचार करू :

## मी ख्रिस्तात आहे

*"...एक शरीर होण्यासाठी आपणा सर्वांना एका आत्म्यात बाप्तिस्मा मिळाला आहे...'' (१ करिंथ १२:१३).*

*"किंवा आपण जितक्यांनी ख्रिस्त येशूमध्ये बाप्तिस्मा घेतला तितक्यांनी त्याच्या मरणात बाप्तिस्मा घेतला'* याविषयी

*तुम्ही अजाण आहा काय? तर मग आपण त्या मरणातील बाप्तिस्म्याने त्याच्याबरोबर पुरले गेलो ह्यासाठी की ज्याप्रमाणे ख्रिस्त पित्याच्या गौरवाने मेलेल्यांतून उठला त्याचप्रमाणे आपणही नवीन प्रकारच्या जीवनाच्या चालावे' (रोम ६:३-४).*

*"कारण तुम्ही मृत झाला आहां आणि तुमचे जीवन ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त ठेविलेले आहे" (कलस्सै ३:३).*

अनेक वर्षांपूर्वी, रक्ताचा कर्करोग-लुकेमिया-झालेला एक मुलगा माझ्या परिचयाचा झाला होता. त्यावेळी तो फक्त सात वर्षांचा होता. दर तीन महीन्यांनी त्याला पाठीच्या मणक्यात इंजेक्शन घेण्यासाठी डॉक्टरकडे जावे लागे. डॉक्टरांनी त्या मुलाला-डेरीलला-एकदा विचारले की इतर मुलांप्रमाणे इंजेक्शन टोचताना तो का रडत नाही. डॉ. त्याला म्हणाले, 'तुला काही दुखत नाही का रे?' डेरील म्हणाला, "डॉक्टर तुम्हाला माहीत नाही का, इंजेक्शनची सुई टोचण्यापूर्वी ती येशूच्या हातात असते." तुम्ही ख्रिस्तात असल्यामुळे आता तुमच्या जीवनातील प्रत्येक गोष्ट येशूच्या हातात असते हे किती आनंदाचे आहे! आणि हाच खरा विश्वास आहे!

येशू ख्रिस्ताला तुम्ही विश्वासाद्वारे स्वीकारले तसेच त्याच विश्वासाच्याद्वारे तुम्हाला येशू ख्रिस्त तुमच्या जीवनातील सर्व गरजा पुरविण्यास समर्थ आहे. थोडक्यात येशू ख्रिस्तावरील तुमच्या विश्वासामुळे पुढील आयुष्यभर तुमची वृत्ती विश्वासयुक्त असते. *"ख्रिस्त येशू जो प्रभु याला जसे तुम्ही स्वीकारले तसे त्याच्यामध्ये चाला राहा" (कलस्सै २:६).*

तुमचा नवा जन्म झाला असला तरी तुम्ही येशूची नक्कल करावी अशी देवाची अपेक्षा नाही. असे करण्यामुळे लक्षावधी ख्रिस्ती

लोक निराश झाले. त्यांना कसलेही यश मिळाले नाही. देव आपल्या ख्रिस्ती जीवनाच्या यशासाठी सगळी तरतूद करतो. आपण ख्रिस्तात मेल्यामुळे नियमशास्त्राच्या अधिपत्याखाली येत नाही. जसे पूर्वी, तसे आता यापुढे आपण स्वतःच्या इच्छेला मृत झालो आहो. आपल्या स्वतःच्या वृथा आत्मविश्वासाला आपण मृत झालो आहो. परंतु पुनरुत्थित ख्रिस्त आपल्याला सर्व काही पुरविण्यास अगदी समर्थ आहे याबद्दल देवबापाची स्तुती असो.

जेव्हा आपण आपल्या परीने परिस्थितीशी व मोहाशी झगडू लागतो तेव्हा खरी समस्या उद्‌भवते. नव्या विश्वासणाऱ्याला ख्रिस्ती जीवन पूर्वीप्रमाणे स्वतःच्या ताकदीवर जगता येत नाही अशी जाणीव होते. या वृत्ती संबंधी सावधानतेचा इशारा येशूने दिला व म्हटले, *“. .. माझ्यापासून वेगळे झाल्यास तुम्हांला काही करिता येत नाही” (योहान १५:५).*

स्वतःच्या कृर्तत्वावरच खुष असणाऱ्या गलतीकरांस पौलाने कडक शब्दात इशारा दिला. ते लोक देवाच्या वचनापासून दूर गेले होते. विश्वासापासून ढळले होते. म्हणून पौलाने त्यांना एक जळजळीत प्रश्न विचारला :

> *“तुम्हाला नियमशास्त्रातील कृत्यांनी आत्मा मिळाला किंवा विश्वासपूर्वक ऐकण्याकडून मिळाला, इतकेच मला तुम्हापासून समजून घ्यावयाचे आहे. तुम्ही इतके बुद्धिहीन आहा काय? तुम्ही आत्म्याने प्रारंभ केल्यावर आता देहस्वभावाने पूर्णत्व मिळवू पाहत आहा काय?” (गलती ३:२-३)*

तुम्ही जसे विश्वासाने नव्या जीवनास सुरुवात केली तशीच गलतीकरांनीही केली होती. त्याच विश्वासावर विसंबून राहिल्यामुळे ते *“येशू ख्रिस्ताच्याद्वारे जीवनात राज्य करितील’ (रोम ५:१७)* अशी आशा करू शकतात.

गलतीमध्ये लोक स्वतःच्या बुद्धीवर नीति-नियमांवरच भर देत होते. ते विश्वासाने चालत नव्हते. परंतु जर तुम्ही, तुम्हाला नव्याने सापडलेल्या प्रभु येशूवर विश्वास ठेवून चालला तर त्या गलतीकरांसारखी तुमची अवस्था दयनीय होणार नाही.

## ख्रिस्त माझ्यात वसतो

*“मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे....ख्रिस्त माझ्याठायी जगतो” (गलती २:२०).*

*“पण ख्रिस्त तुम्हांमध्ये असेल तर शरीर जरी पापामुळे मेलेले आहे तरी आत्मा नीतिमत्वामुळे जीवन आहे. ज्याने येशूला मेलेल्यांतून उठविले त्याचा आत्मा जर तुम्हामध्ये वस्ती करितो तर ज्याने ख्रिस्त येशूला मेलेल्यांतून उठविले तो तुम्हांमध्ये वस्ती करणाऱ्या आपल्या आत्म्याने तुमची मर्त्य शरीरेही जिवंत करील” (रोम ८:१०-११).*

*“ह्या रहस्याच्या गौरवाची संपत्ती परराष्ट्रीयांमध्ये काय आहे ते आपल्या पवित्र जणांना कळविणे देवाला बरे वाटले, गौरवाची आशा असा जो ख्रिस्त तुम्हांमध्ये आहे तो ते रहस्य आहे” (कलस्सै १:२७).*

*“ख्रिस्ताने तुमच्या अंतःकरणामध्ये तुमच्या विश्वासाच्याद्वारे वस्ती करावी...” (इफिस ३:१७)*

ख्रिस्त तुमच्या जीवनात वास करतो व त्यावर तुमचा विश्वास आहे हे समजून तुम्ही म्हणा ‘प्रभु येशू, मी तुझे आभार मानतो. मी कुणी नाही पण तूच माझे सर्वस्व आहे. तू मजमध्ये व माझ्याद्वारे असावा यासाठी मी तुला विनवितो’. तुमच्या ख्रिस्ती जीवनाची सत्यता हीच आहे की तुमच्या जीवनाची यशस्वीता देवाने दुसऱ्या एकावरच सोपविली आहे आणि तो आहे प्रभु येशू ख्रिस्त! तुमच्या जीवनातील

येणारी प्रत्येक संधी व संकट हे केवळ येशूमुळेच तुम्हाला सहन करता येईल. ख्रिस्ताशिवाय तुम्ही तत्वज्ञानी होऊ शकाल, ख्रिस्ताशिवाय तुम्ही उपदेशक होऊ शकाल, ख्रिस्ताशिवाय तुम्ही मिशनरी होऊ शकाल परंतु जर तुम्हामध्ये ख्रिस्त वसत नसेल तर तुम्ही मुळीच ख्रिस्ती होऊ शकणार नाही.

खऱ्या अर्थाने ख्रिस्ती जीवन जगणारी एकच व्यक्ती आहे ती म्हणजे येशूच होय. पवित्र आत्म्याद्वारे अत्यंत चमत्कृतिपूर्ण रीतीने त्याने तुमच्या हृदयात प्रवेश केला आहे. जे स्वतः तुम्हाला कधीच करता आले नाही तो आता तुमच्याद्वारे व तुम्हासाठी करील. अनैतिक जगामध्ये तो तुमच्यासाठी नीतिमान आहे. मोहाच्या जगात तोच तुमच्यासाठी विजय आहे. या स्वार्थी जगात तोच तुमच्यासाठी प्रीती आहे. तो पुनरुत्थान व जीवन आहे व तो तुमच्या हृदयात वसतो आणि तेच तुमचे ख्रिस्ती जीवन आहे.

हरवलेले शोधावयास आलेल्या येशूला तुम्ही तुमचे जीवन समर्पित केले त्यामुळे तुमच्याद्वारे हरवलेले अनेक आत्मे तुम्हाला शोधता येतील. येशूचे जीवनच तुम्हांमधून इतरांसाठी वाहते हे जेव्हा विश्वासणाऱ्याला समजते तेव्हा त्याचे जीवन अगदी रोमहर्षक बनते.

लक्षात ठेवा, येशू जरी स्वर्गात असला तरी तो तुम्हापासून कधीच दूर गेलेला नाही. शिष्यांना या पृथ्वीवर सोडून जाताना तो त्यांना म्हणाला,

> *“आता थोडाच वेळ आहे, मग जग मला आणखी पाहणार नाही, पण तुम्ही मला पाहाल. मी जिवंत आहे म्हणून तुम्हीही जिवंत राहाल. त्या दिवशी तुम्हांस समजेल की मी आपल्या पित्यामध्ये, तुम्ही माझ्यामध्ये व मी तुम्हामध्ये आहे” (योहान १४:१९,२०)*

आता तुम्ही एक प्रश्न विचाराल, ‘‘देवाने ख्रिस्तामध्ये दिलेले हे सर्व माझ्या जीवनात प्रत्यक्ष कसे उतरेल?’’ प्रश्न छान आहे, विश्वास हा दोन प्रकारचा आहे. एक बौद्धीक व एक अनुभवाचा. या प्रश्नातून तुमच्या कार्यक्षम अशा विश्वासासंबंधी तुमची अपेक्षा आहे. याचे साधे उत्तर असे आहे की विजयी खिस्ताचे जीवन विश्वासणाऱ्याला प्राप्त होते. जेव्हा तो देवाचे ख्रिस्ताबद्दल आभार मानतो तेव्हा ख्रिस्त त्याच्यातून जगू लागतो. खरा विश्वास नेहमी हेच म्हणतो - ‘मी आभारी आहे’.

तुम्ही तुमचा तारणदायी विश्वास प्रकट करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे तुमच्या सर्व पातकांची क्षमा झाली आहे याबद्दल तुम्ही येशू ख्रिस्ताचे मनापासून आभार मानणे होय. तुमच्या अडचणीच्या वेळी येशूने नेमके तुमच्यासाठी काय केले पाहिजे हे समजून तुम्ही त्याचे आभार मानले पाहिजेत. *‘‘विश्वासावाचून त्याला संतोषविणे अशक्य आहे’’ (इब्री ११:६).* त्याला संतोषविण्याची तुमची इच्छा असेल तर तुम्ही विश्वासपूर्वक सतत त्याचे आभार मानले पाहिजेत. कारण येशू ख्रिस्त सर्वदा तुमच्यासाठी सामर्थ्यवान आहे.

प्रभु येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवून त्याच्याशी एकनिष्ठ राहिल्यामुळे ज्या अनेक ख्रिस्ती लोकांचा छळ करण्यात येत होता त्यांना पेत्राने त्याच्या पत्रात त्याचा उत्साह वाढेल असेल लिहिले आहे. *‘‘तर खिस्ताला प्रभु म्हणून आपल्या अंतःकरणात पवित्र माना (त्याच्यासाठी स्वतःला वेगळे करा, त्यालाच तुमच्या अंतःकरणात प्रथम स्थान द्या)’’ (१ पेत्र ३:१५).* तुमच्या येशू ख्रिस्तावरील विश्वासामुळे जेव्हा तुमचा छळ होतो तेव्हा काय करावे याचे गुपित देवानेच सांगितले आहे. येशू हाच तुमच्या जीवनाचा स्वामी आहे हे नीट समजून घ्या.

जुन्या करारात देवाचे ‘अदोनी’ असे एक नांव आहे याची आठवण करा. अदोनी या नावाचा अर्थ ‘देव माझा स्वामी आहे.’

जेव्हा पेत्राने ख्रिस्ती लोकांना ताकीद देऊन लिहिले 'ख्रिस्त प्रभु याला आपल्या अंतःकरणात पवित्र माना' तेव्हा प्रभु हाच तुमचा स्वामी आहे अशीच त्यासंबंधी त्याची कल्पना होती.

प्रभु येशूच आता तुमच्या जीवनाचा स्वामी आहे त्यामुळे त्याची अक्षय सहभागिता तुम्हाला सतत आनंद देणारीच ठरेल. तुमच्या सर्व दैनंदिन गरजा भागविण्यास तोच आहे असा विश्वास तुम्हांमध्ये वाढीस लागेल. जॉर्ज मॅथसन आपल्या कवितेत म्हणतात,

प्रभु मला तू बंदिवान कर<br>
म्हणजे मी मुक्त होईन<br>
तलवार उपसण्यास मला जोर दे<br>
म्हणजे मी विजयी होईन.

स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. माझ्याच इच्छेप्रमाणे मी काहीही करावे हा हक्क सोडून देण्यात खरे स्वातंत्र्य आहे. उलट मी जे केलेच पाहिजे ते करणे म्हणजेच स्वातंत्र्य! पौल काय म्हणतो ते ध्यानात घ्या, *''मला जो सामर्थ्य देतो त्याच्याकडून मी सर्व काही करावयास शक्तिमान आहे'' (फिलिप्पै ४:१३).*

आयर्लंड देशात १८५९ मध्ये झालेल्या संजीवन सभेमध्ये हजारो लोक ख्रिस्ताकडे आले. त्या सर्व लोकांनी स्वतःला अत्यंत विश्वासाने ख्रिस्ताला समर्पित केले आणि समर्पणाचे गीत त्यांनी विश्वासाने गाईले. त्यावेळी अनेक लोकांना पुनरुत्थित प्रभु येशूच्या सामर्थ्याचा अवघे जीवनच बदलून टाकणारा अनुभव आला. त्यामुळे त्या देशाचा चेहरा मोहराच बदलून गेला.

कोणत्या तरी करारावर सही करणे फारसे हुशारीचे काम नसले तरी पुढील दिलेल्या करारपत्रावर सही करणे तुमच्या हिताचे ठरेल. त्यामुळे तुम्ही देवाला योग्य असाच प्रतिसाद द्याल हे नक्की.

*“आता ज्या शांतीच्या देवाने सर्वकाळच्या कराराच्या रक्ताने मेंढरांचा महान मेंढपाळ, आपला प्रभु येशू ह्याला मेलेल्यांतून परत आणिले. तो देव आपल्या दृष्टीने जे आवडते ते आपल्यामध्ये येशू ख्रिस्ताच्या द्वारे करो व तो आपल्या इच्छेप्रमाणे करावयास तुम्हाला प्रत्येक चांगल्या कामात सिद्ध करो. त्या येशू ख्रिस्ताला युगानुयुग गौरव असो. आमेन” (इब्री १३:२०,२१)*

## हंगेरी येथून आलेले एक पत्र

*‘तुम्ही मला पाठविलेले पवित्र शास्त्र आणि रिचर्ड बेन्नेट यांनी लिहिलेले ‘तुमचा देवाचा शोध’ या पुस्तकाबद्दल मी तुमचा आभारी आहे.*

*ते पुस्तक मी पवित्र शास्त्रामधील संदर्भासह वाचून पूर्ण केले.*

*‘तुमचा देवाचा शोध’ या पुस्तकामुळे मी कशावर आणि कशाकरिता विश्वास ठेवावा याचा मला उलगडा झाला आहे. आता मी एक चांगला विश्वासणारा बनलो आहे आणि विश्वासपूर्वक मी माझ्या जीवनाचे येशू ख्रिस्ताला समर्पण केले आहे”.*

*ट्रान्स वर्ल्ड रेडिओच्या अहवालातून प्रस्तुत.*

आता तुम्ही विश्वासाने स्वतःचे

## समर्पण करावे

म्हणून शास्त्रवचने पुढील पानांवर दिली आहेत.

# माझे विश्वासाविषयी समर्पण

देव जो पिता माझा देव आहे

*जिवंत व सत्य देवाची सेवा करण्यास तुम्ही मुर्तिपासून देवाकडे वळला (१ थेस्सल १:१०)*

येशू ख्रिस्त हा माझा प्रभु व तारणारा आहे.

*पश्चाताप व पापांची क्षमा ही देणगी देण्याकरिता देवाने त्याला (येशूला) आपल्या उजव्या हाताशी अधिपती व तारणारा असे उच्च पद दिले. (प्रे.कृ ५:३१).*

देवाच्या प्रितीने भरण्यासाठी मी पवित्र आत्मा स्वीकारतो.

*आपणाला दिलेल्या पवित्र आत्म्याच्या द्वारे आपल्या अंतःकरणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव झाला आहे. (रोम ५:५)*

देवाचे वचन मी माझ्या जीवनाचा नियम म्हणून स्वीकारतो.

*प्रत्येक परमेश्वर प्रेरित शास्त्रलेख सद्बोध, दोष दाखविणे, सुधारणूक, नीतिशिक्षण याकरिता उपयोगी आहे. यासाठी की देवाचा भक्त पूर्ण होऊन प्रत्येक चांगल्या कामासाठी सज्ज व्हावा. (२ तीमथ्य ३:१६,१७).*

देवाचे लोक मी माझे लोक म्हणून स्वीकारतो.

*तुमचे लोक ते माझे लोक, तुमचा देव तो माझा देव. (रूथ १:१६)*

मी माझ्या प्रभुला माझे सर्वस्व समर्पण करतो.

*आपल्यातील कोणी स्वतःकरिता जगत नाही आणि कोणी स्वतःकरिता मरत नाही. कारण जर आपण जगतो तर प्रभुकरिता जगतो, आणि जर आपण मरतो तर प्रभुकरिता मरतो म्हणून आपण जगलो किंवा मेलो तरी आपण प्रभुचेच आहो. (रोम १४:७,८)*

हे सर्व मी जाणीवपूर्वक करतो.

*तुम्ही कोणाची सेवा करणार हे आजच ठरवा...मी आणि माझे घराणे तर परमेश्वराची सेवा करणार (यहोशवा २४:१५).*

मी प्रामाणिकपणे सर्व काही करणार.

*दैहिक ज्ञानाने नव्हे तर देवाच्या कृपेने, आम्ही जगात व विशेषकरून तुमच्याबरोबर देवाने दिलेल्या पवित्रतेने व सात्विकपणाने वागलो. (२ करिंथ १:१२)*

मी हे सर्व संतोषाने करणार

*तुझ्या पराक्रमाच्या दिवशी तुझे लोक संतोषाने पुढे होतात. (स्तोत्र ११०:३).*

मी हे सर्व सतत करीत राहीन.

*ख्रिस्ताच्या प्रीतीपासून आपल्याला कोण विभक्त करील? क्लेश, आपत्ति, छळणूक, उपासमार, नग्नता, संकट किंवा तरवार ही विभक्त करील काय? (रोम ८:३५)*

सही : ______________________________

दिनांक : ______________________________




याच लेखकाचे पुढील
पुस्तक,
**‘विश्वासाकरिता
अन्न’**
हे वाचण्यास तुम्ही उद्युक्त
व्हाल.

एखाद्या पाकक्रियेच्या पुस्तकातील सुंदर पाकक्रिया केवळ वाचून कोणी उपाशीच राहतो; तसेच पवित्र शास्त्रातील सुंदर ‘पाकक्रिया’ वाचूनही कोणी आत्मिकदृष्ट्या उपाशी राहू शकतो!

देवाचे वचन ग्रहण करून पचविण्यासाठी ‘विश्वासाकरिता अन्न’ हे पुस्तक पवित्र शास्त्रावर आधारित असून त्यातील ‘पक्वान्न’ तुमच्या हातातून मस्तकाकडे व मस्तकाकडून हृदयाकडे पोहंचते.